म.ग्रं.सं. वाचनालय, शाखा ठाणे
विषय ....नाटक....
दा.क्र. २९४८२

JRBK-0121472

JRBK-0121472

२१५७२
३।५।८६

म. ग्रं. सं., ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. २१५७२ नों. दि. ३।५।८६
वि. साहित्य क्र. ....................

# तुझे आहे तुजपाशी

[ तीन अंकी नाटक ]

लेखक
पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे

IRBK-0121472
IRBK-0121472

प्रकाशन क्रमांक : १४४

परचुरे प्रकाशन मन्दिर मुंबअी ४

मूल्य आठ रुपये

# तुझे आहे तुजपाशी

[तीन अंकी नाटक]

लेखक

पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे

IRBK-0121472

IRBK-0121472

प्रकाशन क्रमांक : १४४

परचुरे प्रकाशन मन्दिर मुंबअी ४

मूल्य आठ रुपये

**प्रकाशक :**

सौ. शुभदा विष्णू परचुरे
परचुरे प्रकाशन
२०३/४, मेहता भवन
३११, राजा राममोहन रॉय मार्ग
गिरगांव, मुंबई-४०० ००४

**मुखपृष्ठ :**
**गोपालकृष्ण भोबे**

**सेन्सॉर नंबर**
**DRM—852/57 of 13-8-57**

**मुद्रक :**
स. म. वैद्य
जॉली ऑफसेट
१४, वडाळा उद्योग भवन
वडाळा, मुंबई-४०० ०३१

| | | |
|---|---|---|
| आवृत्ती पहिली | : जाने. | १९५७ |
| आवृत्ती दुसरी | : ऑक्टो. | १९५७ |
| आवृत्ती तिसरी | : डिसेंबर | १९५८ |
| आवृत्ती चौथी | : डिसेंबर | १९६० |
| आवृत्ती पाचवी | : जाने. | १९६४ |
| आवृत्ती सहावी | : जुलै. | १९६५ |
| आवृत्ती सातवी | : मार्च | १९६७ |
| आवृत्ती आठवी | : ऑगस्ट | १९७० |
| आवृत्ती नववी | : मार्च | १९७२ |
| आवृत्ती दहावी | : जून | १९७५ |
| आवृत्ती अकरावी | : सप्टेंबर | १९७७ |
| आवृत्ती बारावी | : जाने. | १९८२ |
| आवृत्ती तेरावी | : ऑक्टो. | १९८५ |

माझे गुरुतुल्य स्नेही

आणि

भारतातील श्रेष्ठ शिक्षणतज्ज्ञ

श्री. जे. पी. नाईक

यांना प्रेमादरपूर्वक

अर्पण

प्रस्तुत नाटकाचा प्रथम प्रयोग २६ जानेवारी १९५७ रोजी रात्रौ ९ वाजता, केळेवाडी, मुंबई ४ येथील मराठी साहित्य संघमंदिरात सादर करण्यात आला.

## तुझे आहे तुजपाशी

**पुस्तक आणि प्रयोग यांच्या हक्कांसंबंधी**

या तेराव्या आवृत्तीच्या प्रकाशनाखेरीज पुढील आवृत्तींचे, पटकथेचे, भाषांतराचे रेडिओसाठी अगर पुस्तकात उतारे घेण्याचे इत्यादी सर्व हक्क सौ. सुनीता पुरुषोत्तम देशपांडे यांचे स्वाधीन आहेत.

*प्रयोग* : ह्या नाटकाचे प्रयोग फुकट असोत, तिकिटे लावून असोत अगर कुठल्याही संस्थेच्या मदतीसाठी असोत, प्रत्येक प्रयोगाचे रुपये पन्नास सौ. सुनीता देशपांडे, १ रूपाली, ७७७ शिवाजीनगर, पुणे ४११००४ ह्या पत्त्यावर प्रयोगाच्या दहा दिवस आधी पोचतील अशा बेताने पाठवून त्यांची रीतसर परवानगी घेणे आवश्यक आहे. परवानगी घेतल्याशिवाय प्रयोग केल्यास कायदेशीर इलाज केला जाईल. मानधनाच्या रकमेबाबत कोणत्याही सवलतीची अपेक्षा नसावी. व्यावसायिक दृष्टीने या नाटकाचा प्रयोग करावयाचा झाल्यास प्रयोग निश्चित करण्यापूर्वी लेखी परवानगी घ्यावी.

पु. ल. देशपांडे

# पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना

संपूर्ण तीन अंकी नाटक लिहिताना माझी लेखणी अडखळत नाही— परंतु प्रस्तावना लिहावयास बसलो आणि काय लिहावे ते सुचत नाही. मला काय म्हणावयाचे आहे ते नाटकात म्हटलेच आहे. मराठी रसिकावर माझी श्रद्धा आहे. त्याने दिलेला कोणताही कौल मी मानायला तयार आहे. ह्या नाटकातील प्रमुख पात्रांची वेषभूषा करताना कोणत्याही ह्यात अगर मृत अशा प्रसिद्ध व्यक्तीशी साधर्म्य दिसेल अशी वेषभूषा टाळावी. विशेषतः आचार्यांची वेशभूषा आणि रंगभूषा करताना ही खबरदारी घेणे आवश्यक आहे. हे नाटक मी कोणाही एका व्यक्तीला डोळ्यापुढे ठेवून लिहिले नाही. दुसरी गोष्ट, पदरचे संवाद घालू नयेत. हा मोह विनोदी संवादांत जबर असतो. खुद्द मी काम करताना मलाही मोह टाळणे काही वेळा अवघड झाले आहे. परंतु मोह ह्या विषयावर मी प्रस्तुत नाटकात काहीही म्हटले असले तरी नटनटींना ह्या पदरची वाक्ये घालण्याचा मोह टाळला पाहिजे.

हे नाटक लिहून झाल्यावर मुंबई मराठी साहित्य संघाने ते रंगभूमीवर आणावयाचे ठरविले. संघाच्या नाट्यविभागात हौसेने काम करणाऱ्या कलावंतांनी त्यासाठी भरपूर परिश्रम घेतले. उद्या न जाणो, हे नाटक झालंच यशस्वी तर यशाचा फार मोठा वाटा त्या सर्व कलावंतांचा आहे, हे मला आजच मान्य करून ठेवले पाहिजे. रंगमंचावरील सजावट करण्याचे कार्य सुप्रसिद्ध चित्रकार श्री. द. ग. गोडसे यांनी अंगावर घेतल्यांबद्दल त्यांचा मी आभारी आहे.

१ रूपाली,
७७७ शिवाजीनगर,
पुणे ४११००४.

पु. ल. देशपांडे

२९७५२ ३१५।८६
नाटक

# अंक पहिला

[इंदुरातील देवासकरांचा वाडा. जुन्या पद्धतीच्या वाड्यातील दिवाणखाना. रंगभूमीकडे तोंड करून उभे राहिल्यास डाव्या बाजूने बाहेरून आत येण्याचे दार. दार दिसत नाही. मागल्या बाजूला कठडा दिसतो. कठड्यापर्यंत लोंबणाऱ्या वेली आहेत. त्यांतून मागले आकाश दिसते. उजव्या बाजूला एक जिना आहे. त्यांतून पायऱ्यांवरच एक लँडिंग आहे. आणि सरळ आत जाण्याचे दार आहे. दारांना पडदे लावले आहेत. भिंतीवर मध्यभागी एक तैलचित्र आहे. हे देवासकर घराण्यातील बापूभय्या देवासकरांचे दरबारी वेषातील तैलचित्र आहे. त्याशिवाय इतरही तैलचित्रे–निसर्गचित्रे आहेत. त्या तैलचित्रांखाली एक काचेचे कपाट आहे. त्यात कप्स वगैरे आहेत. उजव्या बाजूच्या दारावर एक जुन्या पद्धतीचे मोठे घड्याळ आहे. ते बंद पडले आहे. मागल्या भिंतीजवळच्या काचेच्या कपाटावर रेडियो आहे. भिंतीवर जागजागी शिकार केलेल्या वाघांची कातडी आहेत, मुंडकी आहेत. जिन्याजवळ एक ग्रीक पद्धतीचा नग्न पुतळा आहे. दिवाणखान्यात मध्यभागी फर्निचर आहे, ते व्हिक्टोरिया राणीच्या अमदानीतले. रंगभूमीच्या डाव्या बाजूच्या भिंतीजवळ एक मोठे टेबल आहे. टेबलासमोर एक खुर्ची आहे. टेबलावर टेलिफोन आहे. पडदा वर जातो त्या वेळी उजव्या बाजूला छोट्याशा कोचावर एक साठीजवळचा म्हातारा आणि एक पोरसवदा तरुण बुद्धिबळे खेळत बसलेले दिसतात. हे म्हातारे गृहस्थ म्हणजे काकाजी देवासकर. त्यांच्या मिशांच्या घाटावरून आणि अणकुचीदार छोट्याशा दाढीवरून त्यांचा रंगेलपणा ध्यानात यावा. दणदणीत गोरीपान शरीरयष्टी—अंगात लखनौ पद्धतीची कलाकुसर केलेला अंगरखा, सुरवार. अशा वेषात काकाजी देवासकर हुक्क्याचे झुरके घेत, बुद्धिबळे खेळत बसले आहेत.

रेडियोवर कुणीतरी अत्यंत भसाड्या आवाजात ठुमरी गाण्याचा प्रयत्न करीत आहे. गायकाला ठुमरी गात आहो की ख्याल ह्याचा नीट अंदाज न आल्यामुळे ठुमरीतही अत्यंत रुक्ष असे तानापलटे चालू आहेत. ठुमरीची अक्षरे 'ऐसी ना मारो पिचकारी' ही असावीत. अक्षरांचा नीट पत्ता लागत नाही. हे प्रकरण काही वेळ चालते. काकाजींच्याबरोबर त्यांचा पुतण्या श्याम बुद्धिबळे खेळतो आहे. तो मात्र खेळात दंग आहे. त्यानेही मलमली कळीदार अंगरखा आणि ढिला पायजमा घातला आहे.]

**काकाजी** : (रेडियोतल्या गाण्याने कंटाळून) शीः शीशीशी–अरे यार ही काय ठुमरी आहे! (त्यांच्या बोलण्याचा ढंग अस्सल इंदुरी आहे.)–हे असं येऊन रेडियोत गाण्याऐवजी सडकेवर उभं राहून गोरक्षणाचे श्लोक का नाही म्हणत? श्यामभय्या, तो रेडियो बंद करून दे पाहू आधी—खामखा तकलीफ होऊन राहिली आहे!

**श्याम** : काकाजी, शह काढा आधी. हत्ती मेला तुमचा.

**काकाजी** : काय बिशाद आहे मरेल? कॉलेजच्या पोट्ट्यापाट्ट्यांच्या मधे चँपियनशिप मिळविलीस म्हणून काकावर जीत करशील का?—यह इधर आया मेरा हाथी—खेलो बच्चे खेलो—अरे रामरामराम! अरे उगाच वरच्या पट्टीत सुरू करतात गायला आणि स्वर पेलत नाही मग—बघ बघ—शी शी शी—लाहौल बिलाकूवत! अरे कोणी तरी रेडियो का नाही मिटवून देत–वासूअण्णा, ए वासूऽऽ

(आतून "आलो" असा आवाज.)

**श्याम** : काकाजी, वजीर मेला—

**वासूअण्णा** : (धावत येतो.) कोण मेला म्हणालात?

**काकाजी** : तुझा काका लेका! तो रेडियो बंद कर आधी.

[वासूअण्णा हा देवासकर घराण्यात पिढीजाद कारकुनी करणाऱ्या डिके घराण्यातला चालू कारकून. वय चाळिशीच्या आसपास. धोतर, खाकी सदरा. अनेक वर्षे वापरलेली फरकॅप, डोळ्याला चांदीच्या काड्यांचा नाकावर उतरणारा चष्मा, कानात भिकबाळी, कपाळाला चांगले दुबोटी आडवे गंध, असा त्याचा वेष आहे. त्याच्या खाकी सदऱ्याच्या दोन्ही खिशांत डायऱ्या

कोंबल्या आहेत. पेन्सिलीही डोकावताहेत. फरकॅपमधून शेंडी डोकावते आहे.]

**काकाजी** : काय बिशाद आहे वजीर मरेल!

**श्याम** : टळत नाही मरण–वासूअण्णा, तो रेडियो बंद कर पाहू आधी—

**वासू** : (आता हाही बुद्धिबळात गुंतला.) श्यामभय्या–(कुठलं तरी प्यादं सरकव असा श्यामला इशारा देतो.)

**काकाजी** : वासूअण्णा, मूव्ह सुचवलीत तर नौकरीवरून काढून टाकीन.

**वासूअण्णा** : आज तीस वर्षं ऐकत आलोय! श्यामभय्या, हाथी घ्या ना हटवून. काय ह्या रेडियोची कटकट होऊन राहिली आहे! अरे जगन्नाथ–अरे ए जगन्या—

[जगन्नाथ ड्रायव्हर येतो. त्यानं चकचकीत बटणं लावलेला ड्रायव्हरचा पोशाख केला आहे. डोक्याला फरकॅप. जगन्नाथ ड्रायव्हरच्या मिशांना आणि केसांना लावलेला कलप अर्धवट उडाला आहे. फरकॅपबाहेर डोकावणारे पांढरे केस मेंदी लावल्यामुळे तांबूस दिसतात.]

**जगन्नाथ** : कशाला उगीच चिल्लावून राहिलाय वासूअण्णा? गाडी केव्हाची तयार आहे. (वासू आता खेळात पार बुडाला आहे.)

**वासूअण्णा** : गाडी जाऊ दे खड्डयात—

**जगन्नाथ** : (आत्मविश्वासानं) कशी जाईल? गेल्या तीस वर्षांत गेली नाही वासूअण्णा. (आता तोही काकाजींच्या मागे उभा राहून डावात गुंततो.)

**काकाजी** : खेळ–श्याम, खेळ जलदी जलदी—

**जगन्नाथ** : बराबर नाही झाली ही मूव्ह!

**काकाजी** : काय बराबर नाही.

**जगन्नाथ** : बीट मारा काकाजी–दुसऱ्या मूव्हमधी मात करून दाखवतो–हरलो तर सगळ्यांना थंडाई पिलावून देईल आहे!—अरे अरे, कोणी तरी रेडियो बंद करून द्या ना–ए भिकू–ओ भिकूऽऽ–हा हा माळी कुठं गायब झाला सकाळीच? काकाजी–घोडा हटवून द्या तिकडे–भिकू—

[भिकू माळी येतो. हा चांगलाच म्हातारा आहे...केसवीस पार पिकून पांढरे शुभ्र झाले आहेत. माळी लोक घालतात तसली तांबडी लोकरी कान-टोपी घातली आहे–गलमिशा राखल्या आहेत.]

भिकू : ए, ओरडतो कशाला ? आमची तयारी आहे...हा हार घेऊन घे बरं—(हार देऊ लागतो.)

वासू : चूप बे !–श्यामभय्या, उंट उठवा—

भिकू : अबे उंटवाले...इकडे आमचा उंट काय पाणी पितोय काय ?

जगन्नाथ : श्यामभय्या, हे प्यादं मारून घ्या ना. (आपणच सोंगटी सरकावून प्यादं मारतो.) लहानपणापासून ह्याच पटावर खेळतोय भिकूशेट–पट खेळायचं म्हणजे काय खुरपं नाही चालवायचं बगीच्यात–उपस इकडली माती टाक तिकडं, उपट इकडलं रोपटं लाव तिकडं !

भिकू : ए डायवरवाल्या, हँडल मार हँडल ! प्यादं मारतो लेकाचा–आमच्या घोड्याला वाट मोकळी झाली. श्यामभय्या, तुमचा वजीर आता नक्की मेला—

जगन्नाथ : आहारे आहारे पठ्ठे ! वजीर कसा मरेल–श्यामभय्याच्या बादशहाचा दिवाणजी आहे तो–ह्या वासूअण्णा दिवाणजीसारखा मरियल नाही माळीबुवा—

वासू : ए माझं का नाव घेतो रे जगन्या–उगीच अंटसंट फोका कशाला मारत बसलाय इथं–काय खेळायचं ते चूपचाप खेळा नाऽऽ—

काकाजी : ए इथं खेळतोय कोण–तुम्ही का आम्ही ?–तो रेडियो बंद करा बघू आधी. (वासू, जगन्नाथ आणि भिकू माळी तिघेही रेडियो बंद करायला धावत जातात. वासू रेडियो बंद करतो.) अस्सं !! ठुमऱ्या गातात लेकाचे–अरे, हे काय वाटेल त्याचं काम आहे ? (छातीला हात लावून) इथं दर्द पाहिजे. कलकत्त्याची गौहरजान ठुमऱ्या गायची तुला सांगतो श्यामभय्या,—बस्स ! जान कुर्बान करून टाकावा तिच्या एकेका स्वरावरून !—हायहायहाय !! ह्या, ह्या दिवाणखान्यात गाणं झालं होतं–आठवतं की नाही वाश्या—

वासू : का नाही आठवणार ?–आम्ही चोरून ऐकलं होतं—

श्याम : चोरून ?

वासू : काय बिशाद होती आमची लहानपणी बापूभय्यांच्या पुढे यायची—(तोंडावर हात मारीत) बबबब–हंटरखाली फोडून काढलं असतं नाऽ ! श्यामभय्या, तुमच्या आजोबांचा दरारा म्हणजे काय ? नाही म्हणजे तसे प्रेमळ

होते–माझ्या मुंजीत आपल्या हातांनी ही भिकबाळी घातली होती त्यांनी माझ्य कानात. आता पोरांच्या मुंजी झाल्या आमच्या–ही म्हणत होती, काढा भिकबाळ अन् घाला पोराच्या कानात—मी साफ सांगितलं, भिकबाळीच्या कानाला हा लावू देणार नाही तुला. नोकर चाकर म्हणून भेदभाव नाही केला माझ्य अन्नदात्यानं—काय काकाजी, आठवतं ना—लहानपणी तुझ्या काकाजींनी आणि माझ्या तात्यांनी काही तरी खोडी केली, तर पहिला रट्टा हाणला काकाजींन आणि दुसरा आमच्या तात्यांना—गेलं सगळं वैभव—सगळ्या वाड्यात नुसतं झुंबरं हंड्या–लखलखाट—नवरात्रात पूजा व्हायची वाड्यावर, तर सारं इंदू लोटत असे भय्या, 'देवीच्या दर्शनाला. काय गाणी–काय वाजवणी–रोजी तीन तीनशे रुपयांचा केशराचा हिशेब मांडलाय आमच्या तात्यांनी—

[वासूअण्णांचे भाषण चालू असताना काकाजींचे डावातले लक्ष उडून ते तंद्री लागल्यासारखे शून्यात पाहत बसतात.]

**श्याम :** काकाजी–डावात लक्ष द्या.

**काकाजी :** नाही बेट्या, तुला नाही कळायचं ते—त्या मैफली डोळ्यांपुढे दिसताहेत—जोहराबाई–जानकीबाई–शंकररावजी आपटे, माधवभय्या चौघुले–सखारामजी पखवाजिये–ओ हो हो हो–व्हॉट वंडरफुल डेज–वंडरफुल् इंडीड—

**वासू :** कसले वंडरफुल म्हणा–ह्या इंदुरात सहा बिल्डिंगा होत्या—आपण तर भय्या, त्या रस्त्यानं देखील जात नाही कधी—

**जगन्नाथ :** नुसत्या सहाच बिल्डिंगा?–चार मोटारी, दोन घोड्यांची बगी भूल गये क्या दिवानजी—

**वासू :** भुल्तोस कसा बाबा?–काही भुललो नाही बरं–ह्या घरचं मीठ खाल्लंय आमच्या डिके घराण्यानं गेल्या कित्येक पिढ्या—

**जगन्नाथ :** आमच्या देखील—

**वासू :** तुझ्या आजोबाच्या काळात मोटारी होत्या काय रे जगन्या?

**जगन्नाथ :** अरे, पण घोडागाड्या होत्या ना भय्या–सोन्याचा पत्रा मारलेल्या? बस्स–षौक केला यार त्या लोकांनी–पड्यावरल्या बायांची नाचगाणी पाहून खुषी मानायचे दिवस नव्हते ते—खऱ्या खऱ्या बाया—बस गुजर गया जमाना अब रहाही क्या है—

**वासू :** कसला जमाना लेका–एक चाळ राहिली इतक्या इष्टेटीतली—
**जगन्नाथ :** मग काय झालं? उद्या श्यामभय्या इंजनेर झाले म्हणजे देतील उठवून दहा बंगले—
**वासू :** अरे, पण इष्टेट टिकवली असती तर आज श्यामभय्याला कशाला कॉलेजात जाऊन पुस्तकांत मगजमारी करावी लागली असती? काकाजींना आयुष्यभर जंगलखात्यात नोकरी का करावी लागली असती? सगळे पैसे खाऊन गेल्या त्या गझलकवालीवाल्या.
**भिकू :** थूत! काकाजी, एक शेर ऐकवून देऊ का ह्या दिवाणजीला—
**काकाजी :** जरूर–जरूर.
**भिकू :** शेर अर्ज है—
**काकाजी :** हां–मुलाहिजा फर्माइये.
**भिकू :** शायर म्हणतो, लुत्फे मय् तुझसे क्या कहूँ जाहिद (वासूअण्णाखेरीज सर्वजण शेराचा एवढा चरण मुशाहिऱ्याच्या पद्धतीने म्हणतात) हाय कंबख्त! तूने पीही नहीं. (वासूअण्णाशिवाय सर्वजण 'वाहवा खूप खाशी'ची फैर उडवतात. जगन्नाथ ड्रायव्हर भिकू माळ्याला कंबरेला मिठी मारून उचलतो.)
**काकाजी :** सुभानअल्ला! बहुत खूप! वाहवा! वासूअण्णा, कळला का मतलब?
**वासू :** हो! असल्या शेरपावशेरातच सगळ्या इष्टेटी गेल्या.
**काकाजी :** अरे यार, गेल्या तर गेल्या! बाकी तुला काय कळणार म्हणा! पिढीजात कारकून लेको तुम्ही. त्या पुण्यामुंबईकडे तुमचीच कढीचट अवलाद आता घरं बांधून राहिली आहे. आयुष्यभर सकाळी साध्या वरणाबरोबर फोडणीचा भात आणि रात्री फोडणीच्या वरणाबरोबर साधा भात खाऊन कवडी कवडी जोडायची आणि शेवटी श्रमसार्थक किंवा असंच काही तरी नाव देऊन डेक्कन जिमखान्यावर बंगला नावाची भाड्याची चाळ बांधायची—झाली आयुष्याची इतिकर्तव्यता—शायर म्हणतो तेच खरं आहे–लुत्फे मय् तुझसे क्या कहूँ जाहिद हाय कंबख्त तूने पीही नहीं—अरे यार, या शराबीची चव तुला सांगून काय उपयोग आहे? अभाग्या, तू कधी प्यालासच नाही! वाहवा माळीबुवा, कमाल केली भय्या तुम्ही आज! हाय कंबख्त तूने पीही नहींऽऽ! पी पी भरपूर पिऊन घे—

**वासू** : अहो भलतंच काय बोलता हे काकाजी–अहो पिऊन काय घे ? आफत् आहे भय्या.

**भिकू** : कसली आफत ? काकाजी तुम्हांला काय प्या म्हणून सांगून राहिले आहेत ?

**वासू** : अॅ हॅ हॅ हॅ ! इतका काय मी पागल नाही आहे ! प्यायला म्हणजे काय गाईचं दूध नाही प्यायला सांगत–(त्याला एकदम काहीतरी आठवतं आणि डोक्यावर पाल पडल्यासारखा खुर्चीवरून उडी मारून उठतो व श्यामकडे धावत जातो.) गाईचं दूध ! गाईचं दूध–श्यामभय्या—

**काकाजी** : अरे, काय झालं ?

**श्याम** : काकाजी, उंट मेला !

**वासू** : श्यामभय्या, उंट नाही मेला. आपण सगळे मेलो.

**काकाजी** : ए, सकाळीच गोळी लावून आलास की काय वाश्या ?

**वासू** : नाही काकाजी–हे पाहा–(खिशातून डायरी काढून पानं उलटतो.) हे पाहा–गाईचं दूध–हातसडीचे तांदूळ–घाणीवरचं तेल–मनुका—

**श्याम** : काका–मला वाचवा–(एकदम उठतो आणि धावत आत जातो...आतून खांद्यावर कोट आणि डोक्यावर पांढरी टोपी घालून येतो.) चला चला वासू-अण्णा—

**काकाजी** : अरे, पण हा इतका शोर कसला मचून राहिला आहे ?

**श्याम** : माळीबुवा, हार कुठे आहे ?

**भिकू** : हा काय !

**काकाजी** : अरे, पण मामला काय आहे कुणी सांगेल की नाही ? ए वासू, एवढा हुक्का भरून आण. निखारे विझले.

**वासू** : काकाजी, त्यातले चार निखारे माझ्या माथ्यावर ठेवून द्या आता. श्यामभय्या, निघा. टोपीचा कोन ठीक आहे—

**काकाजी** : अरे, पण धमाल कसली मचली आहे कोणी सांगेल की नाही ?

**श्याम** : काकाजी, आज पंधरा तारीख. उषाताई जाताना बजावून गेली होती आज पहाटे. तरी मी सांगत होतो तुम्हांला वासूअण्णा, तुमचीही यार कमाल आहे !

**वासू :** माझी कसली कमाल? नाही म्हणजे आहे–तशी थोडीशी कमाल आहे–कबूल आहे, पण गेले तीन दिवस अस्सल मध, हातसडीचे तांदूळ, हातांनी पिसलेला आटा, काळ्या मनुका, गाईचं तूप, हे सगळं जमवता जमवता आपली तर भय्या, जान निकलून गेली.

**काकाजी :** वासू जरा बस पाहू. अरे ही कसली यादी? हातसडीचे तांदूळ–मध–कुठे कोणी बाळंतीण बिळंतीण येणार आहे का?

**वासू :** बाळंतीण?

**काकाजी :** मग हे हातसडीचे तांदूळ आणि गाईचं तूप कोणासाठी?

**वासू :** अहो, पुण्याहून आपल्या उषाताईंनी आचार्य पोकळे गुरुजींना बोलावलंय.

**श्याम :** पोकळे गुरुजी नाही यार–पोफळे गुरुजी.

**वासू :** अरे यार. आम्ही कुठे वाचतो अखबार? तर ते पोफळे गुरुजी यायचे आहेत ना, त्यांची तयारी आहे सगळी. बाकी तुम्हांला काय पता काकाजी म्हणा! आयुष्य काढलं तुम्ही जंगलात नौकरीमागे. पेन्शन बसली तरी जंगलात राहायचा शौक चालूच आहे तुमचा. केव्हाही उठता न् चालले जाता शिकारीला. आता काय एखादी गोळी बिळी उरली असेल तर द्या आमच्या माथ्यात मारून.

**काकाजी :** कोण आहे बे हा आचार्य पोफळे गुरुजी? आणि आचार्य आणि गुरुजी असं डबल ब्यारलवालं नाव का लावतो हा?

**वासू :** आता आम्ही कुठे पाह्यलंय भय्या त्यांना? आपण तर ह्या इंदुरात मोठा माणूस पाहिला म्हणजे आपले अन्नदाते बापूभय्या. उषाताई सांगत होत्या की, कुणी महान पुढारी आहे.

**काकाजी :** पुढारी? आणि आपल्या घरी उतरणार? ह्या उषाची देशसेवा भलतीच बढत चालली आहे यार. आणि ती कुठे गेली मग?

**श्याम :** ती गेली पहाटे पाच वाजता उठून झेंडावंदन करायला. आजपासून तिच्या भगिनी शिक्षा मंडळाचं शिबिर सुरू होतंय.

**काकाजी :** शिबिर? म्हणजे काय लढाईला निघाल्या आहेत की काय ह्या भगिनी कुठं? शिबिर काय? महाभारतात कौरवपांडवांची शिबिरं असायची. आणि हे आचार्य काय करणार आहेत त्या शिबिरात येऊन?

**श्याम :** ते बौद्धिक घेणार आहेत महिनाभर.

**काकाजी** : काय ?
**श्याम** : बौद्धिक ! आम्हांलासुद्धा ताकीद आहे उषाताईची व्याख्यानाला हजर राहायची. आणि उषाताईंनी एकदा हुकूम दिला की जबाब नाही मग—
**काकाजी** : अरे मग त्याला गाईचं तूप आणि हातसडीचे तांदूळ कशाला हवे ? काय यज्ञबिज्ञ आहे की काय ?
**वासू** : होळी आहे होळी—आमची ! किती वाजले—(भिंतीवरच्या घड्याळाकडे पाहतो.) हे तर घड्याळ बापूभय्या गेले तेव्हापासून बंदच आहे.
**श्याम** : (पळत आत जाऊन आपले रिस्टवॉच आणतो.) बापरे—दहा वाजले.
**वासू** : दहा ?—साडेनऊला गाडी येते इंदूर स्टेशनात. उषाताई बजावून गेल्या होत्या, बरोबर नऊ वाजता स्टेशनवर मोटार घेऊन जा आणि हार न्या म्हणून. (टेलिफोनची घंटा वाजते.) काकाजी, उषाताईंचाच फोन दिसतो. तुम्ही घ्या आणि म्हणावं—आम्ही मघाशीच गेलो.
**श्याम** : हो हो—मघाशीच गेलो. (जाऊ लागतात—काकाजी फोन घेतात.)
**काकाजी** : हत् डरपोक ! हॅलो—कोण—डॉक्टर सरदेसाई (टेलिफोनवर हात ठेवून श्यामला)—हा डॉक्टर सरदेसाई कोण आहे ?
**श्याम** : हात्तीच्या. सतीश सरदेसाई. डॉक्टर आहे. क्रिकेट काय खेळतो काकाजी ! (आपण फोन घेतो.) हलो—काय सतीश ? हो हो श्याम—पोफळे गुरुजी—हो हो—ऑ—काय म्हणालात ? नीट ऐकू नाही आलं. भेटायचं ? कुणाला ?
**वासू** : (हळूच) श्यामभय्या—श्यामभय्या—त्याला विचारा गाईचं तूप आहे का. ह्या डॉक्टर वैद्य वगैरे लोकांकडे असतात असल्या गोष्टी.
**श्याम** : (फोनवर) गाईचे तूप आहे का तुमच्याकडे ? नाही नाही. ह्या पोफळे गुरुजींना गाईचं तूप लागतं म्हणे. (एकदम हसू लागतो.)
**काकाजी** : काय रे श्याम ?
**श्याम** : काकाजी, डॉक्टर म्हणतात म्हशीच्या तुपात हळद मिसळून बनवा गाईचं तूप !...हां हां—नाही नाही—आमचे काकाजी आहेत—या या—अच्छा (फोन ठेवतो.) चला वासूअण्णा—(पुन्हा फोन वाजतो.) हलो—देवासकरांचा वाडा—नाही—आचार्य पोफळे गुरुजी नाही आले—कोण आपण ?—बद्रिनारायण मुखडमल ? नमस्ते—हो—नमस्ते—नमस्ते—हो हो नमस्ते—(फोन ठेवतो.)

**काकाजी** : ह्या बनियाला काय करायचं आहे आचार्यांला भेटून? आचार्य म्हणजे काय इन्कमटॅक्स एक्स्पर्ट वाटला की काय त्याला?

**श्याम** : काकाजी–बद्रिनारायण राहू दे तूर्त. पण आता ह्या आचार्यांना शोधायचं कुठे सांगा–(पुन्हा टेलिफोन बेल वाजते.)–हलो, हो देवासकरांचा वाडा–नाही नाही–सुश्री कोण म्हणालात?–इथं नाही कोणी सुश्री...अं?–उषा देवासकर–मग सुश्री काय म्हणालात?–चुकून?...श्रीमती...नाही नाही कुमारी उषा देवासकर–ती नाही घरात–मी भाऊ आहे तिचा–ती शिबिरात गेली आहे–शिबिर–हो रामबागेत आहे–नाही नाही, आचार्य नाही आले अजून–कुठे आहेत? आम्ही देखील त्याच काळजीत आहोत. (फोन बंद करतो.)

**काकाजी** : मुसीबत आहे यार! अरे हे काय घर आहे की रेल्वेचं इन्क्वायरी ऑफिस?

**वासूअण्णा** : श्यामूभय्या, चला आता स्टेशनावर—

**श्याम** : आता स्टेशनावर जाऊन करा काय? काय प्लॅटफॉर्म झाडायचाय? (पुन्हा फोन येतो.) वासूअण्णा, फोन घ्या—

**वासूअण्णा** : हलो श्टॉप श्टॉप हं जरा–श्यामभय्या, हा तर बेटा इंग्लिश बोलून राह्यलाय—

**श्याम** : (फोन घेतो.)–हलो–गुड मॉर्निंग–यस प्लीज–नो, ही हॅजन्ट अराइव्ह्ड–ओ आय सी–नो, नॉट यट–सर्टन्ली–नो प्लीज–डोंट मेन्शन–(टेलिफोन बंद करून) कावसजी शापुरजी—

**काकाजी** : ह्या दारूवाल्याला काय करायचाय आचार्य?

**श्याम** : त्यानं कुठं तरी नीराकेंद्र उघडलंय म्हणे–आचार्य केंद्राला भेट देऊ शकतील का विचारीत होता—

**वासू** : श्यामभय्या, चला आता–निदान उषाताईंना आपण स्टेशनवर गेलो होतो एवढं तरी सांगता येईल– (पुन्हा टेलिफोन बेल वाजते.)

**श्याम** : हलो–देवासकरांचा वाडा–नाही, आचार्य नाही आले अजून–बरं! (जायला निघतो, पुन्हा टेलिफोन बेल वाजते.) देवासकरांचा वाडा–आचार्य नाही आले अजून. (टेलिफोन ठेवतो–लगेच बेल वाजते.) देवासकरांचा वाडा–आचार्य नाही आले अजून. (रिसीव्हर ठेवतो. पुन्हा बेल वाजते. श्याम

रिसीव्हर न उचलताच) हलो-देवासकरांचा वाडा—(वासूअण्णा फोन उचलून श्यामच्या हातात देतो.) आचार्य नाही आले अजून (दोघेही जाऊ लागतात. पुन्हा बेल वाजते.) हलो–कोण–नवतरुण मंडळाचे चिटणीस? रॉंग नंबर!– आं! तुम्ही चिटणीस होय?–नाही नाही, आचार्य आले नाहीत अजून!... कुठे गेले?–आम्हांला काय ठाऊक? (काकाजी उठतात आणि रिसीव्हर काढून ठेवतात.)

**काकाजी** : अरे यार, ह्या आचार्यांनं काय कुठल्या सिनेमाबिनेमात काम केलं की काय...भलताच पॉप्युलर दिसतोय.

**श्याम** : ह्या उषाताईचा असा संताप येतो—

**वासू** : श्यामभय्या, कसं झालं तरी मोठी बहीण आहे ती तुमची.

**श्याम** : मी तिला कुठे नको म्हणतोय देशसेवा करायला? पण आम्हांला का ताप? परवा, बरं का काकाजी, आमची एक फ्रेंड आली होती.

**काकाजी** : तुमची फ्रेंड?

**श्याम** : हो. आता फ्रेंडच नाही तर काय?–फारसखानेवाल्यांची सुषमा—

**काकाजी** : सुषमा? आणि ती हेमा की कोण होती तुझी फ्रेंड तिचं काय झालं?

**श्याम** : आमच्या सगळ्या फ्रेंड्सचं काय व्हायचंय काकाजी? कुणातरी दुसऱ्याशी लग्न! त्या हेमाला गाणं आवडायचं! मी व्हायोलिनच्या क्लासात नावदेखील घातलं होतं–आता आमचं व्हायोलिन पडलंय धूळ खात.

**काकाजी** : बरं जाऊ दे–सुषमाचं काय झालं? तिला काय आवडतं?

**श्याम** : पार्टनर होती न आमची ती बॅडमिंटन् टूर्नामेंट्स्मधे—

**काकाजी** : हं–(खवचटपणाने खोकतात.)

**श्याम** : खोकण्यात काही अर्थ नाही काकाजी–इट्स् ऑल गॉन नाऊ! उषाताईची ओळख करून देण्यासाठी म्हणून मी आणली तिला आणि आमच्या ताईसाहेबांनी ग्रामोद्योग आणि स्त्रियांची कर्तव्यं ह्या विषयावर दीड तास बौद्धिक घेतलं तिचं. तिच्यावर आधी लिपस्टिक् लावते म्हणून उखडली. तिच्या दोन शेपट्यांवर तुटून पडली. तिचे सॅंडल्स, पर्स, जे जे काही म्हणून दिसलं त्याच्यावर सुचेल ते बोलली तिला. तुम्ही पाहिली आहे ना सुषमाला काकाजी?

**काकाजी :** आमच्या फरासखानेवाल्याची पोरगी ना ? अरे तिचा बाप आणि मी मॅट्रिकला जोडीनंच नापास झालो होतो.

**श्याम :** असु द्या काकाजी, पण सुषमा फार चांगली आहे. (एकदम भयंकर वैतागाने) छे ! !

**काकाजी :** काय झालं रे ?

**श्याम :** व्हायचंय काय ? पुढल्या आठवड्यात दिलीप पोतदारशी लग्न ! ! हे ग्रामोद्योगाचं बौद्धिक आमच्या ताईचं. आपले उद्योग सोडून आमच्या भानगडीत पडायला सांगितलं होतं कोणी हिला ? नॉन्सेन्स् !

**काकाजी :** जाऊ द्या यार ! गालिबचा एक शेर आहे—

**वासू :** (इतका वेळ खिडकीतून बाहेर पाहात असतो. शेर हा शब्द ऐकल्या-बरोबर तीरासारखा धावत येतो.) काकाजी, पाया पडतो तुमच्या. पुन्हा ह्या शेराशिराचं लफडं काढू नका. श्यामूभय्या, तुम्ही चलता का ? का मी जाऊ टांगा घेऊन एखादा ?

**काकाजी :** जा जा. नाहीतर...सगळे उद्योग हातांनी केले पाहिजेत म्हणतात ना हे आचार्य लोक ? मग हातगाडीवर घालून आण त्याला.

**श्याम :** काकाजी, माचीस द्या. (काकाजी त्याला काड्याची पेटी देतात. तो सिगारेट पेटवणार इतक्यात बेल वाजते.)

**वासू :** आले वाटतं आचार्य. श्यामभय्या, सिगरेट बुझवा. (श्याम सिगारेट विझवतो—वासूअण्णा हुक्का आत नेऊ लागतात.)

**काकाजी :** वासूअण्णा, हुक्का ठेवा तिथं.

**वासू :** अहो पण आचार्य—

**काकाजी :** सांगतो ते ऐका. ह्या घरात आजपर्यंत कुठलीही गोष्ट कुणालाही चोरून झाली नाही. खरी लोकशाही आहे म्हणावं इथं. कशावरही बंदी नाही. (पुन्हा बेल वाजते.)

**वासू :** वास्तविक (नग्न पुतळ्याकडे बोट दाखवीत) हा पुतळा देखील उचलायला हवा होता.

**काकाजी :** का ?

**वासू :** ('आता का ते काय सागू कपाळ?' अशा हताशपणाने) आता का? अहो, आचार्यांना काय वाटेल?

**काकाजी :** तू किती वर्षं पाहतो आहेस हा पुतळा?

**वासू :** मी काय? ल्हानपणापासून पाहतोय. आमची एक आपली नजर मेली आहे. पण आचार्य—

**काकाजी :** त्यांचीही मरेल. जा, दरवाजा उघड आधी. हाय. कंबख्त तूने पीही नहीं—

[वासू दरवाजा उघडायला जातो, श्याम टोपीचा कोन पुन्हा एकदा नीट करतो आणि अचार्यांच्या स्वागतासाठी तयार राहतो. डॉ. सतीश सरदेसाई येतो. सतीशचे वय पस्तिशीच्या आसपास आहे. त्याने निळा ब्लेझरचा कोट घातला आहे. फ्लॅनेलची पांढरी पँट-त्याच्या हातात एक झिप्‌ची कातडी बॅग आहे. ह्याचे बोलणेचालणे मोठे ऐटदार आहे. कुणालाही आवडावे असे व्यक्तिमत्त्व.]

**श्याम :** ओऽ! डॉक्टर सतीश सरदेसाई (हार आपल्या खांद्यावर टाकतो.)

**सतीश :** अरे वा! आज काय ह्या वाड्यात येणाऱ्या जाणाऱ्या प्रत्येकाचं हारतुऱ्यांनी स्वागत आहे की काय?

**श्याम :** नाही हो. आम्हांला वाटलं आचार्यच आले. काकाजी, हे डॉक्टर सतीश सरदेसाई. मार्तंडचौकात दवाखाना आहे ह्यांचा. आणि क्रिकेट काय खेळतात हे काका—

**सतीश :** श्यामभय्या, मला वाटतं पुष्कळ झाली नाही माझी ओळख?

**श्याम :** हे आमचे काकाजी—

**सतीश :** मी नावानं चांगलंच ओळखतो. बाकी इंदुरात कोण ओळखत नाही म्हणा आपल्याला?

**काकाजी :** अरे यार, कोण कशाला ओळखतो आम्हांला? आयुष्याची तीस पस्तीस वर्षं तर काढली जंगलात-नौकरीच्या मागे-हां-त्यापूर्वी—

**सतीश :** त्यापूर्वीचंच म्हणतोय मी. आमचे पेशंट्स काही काही कथा सांगतात आपल्या.

**काकाजी** : हां–था एक जमाना. तुम्ही तो शेर ऐकलाय की नाही गालिबचा–
इष्कने गालिब निकम्मा कर दिया—

**सतीश** : वर्ना हम भी आदमी थे काम के–क्या बात है—

**काकाजी** : काय वासूभय्या, मतलब आला की नाही तुमच्या ध्यानात? ह्या प्रेमानं मला हे असं कुचकामी करून टाकलं–नाही तर हम भी आदमी थे काम के—

**सतीश** : आम्हीही काही करू शकलो असतो.

**काकाजी** : हां! यह बात है! बस्स–प्रेम करावं तर त्याच भाषेत. काय डौल आहे यार—

**सतीश** : कुठल्याही भाषेत प्रेम करावं काकाजी, पण—

**काकाजी** : प्रेम करावं! वाहवा! डॉक्टरकीत रसिकता मेली नाही तुमची! बसा! नाहीतर काही काही डॉक्टर काय बेसूर असतात यार...अरे रामरामराम –असं वाटतं की, याला आधी औषध पिलावून द्या. बरं ए वासूअण्णा, पाहुणे आले आहेत प्रथमच आपल्या घरी.

**सतीश** : प्रथमच नाही हं. पूर्वी आलोय मी इथं. आपण त्या वेळी मला वाटतं फॉरेस्ट ऑफिसर होतां.

**काकाजी** : हां. गेल्या वर्षीच तर रिटायर होऊन बसलोय घरी. अच्छा मग काय घेता?

**सतीश** : काहीही चालेल. म्हणाल तर गाईचं दूध, तूप–(सगळेजण हसतात.) तूर्त हुक्का तर द्या.

[काकाजी सतीशला हुक्का देऊ लागतात इतक्यात उषा येते. सत्तावीस-अठ्ठावीस वर्षांचं वय. खादीची साडी नेसली आहे. गळ्यात खादीची पिशवी अडकवली आहे. चेहऱ्यावर विलक्षण हुषारीचे तेज आहे. बोलण्यात करारीपणा दिसतो.]

**उषा** : (संतापून) छान! हे धंदे चालले आहेत वाटतं!

**काकाजी** : अरे बेटा, हा तर अस्सल ग्रामोद्योग आहे.

**उषा** : अक्षर बोलू नका! (तिची नजर सतीशकडे जाते. एक क्षणच दोघेही एकमेकांकडे पाहतात.)

**काकाजी** : ओळखतेस का बेटा तू यांना?

**उषा** : (सतीशकडे पुन्हा पाहते.)

**सतीश** : मी ओळखतो. त्यांनी नाही मला ओळखलं.

**उषा** : (त्याच्या बोलण्यातला ध्वनी आपल्या लक्षात आला आहे हे न दाखवण्याचा प्रयत्न करते.) श्याम! काल काय बजावलं होतं रे तुला मी? आचार्यांना मोटारीतून घेऊन सरळ शिबिरावर यायला सांगितलं होतं ना? गाडी येऊन तास झाला. आचार्यांचा पत्ता नाही. तिथं वाट पाहतोय आम्ही. पत्रकार आले होते, पाहुणे आले होते, सगळा कार्यक्रम संध्याकाळवर ढकलला. आणि वासूअण्णा, तुम्ही?

**वासू** : (भयंकर गांगरून) मी? मी ना? मी जरा गाईच्या तुपात अडकलो होतो–(उषाखेरीज सर्व हसतात.) हसा तुम्ही आता श्यामभय्या.

**उषा** : हसायला काय झालं रे श्याम? आणि शंभर वेळा फोन केला. सारखा एंगेज्ड–एंगेज्ड–कुणाशी बोलत होतास इतका वेळ? अस्सं!–रिसीव्हरच काढून ठेवलाय होय?

**श्याम** : अग, मग काय करायचं?–शंभर फोन आले असतील पाच मिनिटांत. आचार्य आले का? आचार्य आले का? आचार्य आले का?

**उषा** : मग असं काय महत्त्वाचं काम होतं? दिली असतीत उत्तरं तर? (बुद्धिबळाकडे तिचे लक्ष जाते.) अस्सं. बुद्धिबळ चाललं होतं होय काकाजी? तरी बजावलं होतं. वासूअण्णा, त्या सोंगट्या विहिरीत फेकून द्या.

**सतीश** : विहिरीत कशाला फेकता?

**उषा** : काय झालं फेकल्या म्हणून?

**सतीश** : अहो, लाकडी हत्ती घोडे ते. विहिरीत बुडणार आहेत थोडेच?

**उषा** : बरं पण आता कोणी आचार्यांना शोधून आणणार आहे का? की ती वणवण देखील मीच केली पाहिजे?

**श्याम** : पण आता सापडायचे कसे ते?

**सतीश** : त्यात काही कठीण नाही श्यामभय्या. हजार लोकांत आचार्य माणूस सटकन् ओळखता येतो.

**उषा** : मला वाटतं आचार्यांबद्दल अशा हेटाळणीच्या स्वरांत बोललं पाहिजे असं नाही.

**वासू** : नाहीतर काय ?

**उषा** : वासूअण्णा–श्याम–तुम्ही निघा पाहू गाडी घेऊन. आपण कुणाला भेटायला आला होता ? (हा प्रश्न सतीशकडे पाहून अत्यंत थंडपणाने विचारते.)

**काकाजी** : (त्यांचा एकमेकांच्या नजरा चुकवण्याचा प्रयत्न लक्षात येऊन) छे छे छे हे निखारे तर केव्हाच विझले आहेत. वासूअण्णा, एवढे निखारे आणा जरा फुलवून आणि मग जा.

**उषा** : वासूअण्णा, आधी निघा पाहू. पाच मिनिटं नाही हुक्का ओढला म्हणून काही जीव जात नाही कुणाचा !

**काकाजी** : कुणाचा जीव कुठं, केव्हा आणि कशामुळे जाईल याचा नेम नसतो पोरी. बसा बसा डॉक्टरभय्या. मी आले आत्ता. अहो षौक करायचा म्हणजे अशी खिदमत करावी लागते ह्या हुक्याची.

[जाताना 'मोरे नैन लागे उनसे' असे ठुमरीचे चरण गुणगुणत जातात. सतीश त्यांच्याच सुरात 'जिया चाहे सो करे' हा चरण पुरा करतो. आता उषा आणि सतीश दोघेच रंगभूमीवर आहेत. उषा बुद्धिबळाचा पट काढून टेबलाच्या मोठ्या खणात ठेवून देते. द्वार वेडावाकडा पडला आहे तोही नीट ठेवते. जणू काय हॉलमधल्या वस्तू जागच्या जागी आहेत की नाहीत हे पाहण्यासाठी नजर दुसरीकडे वळवते. शेवटी अगदी रुक्षपणाने काही तरी बोलायलाच हवे म्हणून बोलल्यासारखी बोलते...]

**उषा** : हं, काय म्हणतंय तुमचं सूतिकागृह ?

**सतीश** : सूतिकागृह काय म्हणणार ? नियमितपणे बायका येतात आणि मातृत्वाची पदवी घेऊन जातात. मुलगा झाला की आनंदानं बेहोष होतात; मुलगी झाली तर बेटर लक नेक्स्ट टाइम् असं म्हणून समाधान मानून घेतात. काही बायकांची समजूत काढून मुलगी होणंच कसं चांगलं वगैरे पटवतात त्यांना आमच्या नर्सबाई

**उषा** : नर्सबाई—

**सतीश** : हं, सुशीलाबाई म्हणून आहेत. चांगली आहे बिचारी.

**उषा** : अस्सं !

**सतीश** : 'अस्सं–' हे सहज म्हटलं असेल तर माझी काही हरकत नाही.

**उषा** : म्हणजे !

**सतीश** : तसं नाही—एखाद्या नर्सची डॉक्टरच्या तोंडून तारीफ ऐकली की त्या अस्संला जरा निराळा वास येतो—

**उषा** : (आता जरा विशेष रोखाने) अस्सं!

**सतीश** : नाही नाही–'तस्सं' काही नाही. सुशीलाबाई म्हणजे वय वर्षे पन्नास! त्यांचा जावई आमच्या दवाखान्यात कंपौंडर आहे.

**उषा** : मी कुठं काय म्हणत होते? इतक्या माहितीची काही गरज नव्हती. पण आपण आज इथं कुठं?

**सतीश** : अस्सं! म्हणजे आदर कायम आहे अजून आमच्याबद्दल.

**उषा** : कशावरून?

**सतीश** : 'आपण आज इथं कुठं' म्हणालीस. 'आपण' हे व्याकरणात आदरार्थी बहुवचन की काहीतरी आहे ना?

**उषा** : वा! बऱ्याच गोष्टी लक्षात आहेत की तुमच्या.

**सतीश** : गुड्! आपणावरून तुमच्यावर आलीस. नॉट् बॅड्.

**उषा** : काही विशेष काम?

**सतीश** : काही नाही. तुमच्या काकांनी बसा म्हणून सांगितलंय. वडिलांची आज्ञा मानली पाहिजे. (बसतो.) मला वाटतं तेवढा तो रिसीव्हर उचलून ठेवला तर बरं होईल. नाहीतर एंगेज्ड नसताना एंगेज्ड असा गैरसमज व्हायचा. बाकी आयुष्यात हौसेनं म्हणून कुठं बोलायला जावं आणि एंगेज्ड असं कळावं, हा अनुभव काही फोनच्याच बाबतीत असतो असं नाही म्हणा!

**उषा** : हं. बऱ्याच ठिकाणी बोलून पाहिलेलं दिसतंय.

**सतीश** : नको बोलायला? पंधरा सप्टेंबर एकोणिसशे–(ओठातल्या ओठात पुटपुटत) बरोबर आठ वर्षं झाली तू नाही म्हणालीस त्याला. "तुझ्यापेक्षा राष्ट्राला माझी गरज अधिक आहे." हे तुझं शेवटचं वाक्य आठ वर्षांपूर्वी संध्याकाळी यशवंत सागराच्या तीरावर मी ऐकलं. त्यानंतर स्वातंत्र्य मिळालं. मी डॉक्टर झालो. तूही बी. ए. झालीस. मला वाटतं पन्नाससाठ व्याख्यानंही झाली तुझी त्यानंतर. वर्तमानपत्रांत दोनचार वेळा फोटोही पाहिल्यासारखं वाटलं. खाली नाव नसल्यामुळे तो तुझाच आहे अशी मनाची समजूतही करून घ्यावी लागली. वा! किती काळ गेला. आठ वर्षं म्हणजे तीनशेपासष्ट गुणिले आठ. . .

**उषा** : ह्या आठ वर्षांत जगात खूप घडामोडी झाल्या. पण तुमच्या स्वभावात मात्र काहीच बदल झालेला दिसत नाही.

**सतीश** : आणि तुझ्या झालाय असं वाटतं की काय तुला? अजूनही क्षिप्रेच्या काठावर बसलो, तर ती पाहा–ती पाहा बगळ्यांची माळ म्हणून ओरडशील—

**उषा** : मला नाही वाटत—

**सतीश** : हे इथं दिवाणखान्यात बसून कसं ठरवणार तू? त्याला पुन्हा अशीच एखादी सुंदर संध्याकाळ साधून क्षिप्रेवर गेलं पाहिजे.

**उषा** : आता शक्य नाही ते. ती स्वप्नं होती सगळी.

**सतीश** : कुणाला ठाऊक ती स्वप्नं होती की आता चालू आहेत ती आहेत ते! शंकराचार्य तर म्हणतात की, सगळं जगच स्वप्न आहे. फक्त ब्रह्म सत्य आहे.

**उषा** : अच्छा, मटीरिया मेडिकाच्या जोडीला शांकरभाष्यही ठेवलंय वाटतं मेडिकल कॉलेजात?

**सतीश** : दवाखान्यात येऊन पाहा, वैद्यकीच्या पुस्तकांबरोबर गीतारहस्य-शांकर-भाष्य–पतंजलियोग–सगळं काही ठेवलंय.

**उषा** : ते कशाला? त्याचा काय उपयोग?

**सतीश** : अग, प्रत्येक गोष्ट काय उपयोगासाठी ठेवायची असते? घरदार सोडून गेलेल्या गौतमबुद्धाचा पुतळा नाही आपण दिवाणखान्यात मांडून ठेवीत? आमच्या एका डॉक्टर मित्राच्या दवाखान्यात भिंतीवर नेपोलियन, महात्मा गांधी, साईबाबा आणि ग्रेटा गार्बो एका ओळीने टांगले आहेत. ज्याचं जे दैवत असेल ते त्यानं निवडून घ्यावं. मुंबईत ते फेरीवाले नाही ओरडत–दो दो आना, दो दो आना, कोई भी चीज उठाव, जर्मन मालिकका दिवाला—बस्स! तसंच स्वतः-वरच्या विश्वासाचं दिवाळं निघालं की कुठल्या तरी बाबाची आंगठी घाल बोटात, कुठल्या तरी गुरूचा मंत्र जप, कुठल्या तरी आचार्याला उठव, असं करावं लागतं. उदाहरणार्थ, आता हे आमचे मामा!

**उषा** : कोण मामा?

**सतीश** : तुमचे आचार्य पोफळे गुरुजी! ज्यांची या फोनवर सगळ्या इंदुरातून चौकशी चालली होती.

**उषा** : आचार्य तुमचे मामा?

**सतीश** : अगदी सख्खे मामा (फोनचा रिसीव्हर उचलून जागच्या जागी ठेवतो.)

**उषा** : अस्सं, म्हणजे मामांच्या दर्शनाला आली होती वाटतं इथं स्वारी.

**सतीश** : मग काय करणार ? ह्या त्या देवदेवतांनी वेळच्या वेळी दर्शनं दिली असती तर काय पाहिजे होतं—(टेलिफोन बेल वाजते.)

**उषा** : कशाला ठेवलात तो रिसीव्हर ? (फोन घेते.) हलो–हो, मी उषा देवासकरच बोलते आहे–हं–काय ग शकू–नाही नाही. आचार्य नाही आले अजून ? नाही, इथंही नाही आले अजून. (सतीश 'जो लोककल्याण साधावया जाण–घेई करीं प्राणं त्या सौख्य कैचें' हे गाणे गुणगुणू लागतो.) आता कुठे गेले ते मला तरी काय ठाऊक ? मी ? येते थोड्या वेळानं–अं ? (सतीशच्या गाण्याने तिला शकूचे टेलिफोनमधले संभाषण नीट ऐकू येत नाही.) सामुदायिक सूतकताई–अं—

**सतीश** : सॉरी–(गाणे थांबवतो.)

**उषा** : हो हो, तुम्ही सामुदायिक सूतकताई करा सुरू–मी—

**सतीश** : (पुन्हा गुणगुणतो.)

**उषा** : काय म्हणालीस–अं–माझं लक्ष ? माझं लक्ष कुठंही नाही–काय बोललीस ते नीट ऐकू नाही आलं !–अग मी येते म्हटलं ना–पाहुणे ?–पाहुणे-बिहुणे कोणी नाहीत इथं—

**सतीश** : तुला जायचं असेल तर जा. मी बसेन काकाजींशी गप्पा मारीत.

**उषा** : (सतीशला) तुम्ही काय वाटेल ते करा. अग, तुला नाही ग–तुम्ही सूतकताई सुरू करा–मी आलेच–(फोन बंद करते.) हा फोन म्हणजे कटकट आहे मेली–(रिसीव्हर काढून ठेवते.)

**सतीश** : सगळं काही सापेक्ष आहे. (फोनजवळ जाऊन रिसीव्हर हातात घेतो.) हाच फोन कुणाकुणाला जिवलग मित्रासारखाही वाटत असेल ! कानगोष्टी म्हणजे अक्षरशः कानगोष्टी. (फोनमधून बोलल्यासारखा बोलू लागतो.) हलो–कोण उषा ? ही नवीन कविता आली आहे बघ अनिलांची–वाचलीस का ?–फोनवरून सांगू–(उषा निश्चल नजरेने त्याच्याकडे पाहू लागते. आठ वर्षांपूर्वीचे दिवस तिला आठवतात.)...केळीचे सुकले–केळीचे सुकले बाग–असुनिया पाणी–कोमेजलिं कवळी पानं–असुन निगराणी !–निगराणी म्हणजे ह्या केळी की नाही खूप नाजूक असतात–ह्यांची खूप काळजी घ्यावी लागते—

**उषा** : (आवेगाने)—सतीश प्लीज

**सतीश** : (फोन कानाशी लावून) काय प्लीज? बोल ना—अग, असं अर्धवट काय बोलतेस? काय? माझ्यापेक्षा 'राष्ट्राला' तुझी गरज अधिक आहे?... ओ. के. मोठी आहे—मोठी आहे तुझी भरारी—हो यशस्वी हो—ओ. के. ओ. के. बेबी—प्रेम होईना तुझ्याने प्रेम माझे राहु दे—

**उषा** : सतीश! (त्याच्या हातातला फोन काढून रिसीव्हर ठेवून देते. तिचे डोळे पाण्याने भरले आहेत. फोन वाजू लागतो. चटकन डोळे पुसून फोन घेते). हलो—काय? हो! मी उषाताई—काय रे श्याम?—आचार्य सापडत नाहीत? (वैतागून) मरू देत मग! (रिसीव्हर ठेवते.)

**सतीश** : अग अग—मामा आहेत ते माझे.

**उषा** : आता मी तरी काय करू?—आज आठ दिवस रात्रंदिवस राबते आहे मी—एकीला तरी अंग मोडून काम करावंसं वाटत असेल तर शपथ. जणू काय हे शिबिर माझं एकटीचंच आहे! आज संध्याकाळी समारंभाच्या वेळी फोटोला मात्र सगळ्याजणी येतील पुढे पुढे करायला—ह्या कलेक्टरणी अन् कमिश्नरणी. काल पंधराजणींचे फोन आले होते मला—खादीच्या साड्या कुठे मिळतात ते विचारायला! ढोंगी मेल्या—

**सतीश** : जगात जर सत्य, शिव आणि सुंदर असं काही असेल तर ते एकच—ढोंग! माणसाला स्वतःच्या अपूर्णत्वाची इतकी खात्री असते, की प्रत्येकजण कसल्या ना कसल्या तरी ढोंगाची शाल पांघरून वावरत असतो. पांघरावीच लागते. करतात काय बिचारे.

**उषा** : मेडिकल कॉलेजात तत्त्वज्ञानही शिकवतात वाटतं?

**सतीश** : कॉलेजात काहीच शिकवत नाहीत. आमच्या दवाखान्यात ये! तत्त्वज्ञानाचे प्रकांड पंडित देखील अपचन झालं की पोटातल्या वैश्वानरासाठी बाटलीभर एरंडेलाची आहुती मागायला येतात दवाखान्यात.

**उषा** : शीः!

**सतीश** : शीःऽ? शी काय? हे सत्य आहे.

**उषा** : हे कसलं सत्य?—सत्य सुंदर असतं.

**सतीश** : कुणी सांगितलं तुला? सत्याइतकं भयंकर दुसरं काही नसेल जगात.

शहाण्यानं सत्यापासून चार हात दूर राहावं नेहमी. म्हणजे डोंगरासारखं सत्यही दुरून साजरं दिसतं.

**उषा** : कुठे पाठ घेतले ह्या नव्या तत्त्वज्ञानाचे?

**सतीश** : आमच्या दवाखान्यात मुद्दाम पाठ घ्यावे लागत नाहीत. आपोआप पाठ होतं हे तत्त्वज्ञान. त्यातून माझी स्मरणशक्ती जरा विशेष चांगली, पाठांतर म्हणजे अगदी हा हा म्हणता होतं.

**उषा** : अस्सं! काय काय पाठ केलंय?

**सतीश** : काय काय पाठ म्हणून दाखवू? क्रिकेटच्या टेस्ट मॅचिसचा गेल्या वीस वर्षांतला इतिहास म्हणू? मटीरिया मेडिकातली काही प्रकरणं म्हणू? का आपलं फर्स्ट इयरपासून ते एम. बी. बी. एस. पर्यंतच्या सोबतीच्या सगळ्या पोरींची नावं म्हणू घडाघड रामरक्षेसारखी–हंऽ! (निःश्वास टाकतो.)

**उषा** : कुणाच्या नावानं निःश्वास टाकलास?

**सतीश** : टाकलास? शेवटी एकेरीवर आलीस? बरं वाटलं. सांगू कुणाच्या नावानं निःश्वास टाकला? पुष्कळ जणींच्या नावानं. फर्स्ट इयरमधली कुंदा गोखले. आम्ही काय म्हणत होतो ठाऊक आहे का तिला?

**उषा** : काय?

**सतीश** : टॉमेटो!! अग लालबुंद पोरगी! जिना चढताना पायरीगणिक एक एक हृदय तुडवीत जायची. गेल्या महिन्यात मुंबईच्या लोकलगाडीत पाहिली–मास्तरीण असावी.

**उषा** : कशावरून?

**सतीश** : आता मास्तरीण ओळखता येत नाही काय मला? शिवाय वह्यांचा गठ्ठा होता हातात आणि चालली होती मुंबईचे कॉस्मॉपॉलिटन् धक्के खात सांताक्रूझपर्यंत! दुसरी विजया कारखानीस! काय चालणं होतं तिचं? इतकी सुंदर चालायची–असं वाटे की, हिनं आयुष्यभर चालत राहावं. वर्गात आली की बॅट्समन फील्ड पाहतो ना–तशी पाहायची वर्गाकडे. मी तर एकदा मागल्या बाकावरून तिच्या दृष्टीचा कॅच पकडून दाखवला होता. (दोन्ही हातांची ओंजळ करून कॅच पकडून दाखवतो.) आणि आता पाचसहा पोरांची फैर घेऊन नवऱ्या मागून धापा टाकीत इंदूर स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवर चालताना पाहिली तिला आणि

मनात म्हटलं हाय गे उज्जयिनीऽऽ! झालंच तर ती वृंदा बारपुते. ओ माय् गॉड! पाचपाचशे कँडल पॉवरचा एक एक डोळा होता तिचा. नुसता एक डोळा मिटून जरी पाहिलं तिनं, तरी आम्ही भस्मसात व्हायचे! झालंच तर निर्मला वखारकर–शशी महूकर–शोभा पालखीवाले–कालिंदी रहाळकर. हा हन्त हन्त नलिनीम् गज उज्जहार—

**उषा** : अरे अरे अरे अरे! मग खरा निःश्वास तुझ्याच नावानं टाकायला हवा. त्यांच्या नाही.

**सतीश** : माझ्या? माझ्या नावानं का म्हणून?

**उषा** : इतक्या ठिकाणी खडे टाकून पाहिलेस. एकही नेम लागला नाही ना तुझा?

**सतीश** : कुणी टाकले खडे? मी? नॉन्सेन्स. ही यादी केवळ कलेसाठी कला म्हणून ध्यानात राहिली माझ्या. तुला काय वाटलं की, ही माझ्या हातून हुकलेल्या प्रेयसींची नामावळी आहे? माफ करा मिस देवासकर, ह्यांपैकी एकाही अप्सरेच्या हातून तपोभंग होऊ शकला नाही आमचा—

**उषा** : ओ हो हो हो! तपोभंग? अशा कुठल्या देवतेला प्रसन्न करायचं होतं?

**सतीश** : होती–होती एक उग्रचंडी—

**उषा** : उग्रचंडी?

**सतीश** : हं! कधी गौरीसारखी अल्लड, कधी पार्वतीसारखी निग्रही, कधी उमेसारखी प्रेमळ तर कधी साक्षात महिषासुरमर्दिनी–अशी अनेक रूपं धारण करणारी देवता होती पण...

**उषा** : (त्याचं पुढलं वाक्य ऐकायला काहीशी आतुर...) का, थांबलास का?

**सतीश** : जाऊ द्या. जखमेवरच्या खपल्या बेतानं काढाव्या. उगाच नाही तर पुन्हा भळभळ रक्त वाहायला लागायचं.

**उषा** : डॉक्टर लोकांना जखमेचं काय?

**सतीश** : अजून सगळ्या जखमांवर अक्सीर इलाज सापडले नाहीत उषाताई.

**उषा** : अच्छा! अजून कविता वगैरे करता वाटतं. ह्रदयाची जखम–दर्द ए दिल–वगैरे. काकाजी सुनवत असतात अधूनमधून. काव्य! हुंः! ऐदी मनाला बरं असतं हे असल्या काव्याचं मालीश.

**सतीश** : कुठल्या आचार्यांच्या बौद्धिकातलं वाक्य म्हणालीस हे? ऐदी मनाला काव्याचं मालीश काय? ह्या तुझ्या आचार्यमंडळींना बाकी मालीश, आहार, उपास ह्यांखेरीज दुसरं येतंय काय म्हणा! शरीराचे मोठे मस्त लाड करून घेतात बेटे एखाद्या नटीसारखे.

**उषा** : हे पाहा, ज्या विषयातलं आपल्याला कळत नाही, त्यातलं बोलू नये शहाण्या माणसांनी–उपासात कसले आले आहेत रे शरीराचे लाड?

**सतीश** : वा! अग, उपासाइतके शरीराचेच काय पण मनाचे देखील लाड इतर कुठे होत नसतील. आधी तो उपास जाहीर करायचा. मग समाजाला म्हणे त्यांच्या प्रकृतीची चिंता लागते. मग चार मंडळी भोवती नियमित काळजी करायला जमतात. वर्तमानपत्रांतून प्रकृतीचं बुलेटिन छापून येतं. सारखं आपलं नाव लोक ह्या ना त्या कारणांनी घेताहेत, आपली चिंता करताहेत, मुलं आपल्या नावानं शाळेत हरताळ पाडताहेत, दुकानदार निदान पुढलं का होईना, पण दार बंद करताहेत. काय गुदगुदल्या होत असतील नाही उपास करणाऱ्या माणसाच्या मनाला? मी एकदा असल्याच एका आचार्याला तपासायला गेलो होतो. मला हे कळत नाही, की प्राणांतिक उपोषण जर असेल तर जरा जीव घाबरा झाला की डॉक्टरना कशाला बोलावतात? पण नाही. मी तिथे गेलो. झकास उदबत्त्या लावल्या होत्या. कुणी तरी नाजूक आवाजात भजन म्हणत होतं. बाहेर दहाबारा मोटारी उभ्या! त्यांतून चांगले गलेलठ्ठ शेठजी हारतुरे घेऊन ह्या उपाशी विठोबाच्या दर्शनाला डोक्यावर माऽरे काळजीचे डोंगर घेऊन आत शिरत होते. आणि हा उपास कशाला? तर कुठल्या तरी मजुरांच्या मिरवणुकीत कुणीतरी कुणाला तरी धोंडा मारला. बस्! झाली यांची इथं अहंकारपूजा चालू! मी ठरवलंय, मी देखील एक चाऽर पाऽच दिवस चांगलं प्राणांतिक उपोषण करणार आहे.

**उषा** : अस्सं!–चाऽऽर पाऽऽच दिवस प्राणांतिक उपोषण काय? पण कशाबद्दल?

**सतीश** : ह्या सगळ्या उपास करणाऱ्यांच्या निषेधार्थ, एक आपलं फायनल!!

**उषा** : चांगली आहे कल्पना–(दोघेही हसू लागतात. काकाजी त्यांना हसताना पाहात येतात.)

**काकाजी** : वा–वा–वा–असे मस्त फुलून राहिले आहेत निखारे! वाहवा–सतीशभय्या ध्या, दम भरून ध्या एक!

**सतीश** : (अभावितपणाने उषाकडे पाहतो. तिच्या चेहऱ्यावर नापसंती दिसते.) नको, काकाजी शुक्रिया !

**काकाजी** : अरे, घ्या यार !

**सतीश** : नाही, खरंच नको.

**काकाजी** : का हो डॉक्टर, ह्या देशसेविकेनं काही लेक्चर बिक्चर दिलं की काय सुनवून ?

**उषा** : मी कशाला देईन लेक्चर ? प्रत्येकजण स्वतंत्र आहे स्वतःला हवं तसं वागायला. हुक्का प्या, विडी प्या, दारूही प्या लागली तर.

**काकाजी** : का रे बच्चा ? एकदम घुस्सा का आला ? अग, आचार्य कुठे जाताहेत ? येतील थोडीशी चक्कर काढून. इंदूर म्हणजे बंबई थोडीच आहे गुम होऊन जायला ? ढूंढण्यातही मोठा मजा असतो उषारानी. काय सतीशभय्या, शिकारीबिकारीचा षौक आहे की नाही तुम्हांला ?

**सतीश** : आहे तर ! अहो, अनेक सावजं निसटली आहेत हातून.

**काकाजी** : वाहवा ! वाहवा ! खूप कहा आपने भी. अरे, पण शिकारीचा मझा सावज सापडण्यात नाही आहे यार, शोधण्यात आहे. तलाश करण्यात आहे. सावज सापडलं की मझा संपला. तडपणं संपलं. धडकन् संपली ! काय लग्न झालं आहे की नाही तुमचं ?

**सतीश** : नाही हो ! अजून ते 'तडपणं–धडकन्' हेच चालू आहे.

**काकाजी** : भाग्यवान् आहांत.

**उषा** : मी जाते. तुम्ही बसा काकाजींचं तत्त्वज्ञान ऐकत.

**सतीश** : कां ? तुम्हांला पसंत नाही वाटतं काकाजींचं तत्त्वज्ञान ?

**काकाजी** : नाव काढू नका. तिथं म्हणजे सध्या नुसतं शिबिर ! अहो काय सांगू डॉक्टरभय्या, चांगल्या तरुण पोरी, अहो लाठ्या घेऊन घुमवतात ! अरे कुदरतीनं ज्यांना एकापेक्षा एक शस्त्रं बहाल केली आहेत —डोळ्यांत तीर ठेवले आहेत—वेणीत नागीण छिपली आहे—त्यांनी डंडे का घुमवायचे !

**उषा** : छे छे, लाटणी फिरवायची, पोळ्या लाटायच्या आणि सगळ्या जगावरचा राग कणकेच्या गोळ्यावर काढायचा.

**काकाजी** : जगावरचा राग? अग पण पोरींनो, इंदूर नाही धड पाहिलं तुम्ही, जगाचा राग येतोय कशाला तुम्हांला—आणि कशासाठी? सुंदर आहे बरं बेटी, जग सुंदर आहे. त्याचा नका राग धरू. मोठा मजा आहे, बरं का डॉक्टर? सारा जन्म जंगलात काढला आम्ही.

**सतीश** : जंगलात?

**काकाजी** : फॉरेस्ट ऑफिसर होतो मी! सुटीत इंदुरात आलो की करमत नसे मला. ही पोरं एवढी एवढी होती—ह्यांना घेऊन चालला जायचा मी जंगलात—हिची आई मला म्हणायची—जंगलात साप असतात, वाघ असतात, जपा. उगाच फार फिरवू नका मुलांना उन्हातान्हातून. मोठी मित्री होती बरं माझी वहिनी आणि आमचा भाऊ देखील; एक दिवस आमच्या हवाली करून दिली ही दोन्ही पोरं आणि आपण चालले गेले.

**सतीश** : म्हणजे?

**काकाजी** : बरोबर एक महिन्याच्या अंतरानं गेली दोघंही टायफॉइडनं. त्या वेळी तुमची ती नवीन औषधं निघाली नव्हती. खैर, जो होना था सो हो गया. सांगायची गोष्ट म्हणजे जंगलात आयुष्य काढलं आम्ही नौकरीत. बस्स डोक्यावर आकाश आणि भोवती घनदाट जंगल. मी आपला हुक्का पीत पडला रात्रीचा कॅंप कॉटवर आणि विचार करायचा, की भय्या काय आहे हा सगळा दुनियेचा तमाशा? आहाहाहा—जंगलातील पौर्णिमा कधी पाहिली आहे का तुम्ही, डॉक्टरभय्या? ओहोहोहो—मला कळत नाही—पण आठवलं म्हणजे अंतःकरण भरून येतं! जंगल म्हणजे माणसाचं मन विशाल करायची केव्हढी मोठी शाळा आहे!! असा—असा वाघ जायचा समोरून—काय उमदं जनावर! वाटायचं, की पुढं जावं आणि त्या जंगलच्या बादशहाला कुर्निसात करावा. काय डौलदार चाल! ढुंकून नाही पाहणार कुणाकडे! असं वाटतं, की माणसानं चालावं तर वाघासारखं—पाहावं तर काळविटासारखं! मागून यार, असा सुंदर हरणींचा ताफा चालला आहे आणि निघाले आहेत काळवीटमहाराज आपला झनाना घेऊन. इथली ही शहरातील पोट्टी पाचसात पोरींच्या घोळक्यात घाबरत घाबरत, डरपोकांसारखी हिंडताना पाहिली म्हणजे ओरडून सांगावंसं वाटतं, की बेट्यांनो, एकदा जंगलात जा आणि बघा तो काळवीट कसा ऐटीत हरणींना

घेऊन हिंडतो ते!...जवान होतो मी...एकदा शिकारीच्या नादात मारला एक काळवीट! जनावर धाडकन् खाली पडलं. उचलायला जवळ गेलो, हात पुढे येईना—दूर जाऊन बसलो. थोड्या वेळानं जरासा आवाज आला म्हणून मागे पाहिलं तर, काय सांगू डॉक्टरभय्या, दोनतीन हरणी ढुशी देऊन त्याला उठवायचा प्रयत्न करीत होत्या. त्यांना हे कळत नव्हतं, की आपला सरदार आज असा का पडला आहे? त्या दिवशी कसम खाल्ली. काळवीट नाही मारायचा. दहा हरणींचा पोशिंदा तो—फक्त मॅन्-ईटर्स, रानडुकरं असली जनावरं मारायची. (भिंतीवरच्या चित्त्याच्या मुंडक्याकडे बोट दाखवीत) तो पाहा नरभक्षक—बत्तीस माणसं फस्त केली होती त्या हरामखोरानं.

**सतीश** : मग त्याचं हृदयपरिवर्तन वगैरे करायचा प्रयत्न नाही का केला? आमच्या मामांना विचारलं पाहिजे, की पिसाळलेल्या वाघाला कुठले शांतिपाठ देऊन थंड करावं?

**उषा** : ते आले म्हणजे विचारा. पत्ता कुठं आहे त्यांचा?

**सतीश** : मला ठाऊक आहे की.

**उषा** : म्हणजे?

**सतीश** : सांगितलं नाही का—ते मामा आहेत माझे.

**काकाजी** : कोण?

**सतीश** : आचार्य!

**काकाजी** : आचार्य मामा का तुमचे? अच्छा!

**उषा** : मग इतका वेळ का नाही सांगितलंत ते कुठे उतरले आहेत ते?

**सतीश** : वेळच्या वेळी कुठली गोष्ट केली आहे मी आयुष्यात?

**काकाजी** : हे ठीक नाही हं सतीशभय्या-काही गोष्टी वेळच्या वेळीच झाल्या पाहिजेत.

**सतीश** : अहो, श्याम स्टेशनवर येईल किंवा ह्या येतील म्हणून वाट पाहिली त्यांनी, ह्यांच्यापैकी कोणीच नाही. मग मी गेलो होतो स्टेशनवर—घेऊन गेलो आमच्या घरी. तुमच्या अव्यवस्थेवर भयंकर भडकली आहे स्वारी. त्यांचाच निरोप घेऊन आलो होतो मी.

**उषा** : वा फारच लौकर सांगितलात! (दरवाजाची घंटी वाजते.) शाम आला

वाटतं–(घंटी सारखी वाजत राहते.) आले आले! दोन मिनिटं उभा राहिला तर पाय मोडतील याचे. (जाते.)

[आचार्य पोफळे गुरुजी आणि त्यांच्याबरोबर एक सुमारे वीस वर्षांची तरुण सुंदर मुलगी येते. हिचाही वेष खादीचा आहे. हिचं नाव गीता. ही आचार्यांची मानलेली मुलगी. ह्या दोघांजवळ दोन पिशव्या, वळकटी, चरखा, वगैरे सामान आहे.]

**आचार्य** : (सतीशला उद्देशून संतापाने) छान! सुंदर! ही तुझी पाच मिनिटं–मी तुझ्या घरी येऊन पडल्याचा निरोप पोहोचवायला म्हणून टेलिफोन करतो म्हणून निघालास तो तू अजून इथंच! मी वाट पाहतोय तिथं आणि तू—

**उषा** : क्षमा करा—(त्याला आचार्य म्हणावे की गुरुजी ह्या गोंधळात.)

**आचार्य** : हो हो–आचार्य! मीच तो आचार्य.

**उषा** : माझं नाव उषा देवासकर.

**आचार्य** : म्हणजे शिबिराच्या संचालिका. ही तुमच्या शिबिराची शिस्त! आज हा आमचा विद्वान भाचा स्टेशनावर आला नसता तर काय झालं असतं आमचं?

**सतीश** : म्हणजे काय झालं ते मी सांगतो.

**आचार्य** : काय रे? तू इंदुरात डॉक्टरकी करतोस की वकिली? बाहेर टांगा उभा आहे त्याचे सहा आणे देऊन ये.

**उषा** : आणखी काही सामान—

**आचार्य** : हे काय आहे मग? (आपल्या हातातली पिशवी आणि गीताच्या गळ्यातली पिशवी दाखवीत)–अं?

**उषा** : हे एवढंच?

**आचार्य** : म्हणजे? इथं काय आम्ही बिऱ्हाड करायला आलो अशी समजूत झाली की काय तुमची? तो टांगेवाला बाहेर खोळंबला असेल. गरिबांच्या वेळेलाही किंमत आहे.

**उषा** : थांबा. मी देते.

**सतीश** : कशाला?

**आचार्य** : बरोबर आहे. तिचा पाहुणा आहे मी. तिलाच देऊ दे. (उषा टेबलावरची पर्स घेऊन जाते.)

**काकाजी** : (गीताला व आचार्यांना) बसा–बसा ना आपण—
**आचार्य** : बापूभैय्या देवासकर आपणच का ?
**काकाजी** : नाही. बापूभैय्या म्हणजे आमचे वडील! ते वारले.
**आचार्य** : केव्हा ?
**काकाजी** : झाली चोवीस वर्षे!
**आचार्य** : अस्सं! (मग दचकून) किती ?
**काकाजी** : चोवीस.
**आचार्य** : छान! आणि बाहेर फाटकावर अजून त्यांच्याच नावाचा बोर्ड टांगलाय्, तो काढायला गेल्या चोवीस वर्षांत सवड झाली नाही वाटतं कुणाला ?
**सतीश** : अजून इंदुरात बापूभय्यांची कोठी म्हणून प्रसिद्ध आहे हा वाडा. हे उषाबाईंचे काका. रिटायर्ड फॉरेस्ट ऑफिसर आहेत.
**आचार्य** : (भिंतीवरची जनावरांची मुंडकी वगैरे पाहात) अस्सं–ही ह्यांची कमाई आहे वाटतं ?–हं–हे घड्याळदेखील (उषा येते.) गेली चोवीस वर्षे असंच मृतावस्थेत आहे वाटतं—
**उषा** : मोडलंय ते—
**आचार्य** : तरी मोह सुटत नाही त्याचा. गीता, वाजले किती ?
**गीता** : (पिशवीतून पॉकेटवॉच काढून) अकरा!
**आचार्य** : बरोबर अकरा ?
**गीता** : नाही, दोन मिनिटं कमी आहेत.
**आचार्य** : मग दहा अठ्ठावन म्हणून का नाही सांगितलंस ? दोन मिनिटं ही काय सहज डावलण्यासारखी गोष्ट आहे ? का ह्या सतीशच्या पाच मिनिटांसारखी वेळ ही एक आपली क्षुल्लक बाब आहे ? (सतीश खट्याळपणे हसतो.) का ? हसलास का ? दोन मिनिटांच्या उशिरानं नेपोलियन लढाई हरला, ठाऊक आहे ना तुला ? ह्या देशात (गीता एका वहीत आचार्यांचे हे वाक्य लिहू लागते.) वेळ ही एक अत्यंत निरुपयोगी वस्तु समजली जाते. प्रत्येक क्षण मोलाचा असतो. (सतीश गीता काय लिहून घेत आहे ते तिच्यामागे उभा राहून पाहू लागतो.) –काय रे ? तुला दवाखाना नाही का ? का सगळे रोगी बरे केलेस ?

**सतीश :** छे छे! रोगी भराभर बरे व्हायला लागले की डॉक्टरचं मरणच. आज रविवार! आज दवाखाना बंद–विश्रांति.

**आचार्य :** छान! ही तुमची रुग्णसेवेची भावना. विश्रांति!! सूर्य कधी विश्रांति घेतो का? उद्या परमेश्वरानं विश्रांति घ्यायचं ठरवलं तर काय होईल?

**सतीश :** सुखी होईल जग. नाही तरी ह्या जगाच्या गाड्याला आता थोड्या रिपेरीची गरज आहे—(काकाजी हसतात.)

**आचार्य :** थिल्लरपणा करू नकोस! जीवन हे हसून घालवण्याइतकं क्षुद्र नाही. जीवनाकडे जरा गंभीरपणानं पाहायला शिका. ह्या देशात–(गीता फाउंटन पेन-मधली शाई संपली म्हणून झटकू लागते. उषा तिला आपले पेन देते. हा प्रकार होईपर्यंत आचार्य 'ह्या देशात...ह्या देशात...' असे दोनतीनदा म्हणतात...गीतेला पेन मिळाल्यावर सुरू करतात.) ह्या देशात लोकांना जीवनाचा गंभीरपणाने विचार करायला शिकवलं पाहिजे–जीवन म्हणजे काही चार घटका करमणूक नाही की आलंय आपलं हाताशी म्हणून ह्या गुडगुडीसारखे मारले त्याचे चार झुरके! (काकाजी दचकून हुक्क्याची नळी तोंडातून काढतात.) हं किती वाजले?

**सतीश :** अकरा वाजून तीन मिनिटं आणि वीस सेकंद झाले.

**गीता :** माझ्या घड्याळात अकरा वाजून दोन मिनिटं झाली.

**काकाजी :** (आपले घड्याळ पाहात) अरे यार–आपल्या घडीला किल्लीच द्यायची राहिली. इथं तर सातच वाजून राहिले आहेत. किती वाजले म्हणाला सतीशभय्या?

**सतीश :** आता ह्यांच्या आणि माझ्या घड्याळात चांगला एक मिनिट आणि... वीस सेकंदांचा फरक आहे.

**काकाजी :** जाऊ द्या यार. जंगलात तर दोनच वेळा. दिवस आणि रात्र. भूक लागली की जेवायची वेळ आणि थकलो की झोपायची.

**आचार्य :** म्हणजे मी समजत होतो, की हा वाडा चोवीसच वर्षे मागे आहे. पण नाही, अगदी आदिमानवाच्याच काळात आहे. जंगलात राहणाऱ्या आदि-मानवानं त्यानंतर काही प्रगति केल्याचं ह्या वाड्याच्या कानावर आलेलं दिसत नाही.

**काकाजी :** कुणाला ठाऊक काय केलंय ते? प्रगति की अधोगति!

**आचार्य** : हा झाला जैनांचा स्याद्वादी दृष्टिकोण! मी नास्तिकता म्हणतो, ती ही. असल्या नास्तिक्यवादातून मानवतेचं कल्याण होणार नाही–ह्या देशात—
**सतीश** : मामा, मी निघालो—(जाऊ लागतो.)
**आचार्य** : कुठे?
**सतीश** : आता क्लबावर जाणार सरळ! साडेअकराला क्रिकेटची मॅच आहे.
**आचार्य** : उत्तम!–म्हणजे इंग्रजानं मागे ठेवलेला वारसा संभाळता आहात तर नीट. आता काय दिवसभर उन्हात एका चेंडूच्या मागे वेळ घालवणार–लावा, सत्कारणी लावा वेळ.
**सतीश** : अच्छा काकाजी.
**काकाजी** : दुपारी येतो मॅच बघायला.
**सतीश** : या–या–अवश्य या.
**काकाजी** : सेंचुरी मारणार का?
**सतीश** : बघू. आजचा दिवस काही अगदीच वाईट नाही.
**काकाजी** : बेस्ट ऑफ लक्!
**सतीश** : थँक्यू. बरं आहे मामा. बरं आहे गीता. (दाराबाहेर जातो व परत येऊन उषाला) बरं आहे होऽऽ
**उषा** : बरं आहे! (सतीश जातो.)
**आचार्य** : (तो गेल्यावर) हुषार आहे मुलगा, पण चावट!...स्नानाची व्यवस्था काय आहे? पाणी कसलं आहे?
**उषा** : कसलं? (गोंधळते.)
**आचार्य** : म्हणजे विहिरीचं की नळाचं?
**उषा** : नळाचं.
**आचार्य** : म्हणजे परावलंबी! ठीक आहे. गीता, पंचा!
**गीता** : (पिशवीतून पंचा काढते.) हा—
**उषा** : द्या.
**गीता** : मी येते.
**उषा** : बसा आपण. चला आचार्य. (आचार्य व उषा जातात. गीता पिशवीतून टकळी व पेळू काढते. काकाजी हुक्का ओढीत तिच्याकडे पाहात असतात.)

**काकाजी** : काय नाव म्हणालीस बेटा तुझं?

**गीता** : .गीता–गीता गोवारीकर.

**काकाजी** : गीता गोवारीकर–गोवारीकर–आमच्याबरोबर पुण्याला डेक्कन कॉलेजात एक रामभाऊ गोवारीकर होता...पुढे बऱ्याच वर्षांनी कुठे तरी तो क्रांतिकारकांच्या कटात सामील झाला–त्यानंतर मला वाटतं तुरुंगातच मेला—

**गीता** : त्यांचीच मी मुलगी.

**काकाजी** : अच्छा, रामभाऊची मुलगी का तू?

**गीता** : हो!–माझे वडील वारले तेव्हा दोन महिन्यांची होते मी–त्यानंतर आईही वारली क्षयानं.

**काकाजी** : अरे अरे अरे–काय दुनियादारी आहे? ह्या आचार्यांबरोबर केव्हा आलीस?

**गीता** : लहानपणापासून आचार्यांनीच संगोपन केलं माझं.

**काकाजी** : म्हणजे लहानपणापासून तू ह्या गृहस्थाबरोबर आहेस? बहादुर आहेस बेटी. आपण तर भय्या पाच मिनिटांत हैराण होऊन गेलो!

**गीता** : छे छे. असं काय बोलता आपण? आचार्य फार चांगले आहेत... हल्लीच जरा चिडल्यासारखे वागतात.

**काकाजी** : त्यांना काही मुलंबाळं?

**गीता** : छे! त्यांनी लग्नच केलं नाही—

**काकाजी** : हं!!...अरे वासूभय्या–हो–हे लोक अजून आलेच नाहीत वाटतं?–हे निखारे पुन्हा विझले.

**गीता** : मी कधी गुडगुडी भरली नाही–नाही तर मी केलं असतं तुमचं काम. आमच्या आश्रमात हे असलं काही चालत नाही.

**काकाजी** : ठीक आहे. आराम करा इथं. तुला काय आवडतं, काय नाही, सांगत जा बरं...संकोच नाही करायचा. तुझा बाप दोस्त होता आमचा. बस... मी आणतो फुलवून निखारे...

[हुक्का घेऊन जातात. गीता काकाजींच्या पाटमोऱ्या आकृतीकडे पाहते. नंतर हॉलमधल्या तसबिरी पाहते. हार पडलेला असतो–तो उचलून वास घेऊ लागते. इतक्यात बेल वाजते. दचकून हार खाली ठेवते व दार उघडायला

आतून कोणी येत आहे की काय म्हणून थोडा वेळ वाट पाहून आपणच दार उघडायला जाते. तोपर्यंत दारावरची बेल सारखी वाजत असते. श्याम व वासूअण्णा येतात. वासूअण्णाच्या हातात बरणी आहे, त्यात गाईचे तूप आहे. श्याम गीतेकडे 'ही अनोळखी मुलगी कोण ?' अशा प्रश्नार्थक दृष्टीने पाहतो.]

**गीता** : कोण पाहिजे आपल्याला ?

**श्याम** : म्हणजे मीच विचारणार होतो हा प्रश्न. तुम्हीच आधी विचारलात! वासूअण्णा, बघत काय उभे राहिलात? ते तूप नेऊन आधी आत ठेवा. खा म्हणावं आचार्याला लेका किती खातोस ते. (गीता आचार्यांच्या एकेरी उल्लेखाने चमकून श्यामकडे पाहते.) तुम्ही काय शिबिरातून आला वाटतं चौकशी करायला? अजून आला नाही ना तो आचार्य?

**गीता** : वडील माणसांबद्दल बहुवचनी बोललं तर अधिक चांगलं नाही का? तुम्हांला उषाताईंना भेटायचंय का?

**श्याम** : अहो भाऊ आहे मी उषाताईंचा. श्याम म्हणतात मला. आपलं नाव?

**गीता** : गीता.

**श्याम** : गीता! योग्य वेळी भेटलात. इथं अक्षरशः अर्जुन झालाय् आमचा. ते आचार्य कुठे गायब झाले देव जाणे. धर्मशाळा पाहिल्या, पोलीसचौक्यांवर तपास केला—हॉस्पिटलात जाऊन आलो, येता येता काही विहिरीत देखील डोकावून पाहिलं. चार गॅलन पेट्रोलचा भुसा झाला. इतकं शोधल्यावर देवदेखील सापडला असता–आचार्यदेवो भव म्हणतात ते याचसाठी वाटतं!

**गीता** : मी थोडं बोलू का?

**श्याम** : बोला की. तुमच्या तोंडावर माझी थोडीच सत्ता आहे? (गीता एकदम त्याच्याकडे पाहते.) माफ करा हं. मला भलत्या कुठल्याही अर्थानं म्हणायचं नव्हतं. तसलं आगाऊ धैर्य नाही आम्हांला. म्हणून तर आमचं हे असं. जाऊ दे. आचार्य बेपत्ता झाल्यामुळे जरा हैराण झालो आहे मी.

**गीता** : हैराण व्हायचं काही कारण नाही. आचार्य आले आहेत.

**श्याम** : आले आहेत? कुठे आहेत?

**गीता** : स्नानाला गेले आहेत.

**श्याम** : स्नानाला?मग काकाजी आणि उषाताई काय त्यांच्या पाठीला साबण लावायला गेली आहेत की काय?

**गीता** : फारच सैल दिसते तुमची जीभ.

**श्याम** : अहो, पण तुम्ही कशाला उखडून राहिलाय?–तुम्ही त्या शिबिरात सूतकताई करायचं सोडून इथे कशाला आलाय गुंता करायला?

**गीता** : घरी आलेल्या पाहुण्यांना असंच वागवतात का तुमच्या इंदुरात?

**श्याम** : कोण पाहुणे?

**गीता** : आचार्य. आणि मी देखील.

**श्याम** : म्हणजे? असं शब्दकोडं घातल्यासारखं नका बोलू. सरळ सांगा ना.

**गीता** : मी आचार्यांच्या बरोबर आले आहे.

**श्याम** : म्हणजे? तुम्ही त्यांच्या सेक्रेटरी?

**गीता** : त्यांची मुलगी आहे मी.

**श्याम** : मुलगी?

**गीता** : हो, मुलगी...मानलेली.

(वासूअण्णा धावत येतो; त्याचे हात तुपाने बरबटले आहेत.)

**वासू** : श्यामभय्या—

**श्याम** : हे काय?

**वासू** : झाकण काढताना तुपाच्या गाईची–नाही, आपलं गाईच्या तुपाची बरणी हातातून निसटली आणि हे बघा–(हात दाखवतो.) आता काय?

**श्याम** : आता काय?...(गीतेला) अहो, तुमच्या पायातली ती चप्पल–

**गीता** : चप्पल?

**श्याम** : हो चप्पल. अहिंसक चामड्याचीच आहे ना?

**गीता** : हो! का?

**श्याम** : एक आमच्या मुस्काटीत मारा आणि दुसरी ह्याच्या थोबाडात!

[पडदा पडतो.]

# अंक दुसरा

[पहिल्या अंकातील दिवाणखाना. फरक एवढाच की, स्टेजच्या मध्यभागी एक चौपाई आली आहे. तिच्यावर गादी, लोड वगैरे आहे. पुतळा उचलला आहे. त्या जागी उदबत्त्यांचे झाड आले आहे. चौपाईवर आसनमांडी घालून श्याम बसला आहे. आचार्य आल्यानंतर त्याच्या पोषाखात बरेच परिवर्तन झाले आहे. त्याने खादीची निळी अर्धी तुमान घातली आहे. अंगात लांब्या बाह्यांची-बनियनवजा एक पैरण घातली आहे. श्यामची दाढीही थोडी वाढली आहे. टकळीवर सूत काढण्याचा त्याचा प्रयत्न चालला आहे. दोन चार वेळा सूत तुटते.]

**श्याम** : वासूअण्णा...वासूअण्णा—

**वासू** : (समोर येऊन उभा राहतो. बोलत नाही.)

**श्याम** : अरे राम राम राम. हे सूत काढायचं काम इतकं अवघड असेल असं वाटलं नव्हतं मला. ह्या गीतानं मला सूत काढायला दोन दिवसांत शिकवते म्हणून वचन दिलं आणि स्वतः कुठं गायब झाली कुणास ठाऊक! गीता आचार्यांच्या बरोबर बद्रिनारायण शेठजींच्या घरीं गेली का वासूअण्णा?

**वासू** : (मानेने नाही म्हणतो.)

**श्याम** : नाही गेली? मग कुठे गेली?

**वासू** : (खुणेने 'कोण जाणे' असा भाव व्यक्त करतो.)

**श्याम** : मग नीट सांग ना—हे असं (त्याने केलेल्या खुणेसारखे करीत) काय? बोलायला काय झालं? अहो, गीता काय करतेय्?

**वासू** : (खुणेने वाचते आहे असे दाखवतो.)

**श्याम** : वाचते आहे? मग बोलत का नाही?

**वासू :** लावलंत बोलायला ? आचार्यांनी मला आजचा दिवस मौन पाळायला सांगितलं होतं. सकाळपासून दहा वेळा मोडायला लावलं मला. अगदी भल्या पहाटे माळीबुवा आले ठणाणा करीत बागेतला पाईप फुटला म्हणून. मी त्याला पाटीवर लिहून सांगितलं की, प्लंबरकडे जा–आता एवढा म्हातारा झाला, त्याला प्लंबरमधला प्ल वाचतां येईना. वाचून दाखवावं लागलं. मोडलं मौन! बरं–ती दूधवाली गौळण ? ती बसली हुज्जत घालीत गाईच्या दुधात पाणी का घातलंस असं विचारलं म्हणून.

**श्याम :** कोणी ?

**वासू :** मी !

**श्याम :** मग दुधवालीशी बोलताना मौन नाही मोडलं तुमचं ?

**वासू :** अहो, आधी मी तिला खुणाच करीत होतो. तर तिला काय वाटलं कोण जाणे ! हाय री दैया म्हणून मुरकाच मारला तिनं आणि तोंडावर टिचकीनं दूध उडवलं. बरं, आमची बायकोही तिथंच उभी. आता काय मौन पाळता ? खुणांचा अर्थ सांगावा लागला. नाहीतर भलती आफत व्हायची भय्या. शंभरदा ओरडून सांगितलं प्रत्येकाला, की भय्या, मौन आहे आमचं, मौन आहे. कुणी आमचं मौन ऐकायलाच तयार नाही.

**श्याम :** वासूअण्णा–इतकी वटवट केलीत–माझ्या प्रश्नाचं उत्तर का नाही देत ? ...गीता कुठं आहे ?

**वासू :** ती बसली आहे वाचत.

**श्याम :** काय वाचते आहे ?

**वासू :** आता मी तिला काय वाचायला देणार ? तुमची पुस्तकं दिली, ती म्हणाली नको. ही इंजिनियरिंगची आहेत. उषाताईच्या कपाटाला कुलूप. शेवटी जगन्नाथ ड्रायव्हरकडे एक पुस्तक सापडलं ते दिलं.

**श्याम :** कसलं ?

**वासू :** पिवळा डांबीस !

**श्याम :** काय ?

**वासू :** पिवळा डांबीस ! शायूडीवाल्याची रहस्यकथा आहे.

**श्याम :** वासूअण्णा, हे काय चालवलंय् तुम्ही ? आता हे आचार्यांना कळलं

तर ! वासूअण्णा, आता अगदी कसोशीनं मौन पाळ. एक अक्षर बोलू नको.

**वासू :** मी कशाला मरायला बोलेन ? पण खरं सांगू का श्यामभय्या ? तुमचा हल्ली आचार्यांवर दाब जोर दिसतोय—आताशा बघतोय मी, ते तुम्हांला बरोबर नेतात. तुमच्याशी तास तास बोलतात.

**श्याम :** अरे बाबा, महान्-महान् माणूस आहे. आचार्य ! त्यांच्या जोड्या-जवळ उभं राहायची लायकी नाही आमची.

**वासू :** अगदी खरं बोलणं आहे तुमचं. आमचं एक काम करा. त्यांना म्हणावं चाहेल तर हत्ती पाळायला सांगा, पण हे मौन पाळायला नका सांगू.

**श्याम :** अरे अरे अरे—वासूअण्णा—वासूअण्णा—तुमच्यात—तुमच्यात (खिशा-तून वही काढतो आणि पाने उलटीत म्हणतो.) तुमच्यात हे—नैष्ठिक निग्रह नाही !

**वासू :** काय ? काय नाही ?

**श्याम :** नैष्ठिक निग्रह ! हे ऐक. आत्म्याचा विकास व्हायला नैष्ठिक निग्रहाची आवश्यकता आहे. तुम्हांला आत्मा आहे ना वासूअण्णा ?

**वासू :** आत्मा ? असेल एखादवेळी !

**श्याम :** शोधून काढा.

**वासू :** श्यामभय्या, आता काय काय म्हणून शोधून काढू ? शुद्ध गाईचं तूप शोधून काढलं. हाताच्या घाण्याचं तेल शोधलं. हातसडीच्या तांदळाचं कार्यालय शोधलं, आता आणखी आत्मा शोधायला सांगता ? अहो टाइम कोणाला आहे ?

**श्याम :** अरे अरे अरे वासूअण्णा, अरे हे (वहीतून वाचत) हे अधःपतन आहे. ते जाऊ दे. जगन्नाथ आणि भिकूमाळ्याकडून गीतेतले श्लोक पाठ करून घ्यायला सांगितले होते मी—

**वासू :** त्यांनाच विचारा—(खिडकीतून हाक मारतो) जगन्नाथ—ए भिकूऽऽ—इकडे या—काम मग करा—मी ह्या दोघांसाठी माझं मौन मोडलं आहे बरं. पण दाद देत नाहीत—

[जगन्नाथ ड्रायव्हर येतो. कपडे खराब झाले आहेत. हातात मोटारची यंत्रे पुसायचे फडके.]

**जगन्नाथ :** क्या है जी वासूअण्णा !

**भिकू** : (गुलाबाच्या फुलांचा गुच्छ घेऊन येत) काय वासूअण्णा ? श्यामभय्या, हे घ्या. काकाजींनी ती दिल्लीहून रोपं आणली होती त्याची फुलं—

**वासू** : भिकूऽ—(शाळामास्तराच्या ढंगात) कालचा श्लोक पाठ झाला ?

**जगन्नाथ** : श्यामभय्या, भलत्या लफड्यात टाकू नका यार आम्हांला— आज केव्हापासून बसलोय इंजन खोलून. कार्बोरेटरमध्ये मिष्टेक येऊन गेली काय तरी. मी सगळे प्लग साफ करून राह्यलोय. मी सांगून दिलं माझ्या छोकऱ्याला तूच करून दे पाठ. तो म्हणून दाखवील.

**भिकू** : मी बी हेच म्हणून राहिलोय. सकाळपासून बागेत राबून राहिलोय मी. आज आंघोळसुद्धा नाही झाली.

**श्याम** : आचार्य काय म्हणाले ? (वही उघडून पाने उलटीत) काय म्हणाले ? हं-शरिराला रोज आंघोळ घालता, मनाला केव्हा घालाल ? ते काही नाही. वासूअण्णा, गीतेचं पुस्तक घ्या ते-(वासू पुस्तक देतो.) हं म्हणा, स्थितप्रज्ञस्य का भाषा—

**भिकू** : श्यामभय्या तिथं झाडांना पाणी दिलंय मी—

**श्याम** : स्थितप्रज्ञस्य का भाषा—

**जगन्नाथ** : साहेब, गाडी खोलली आहे ना मी, हत्यारं बाहेर पडली आहेत.

**श्याम** : वासूभय्या, तुम्हांला काय झालं न म्हणायला ?

**वासू** : श्यामभय्या, माझं मौन आहे आज. मी मनातल्या मनात म्हणतोय—

**श्याम** : काही नको, म्हण मोठ्यानं. स्थितप्रज्ञस्य—

**जगन्नाथ** : पुन्हा सांगा—

**श्याम** : स्थितप्रज्ञस्य—

**जगन्नाथ** : थितस-प्रद्य-श्यामभय्या, पयले छूटच जबान अटकते आपली—

**श्याम** : कशी जबान अटकते ? कार्बोरेटर म्हणतां येतं ! प्लग-मॅग्नेट हे शब्द म्हणता येतात-आणि स्थितप्रज्ञ म्हणता येत नाही ?

**जगन्नाथ** : पण कार्बोरेटर म्हणजे काय मला माहीत आहे. तो दिसला की बराबर कळतं हा कार्बोरेटर. हा मॅग्नेट. पण तुम्ही आता काय म्हणता ती भानगड काय तेच कळत नाही ना. ती एकदा दाखवा आम्हांला, मग बराबर याद राहील. काय भिकू ?

**भिकू :** क्या बात है! कबीरजीने कहा है—

**श्याम :** भिकू, कबीरजी नको! गीता!

[गीता आतून येते.]

**वासू :** वा! शंभर वर्षे आयुष्य आहे.

**गीता :** मला!

**वासू :** हो नाव काढल्याबरोबर आलात. (भिकूकडे पाहून डोळे मिचकावतो.)

**गीता :** हं. काय चाललंय?

**श्याम :** वासूअण्णा, उद्यापर्यंत स्थितप्रज्ञाची लक्षणं पाठ झाली पाहिजेत.

**जगन्नाथ :** काय गीताताई, पिवळा डांबीस कसा आहे?

**श्याम :** कोण?

**जगन्नाथ :** पिवळा डांबीस. काय ष्टोरी आहे श्यामभय्या! सूर्यकांत डाकूची भी कमाल आहे यार आणि निरंजन डिटेक्टिव तर लाजवाब आहे.

**गीता :** मी खरं सांगू का? मला असली पुस्तकं नाही हो आवडत! (अत्यंत काकुळतीने) हे खून, ही भांडणं नको वाटतं.

**जगन्नाथ :** मग काय आवडतं तुम्हांला?

**गीता :** मला काय आवडतं ते माझं मलाच कळत नाही.

**वासूअण्णा :** मी सांगू तुम्हांला काय आवडतं ते! तुम्हांला आपलं एक लहानसं घर असावं, लहानशी बाग असावी...

**गीता :** चला!

**वासूअण्णा :** आता चला काय? आमची ही सांगत होती की, काल दिवसभर आमच्या बगड्याला तुम्ही खेळवत होता–तेव्हा...

**गीता :** वासूअण्णा—

**वासू :** आमची ही खूष आहे तुमच्यावर. म्हणाली, म्हणजे मी स्वतःचं नाही हं सांगत–म्हणाली, की असली मालकीण वाड्यात परत आली तर पुन्हा सगळा वाडा नांदागाजायला लागेल. आणि आमच्या हिची बत्तिशी कध्धी खोटी नाही ठरत!

**श्याम :** वासूअण्णा–फालतू गोष्टी नकोत. आणि जगन्नाथ, पुन्हा ही खुना-बिनाची पुस्तकं वाचायला देत जाऊ नका त्यांना.

**वासू** : पण तुम्ही नेहमी वाचा ही पुस्तकं गीताताई, सवय होते मग खुनाची ...परवा तर एक ष्टोरी वाचली...कुठली बरं...हं–'हलवायाचा मुडदा'–त्यात आठ खून होते.

**भिकू** : ती कहाणी मात्र फस्किलास होती हं जगन्नाथ...जाम झालो आपण.

**श्याम** : पाहिलंत ? गॅरेजमध्ये बसून हे वाचत असतात. आणि चार श्लोक पाठ होत नाहीत.

**भिकू** : (लगबगीने) गीताताई, कशी आहेत फुलं ?

**गीता** : अहाहा–छान आहेत. (वास घेते.) अहाहा !

**भिकू** : तुम्हांला आवडतात ना फुलं ?

**गीता** : अहो, फुलं कुणाला नाही आवडणार ?

**भिकू** : बराबर आहे. चला वासूअण्णा–(वासूअण्णाला भांग घोटली आहे अशी खूण करतो.) चल रे डायवरवाल्या.

**जगन्नाथ** : चला. (जातात.)

**श्याम** : फार आवडलेले दिसतात गुलाब !

**गीता** : का ? तुम्हांला आवडत नाही गुलाबाचा वास ?

**श्याम** : एके काळी आवडत होता.

**गीता** : एके काळी ?

**श्याम** : हो, एके काळी ! पण आचार्यांनी डोळे उघडले माझे. काय उपयोग आहे गुलाबांचा ? आज ह्या देशात लोकांच्या तोंडात घासाची गरज आहे, वासाची नाही.

**गीता** : आचार्यांचं वाक्य आहे परवांच्या बौद्धिकातलं.

**श्याम** : तंतोतंत पटलं मला. बस्स, काहीतरी केलं पाहिजे.

**गीता** : म्हणजे ? पुढल्या वर्षी इंजिनियर होणार ना तुम्ही ?

**श्याम** : माझ्याबद्दल बरीच माहिती जमवलेली दिसते.

**गीता** : मुद्दाम नाही हं जमवली. काकाजी सारखी तुमची तारीफ करीत असतात माझ्याजवळ.

**श्याम** : काय काय सांगितलं काकाजींनी ?

**गीता** : खूप सांगितलं. तुम्ही बुद्धिबळ फार छान खेळता म्हणे. ब्रिज–ब्रिजच

म्हणतात ना त्याला ? तोही चांगला खेळता म्हणे. आमच्या आश्रमात एकदा एकाच्या बॅगेत पत्ते सापडले म्हणून आचार्यांनी दोन दिवस उपास केला होता. तेव्हापासून पत्ते म्हटलं की भीति वाटते. मॅट्रिकनंतर कॉलेजमध्ये जायची देखील खूप इच्छा होती माझी. पण आचार्यांचा विश्वास नाही त्या शिक्षणावर. त्यामुळे गेले नाही कॉलेजात.

**श्याम** : काही अर्थ नाही कॉलेजच्या शिक्षणात.

**गीता** : कॉलेजात गेलेल्यांना असं वाटत असेल. पण ज्यांना मिळालंच नाही कॉलेज बघायला त्यांना मात्र जरा उणीव राहून गेल्यासारखी वाटते. (निःश्वास टाकते.) अशा खूप गोष्टी राहून जातात. जाऊ दे ते. मला बुद्धिबळं खेळायला शिकवाल ?

**श्याम** : पण तुम्ही मला सूत काढायला शिकवणार होता ना !

**गीता** : पण माझी अट अजून नाही मानली तुम्ही.

**श्याम** : अहो पण—

**गीता** : हे पाहा. अजून तुम्ही मला अहो म्हणता. ज्ञानानं, ऐश्वर्यानं, वयानं, मोठे आहात तुम्ही माझ्यापेक्षा.

**श्याम** : ज्ञानानं–ऐश्वर्यानं असेन कदाचित पण वयानं मी फारसा मोठा नाही हं. तुमच्यापेक्षा बरोबर तीन वर्षे पाच महिन्यांनी मोठा आहे मी.

**गीता** : माझं वय कोणी सांगितलं तुम्हांला ?

**श्याम** : काकाजींनी ! तुमच्याबद्दल देखील सगळी माहिती सांगितली त्यांनी मला.

**गीता** : आता आले म्हणजे विचारते त्यांना. मी फक्त त्यांना म्हणून सांगितल्या होत्या काही गोष्टी–त्यांनी कुठेही बोलायचं नाही असं बजावलं होतं.

**श्याम** : काय ते आम्हांला तरी सांगा.

**गीता** : पुन्हा पाहा. सांगा काय ?

**श्याम** : बरं, सांग.

**गीता** : सांगेन कधी तरी. पण तुम्ही मला बुद्धिबळं केव्हा शिकविणार ?

**श्याम** : अवश्य ! पण आचार्यांची परवानगी घ्यावी लागेल.

**गीता** : झालं. म्हणजे या जन्मात नको आशा करायला.

**श्याम** : मग काय त्यांना फसवून खेळायचं?

**गीता** : फसवणं कसलं आलं आहे त्यात? प्रत्येक गोष्ट काय त्यांना सांगायलाच पाहिजे?

**श्याम** : नाही, पण हे एक प्रकारचं असत्य आहे. आणि असत्यापोटी हिंसा आली–(गीता बोलत नाही.) का? गप्प का राहिलीस गीता? हे मोह आहेत. काल आचार्यांनी काय सुंदर उपमा दिली. (वही काढतो.) मोह म्हणजे जीवनाच्या मडक्याला पडलेलं भोक.

**गीता** : मला ठाऊक असलेलीच वाक्यं पुन्हा का सांगता?

**श्याम** : रागाऊ नकोस गीता. क्रोध आवर. क्रोधात् भवति संमोहः–संमोहात्–संमोहात्–अजून नीट पाठ झालं नाही माझं–क्रोधात् भवति संमोहः संमोहात्–पुढं काय ग गीता?

**गीता** : संमोहात् स्मृतिविभ्रमः–स्मृतिभ्रंशात् बुद्धिनाशो बुद्धिनाशात्—

**श्याम** : प्रणश्यति! म्हणजे मोहातून विनाश! रागावणार नसलीस, तर एक सांगतो.

**गीता** : काय?

**श्याम** : तुझ्या गालावर केसांची बट रुळते आहे ती मागे घे–माझं लक्ष सारखं तिथं जातं—

**गीता** : ठीक आहे, मीच जाते.

**श्याम** : मला वाटलंच तुला राग येईल म्हणून.

**गीता** : आचार्यांच्या बरोबर गेले असते तर बरं झालं असतं.

**श्याम** : म्हणजे? तू मुद्दाम गेली नाहीस?

**गीता** : हो! मुद्दामच नाही गेले. कोणी तरी शेठजी! माझी ओळख ना देख. आचार्यांचं ठीक आहे. पण ह्या थोरामोठ्यांच्या बायका भंडावून सोडतात आम्हांला. दागिन्यांनी मढलेल्या असतात स्वतः आणि सारे चेहऱ्यावर भाव काय आणतात–अगदी सात्त्विक! सगळं यथास्थित चालू असतं यांचं. केवळ रुचिपालट म्हणून एखादे दिवशी आचार्यांशी अध्यात्मावर गप्पा! उपनिषदाच्या चर्चा चालू असताना पन्नासदा कापसाचे भाव विचारीत असतात फोनवरून. मला काही कळेनासंच झालंय.

**श्याम :** मग तू आचार्यांना विचार. आपण अर्जुनाची भूमिका घ्यावी असं आचार्य नाही का म्हणाले?

**गीता :** मला कुणाचीच भूमिका घ्यायची नाही. मला माझी-माझी भूमिकाच घ्यायला हवी.

**श्याम :** जरूर घे. पण गीता, ती बट पुन्हा आली बघ गालावर.

**गीता :** अहो, पण तुम्ही पाहू नका माझ्या तोंडाकडे. (बट मागे सारते आणि डोक्यावरून पदर घेते.)

**श्याम :** छे छे–तसा पदर नको घेऊ.

**गीता :** का?

**श्याम :** (अत्यंत जेरीला आल्याच्या स्वरात) आता काय सांगू तुला–भलतीच सुरेख दिसतेस तू त्यामुळं. रागावू नको गीता, पण हे असं होतं. मी शिबिरात देखील जायचं बंद करणार आहे.

**गीता :** का?

**श्याम :** खरं सांगू का तुला? त्या शिबिरात आहेत सगळ्या तरुण मुली.

**गीता :** मग त्या काय खातात तुम्हांला?

**श्याम :** खात नाहीत–गिळतात. ती दात्यांची रजनी आहे तिथं–तुला माहीत नसेल–गोरी गोरी उंच–काळेभोर डोळे आहेत ती. काही कारण नसताना दोनचार वेळा माझ्याशी बोलून गेली. उगाच काहीतरी उषाताईचा निरोप म्हणून माझ्या अगदी कानाशी लागून बोलत होती. शिबिरात जायचं तिथं खादीच्या पातळावर अत्तर कशाला शिंपडून यायला हवं! चित्त विचलित होतं अशामुळं.

**गीता :** (हसते.)

**श्याम :** तू का हसलीस? क्षुल्लक वाटतात ह्या गोष्टी गीता, पण छिद्रेष्वनर्था बहुलीभवन्ति!

**गीता :** मग मी जाते तर.

**श्याम :** तू नको जाऊस ग. मी हवं तर तुला बुद्धिबळं शिकवतो. केवळ अनासक्त कर्मयोग म्हणून. काल आचार्य नाही का म्हणाले, माणूस लोण्यासारखा हवा. पाण्यात राहून पाण्याचा स्पर्श नाही. (ही वाक्ये बोलत बुद्धिबळाचा पट आणतो.)

**गीता** : (सोंगट्या घेऊन) ह्याला काय म्हणतात ?

**श्याम** : सगळं सांगतो. हा राजा. हा वजीर. आपण ह्याला वजीर म्हणतो. इंग्लिशमध्ये ह्याला क्वीन म्हणतात.

**गीता** : छान ! बाकी कालिदासानंच म्हटलं नाही का ? गृहिणी सचिवः- राजाचा सचिव आणि राणी एकच की.

**श्याम** : हा हत्ती ! हा सरळ चालतो.

**गीता** : सरळ म्हणजे ?

**श्याम** : सरळ म्हणजे-हा असा किंवा असा. हा असा तिरका जात नाही. तिरका हा उंट जातो.

**गीता** : हा सरळ जात नाही ?

**श्याम** : नाही. हा तिरका. फक्त तिरका जातो. हा घोडा-हा अडीच घरं जातो. म्हणजे हे-हे-हे-आणि हे घर. हा असा. घोडा फक्त असाच जातो.

**गीता** : असं का पण ?

**श्याम** : असं का ह्या प्रश्नाला बुद्धिबळात उत्तर नाही.

**गीता** : खरंच असं का ? ह्या प्रश्नापुढं बुद्धीचं सगळं बळ तोकडं पडतं, नाही ? उंट अडीच घरं का जातो ?

**श्याम** : उंट नाही. घोडा—

**गीता** : हो, चुकले, घोडा. घोडा असा का वागतो ? उंट सरळ का जात नाही ? ह्याला उत्तर नाही—

**श्याम** : बस. ते तसेच जायचे. उंटानं उंटासारखंच गेलं पाहिजे-घोड्यानं घोड्यासारखंच गेलं पाहिजे.

**गीता** : बरोबर आहे. हा त्यांचा स्वधर्म आहे. तिरका जाणारा उंट मरेल पण सरळ जाणार नाही. परधर्म भयावह आहे. पुष्कळ वेळा प्रश्न पडतो, मग माझा स्वधर्म कुठला ? केवळ परिस्थितीनं जो स्वीकारायला लावला तो ? तो स्वधर्म ? तो धर्म बदलता येणार नाही ?

**श्याम** : अग, तू बुद्धिबळं शिकणार आहेस ना ?

**गीता** : (आपल्या तंद्रीतून एकदम भानावर येऊन) हो शिकते आहे ना. तुमच्यासारखे गुरुजी मिळाल्यावर कोण शिकणार नाही ?

**श्याम** : उगीच हरभऱ्याच्या झाडावर चढवू नकोस मला. नीट लक्ष दे. (पट नीट मांडू लागतो.) मघाचा श्लोक काय म्हणालीस तो ? क्रोधात् भवति संमोहः—

**गीता** : संमोहात् स्मृतिविभ्रमः–(अभावितपणे मघाशी भिकू माळ्याने दिलेल्या गुलाबांच्या गुच्छातील एक फूल वेणीत घालते.)

**श्याम** : संमोहात् स्मृतिविभ्रमः-स्मृतिभ्रंशात्—

**गीता** : बुद्धिनाशो...बुद्धिनाशात्—

**श्याम** : प्रणश्यति! (उषा येते.) लक्ष दे नीट.

**उषा** : (श्याम आणि गीताला बुद्धिबळे खेळताना पाहून) श्याम! गीता! काय हे!

**गीता** : मला बुद्धिबळं शिकवताहेत हे.

**उषा** : श्याम, का तिला नाही त्या गोष्टीची चटक लावतोस ?

**श्याम** : अग, मी कुठे शिकवतोय ? ही म्हणाली म्हणून.

**उषा** : खोटं बोलू नकोस.

**श्याम** : उषाताई, तू ऐकशील का माझं ?

**उषा** : मला काही ऐकायचं नाही. खेळत होतास तिच्याबरोबर तर खेळत होतो म्हणून कबूल का नाही करीत ? खोटं का बोलतोस ?

**श्याम** : खोटं ? उषाताई, गेले दहाबारा दिवस तू रात्रंदिवस शिबिरात असतेस. माझ्यातलं परिवर्तन तुला कुठून कळणार ? उषाताई, खोटं बोलणं सोडून मला सहा दिवस झाले. मी सिगारेट सोडली. चहा सोडला. मोह तर सारखे टाळतोय मी. काकाजी शिकारीला चला म्हणत होते, हिंसा करायची नाही म्हणून शिकारीला गेलो नाही.

**उषा** : चावटपणा करू नको. सत्य, अहिंसा असल्या शब्दांची विटंबना तुझ्या तोंडून नाही ऐकायची.

**श्याम** : उषाताई, क्रोध आवर. (थंडपणाने सांगतो.) मनाला लगाम घाल.

**उषा** : श्याम, मी इतकं बोलतेय तुला, तरी थंडपणानं बोलायला लाज नाही वाटत तुला ?

**श्याम** : उषाताई, हे बघ. (वही उघडतो.) नाभिनन्दति न द्वेष्टि—

**उषा** : श्याम, गीतेची चेष्टा करू नकोस अशी.

**श्याम** : अत्यंत निष्काम मनानं तिला बुद्धिबळं शिकवणं ही गीतेची चेष्टा होतेय असं वाटत नाही मला.

**उषा** : ही गीता नाही म्हणत मी. पांचट कोट्या करू नकोस.

**श्याम** : उषाताई, तू चिडली आहेस. क्रोधामुळं संमोह. संमोहामुळं बुद्धिनाश आणि बुद्धिनाशामुळे तू प्रणश्यति. तुझा विनाश दिसतोय मला.

**उषा** : (तिला वाटते, की श्याम आपली थट्टा करतोय्. चिडून बुद्धिबळातला हत्ती मारते.) श्याम ! !

**श्याम** : (हत्ती झेलतो.) उषाताई ! हिंसेनं काय होणार आहे ?...ह्या बुद्धिबळातल्या हत्तीनंच काय, पण खऱ्या हत्तीनं देखील मी मरणार नाही. तू कोण मारणारी आणि मी कोण मरणारा ? नैनं छिन्दन्ति शस्त्राणि—नैनं—नैनं—पाहिलंस, पुढलं आठवत नाही मला. आचार्यांना आठ दिवसांत गीता पाठ म्हणून दाखवायचं वचन दिलंय् मी.

**उषा** : श्याम, तुला वेड तर नाही ना लागलं ? गीता, तू का बोलत नाहीस ?

**श्याम** : गीता, बोलू नकोस. (वही उघडून) आणीबाणीच्या काळात मौन हे सर्वांत सामर्थ्यवान् शस्त्र आहे. उषाताई, तूही पाचदहा मिनिटं मौन पाळता आलं तर पाहा हवं तर. दोनचार तास उपास करून चित्तशुद्धि होतेय् का पाहा—मनात प्रार्थना कर. म्हण, क्रोधात् भवति संमोहः—

**उषा** : श्याम, मला जरा स्वस्थ बसू दे. मला काहीच कळेनासं झालंय्. गीता, मला थोडं पाणी आणून देशील का ?

**श्याम** : जा गीता. सेवेचा क्षण वाया घालवू नकोस. (गीता जाते.)

**उषा** : श्याम, झालंय् काय तुला ?

**श्याम** : तू आता अंतर्बाह्य शांत झाली आहेस का ?

**उषा** : श्याम, पाया पडते मी तुझ्या. सरळ बोल.

**श्याम** : अत्यंत सरळ बोलतोय् मी उषाताई, तुझ्याशी मी वाकडं कसं बोलेन ? वास्तविक हल्ली मला तुझे पाय धरावेसे वाटतात.

**उषा** : (थोडीशी घाबरून) श्याम—

**श्याम** : होय, उषाताई. माझी एक विनंती ऐकशील का ?

**उषा** : काय हवं तुला ! गॅबर्डिनचा सूट हवा असेल ! तू इंजिनिअरिंगच्या

शेवटच्या परीक्षेत पास हो. पुढल्या वर्षी मी तुला एक नाही दोन सूट्स शिवून देईन.

**श्याम** : सूट ! थांब. जगन्नाथ–जगन्नाथ–(जगन्नाथ येतो.)

**जगन्नाथ** : श्यामभय्या, अजून नाही पाठ झालं.

**उषा** : काय ते ?

**श्याम** : मी त्याला गीतेतले श्लोक पाठ करायला सांगितलं आहे.

**उषा** : कुणाला ? जगन्नाथाला ?

**श्याम** : जगन्नाथ, भिकू माळी, वासूअण्णा, सगळ्यांना. काकाजी शिकारीचं निमित्त करून आचार्य आल्यानंतर पळाले आहेत; पण ते परत आल्यावर त्यांनाही सोडणार नाही.

**उषा** : कुणी सांगितलं तुला हे ?

**श्याम** : आचार्य ! तू सुटाचं विचारीत होतीस ना ? जगन्नाथ, काल मी तुझ्या मुलाला काय दिलं ?

**जगन्नाथ** : चार सूट दिले म्हणून सांगत होता–खुषीत आहे—

**उषा** : तुझ्या मुलाला सूट दिले ?–का ?

**श्याम** : वस्त्रदान ! देऊन टाकले. माझी टेनिसची रॅकेट दिली एका मित्राला. आता माझी इंजिनिअरिंगची पुस्तकं, हत्यारं सगळं देऊन टाकणार आहे मी–

**उषा** : का पण ? आणि करणार आहेस काय ?

**श्याम** : आचार्य ! उषाताई, मला आचार्यांनी नवी जाग आणली. मी गेले चार दिवस दाढीदेखील केली नाही हे तुझ्या लक्षात आलेलं दिसत नाही.

(जगन्नाथाला हसू आवरत नाही.)

**उषा** : जगन्नाथ–तू का उभा ? जा पाहू.

**श्याम** : उषाताई, किती कठोर बोलतेस ! (वही काढून शब्द पाहात) आत्मौपम्यबुद्धीनं जगाकडे पाहायला शीक. तुझा आत्मा आणि जगन्नाथाचा आत्मा यांत काय फरक आहे बरं ? (प्रेमळपणाने) जगन्नाथराव, जा. तेवढा अध्याय पाठ झाला पाहिजे.

**जगन्नाथ** : जमणार नाही श्यामभय्या.

**श्याम** : का ? वासूअण्णा शिकवत नाही ?

**जगन्नाथ** : वासूअण्णा काय पढवणार खाक? तो आणि भिकूमाळी बसले आहेत थंडाई पीत. ही असली असली गोळी चढवली आहे एकेकानं. बंभोला झाले आहेत दोघेही.

**श्याम** : जा, त्यांना घेऊन ये.

**उषा** : श्याम, मरू दे त्यांना. जा बघू तू जगन्नाथ! (जगन्नाथ जातो. गीता पाणी घेऊन येते. उषा पाणी पिते.) थँक्यू.

**श्याम** : उषाताई, माझी विनंती ऐकली नाहीस तू.

**उषा** : कसली विनंती?

**श्याम** : उषाताई, आचार्यांना इथंच राहू दे कायमचं.

**उषा** : श्याम? (तिला धक्काच बसतो. ती चपापून गीतेकडे पाहते.) श्याम, म्हणायचंय् काय तुला? आचार्य इथं कसे राहतील?

**श्याम** : मग मी जाईन आचार्यांबरोबर.

**उषा** : अरे पण तुझं कॉलेज?

**श्याम** : काय अर्थ आहे ह्या कॉलेजच्या शिक्षणात?

**उषा** : म्हणजे पुढल्या वर्षी इंजिनिअर ना होणार तू?

**श्याम** : काय करणार आहे मी इंजिनिअर होऊन? आज राष्ट्राला माझी गरज आहे. इंजिनिअर! ते काय ज्ञान आहे? उषाताई, हे मी तुला सांगावं? हे म्हणजे अर्जुनानं कृष्णाला गीता उलट ऐकवण्यापैकी आहे. हे पाहा–आचार्य म्हणतात–(वही काढतो.) 'तू कोण आहेस ते आधी जाण. बाकी ज्ञान फुकट आहे.' उषाताई, ही गीतेसारखी तरुण मुलगी आत्मज्ञानाच्या शोधार्थ आचार्यांच्या बरोबर निघाली आणि मी—

**उषा** : अस्सं. गीता, तू आत्मज्ञानाच्या शोधार्थ निघाली आहेस?

**गीता** : मी कसल्याच शोधासाठी निघाले नाही उषाताई. अहो, अनाथ मुलगी मी. जिथं अन्न मिळालं, वस्त्रं मिळालं, तिथं मी राहिले. आचार्यांच्या आश्रमात आजपर्यंतचं आयुष्य गेलं माझं. आचार्यांनी प्रार्थना म्हण म्हटलं की प्रार्थना म्हणायची. सूत काढ म्हटलं की सूत काढायचं. रस्ते झाड म्हटलं की रस्ते झाडायचे. हे का करायचं? असं का? यानं काय होणार आहे? याचा कधीच विचार केला नाही मी. असं का? आत्ताच यांनी मला ह्या प्रश्नाचं उत्तर दिलं.

**उषा** : कुणी ? श्यामनं ?

**गीता** : होय ! त्यांच्या बुद्धिबळानं. घोडा अडीच घरं चालायचा ! उंट तिरका-हत्ती सरळ. असं का ? त्यांनी असं कां चालायचं ? त्यांना विचार करायला परवानगी नाही. पाप आहे ते. आमच्या आश्रमातली प्रत्येक स्त्री आणि प्रत्येक पुरुष ह्या पापाच्या भीतीनं सारखा भेदरलेल्या अवस्थेत वावरत असतो. पापाची केवढी प्रचंड यादी सांगितली होती आम्हांला. किती गोष्टीत पाप आहे ! एकदा वरं का उषाताई...जाऊ दे-कंटाळा येईल तुम्हांला.

(मनाला खूप त्रास देणाऱ्या आठवणीने व्याकुळ होते.)

**उषा** : (तिची ती अवस्था पाहून अत्यंत सहानुभूतीच्या स्वरात) सांग ना गीता—

**गीता** : (जराशी स्तब्ध राहते आणि बोलायला सुरुवात करते.) प्राथमिक शाळेत होते मी. सातआठ वर्षांची असेन-आमच्या वर्गातल्या एका मुलीनं दुपारच्या खाण्यात कांद्याची भजी आणली होती-खूप आवडली मला-आश्रमात असलं काही होत नसे. मी आश्रमातल्या स्वैपाकीणबाईला सांगितलं कांद्याची भजी करायला-तिनं चोरून मला भजी करून घातली.

**उषा** : चोरून ?

**गीता** : भजी, चिवडा, हे वर्ज्य असायचं आश्रमात. तामसी आहार खायचा नाही. तमोगुण वाढतो म्हणे. शाळकरी मुलगी मी. मला काय तमोगुण कळणार ? मी भजी खाल्ल्याची गोष्ट आश्रमातल्या मंडळींनी आचार्यांना सांगितली., तीन दिवस सगळ्या आश्रमानं मौन धरलं होतं माझ्याशी. मला वाटे, ही माणसं खूप मार का देत नाहीत मला ? सारे जण गप्प. उषाताई, तुम्ही भाग्यवान आहा. तुम्ही आपल्या आईवडलांच्या हातचा मार तरी खाल्ला असेल. मला मात्र भलतीच शिक्षा मिळाली हो. तीन दिवसांनी साऱ्या आश्रमभर गळ्यात एक पाटी अडकवून मला फिरवलं. प्रत्येकाजवळ जाऊन मी सांगायचं, 'मी चोर आहे. मी भजी खाल्ली'—केवढा भयंकर अपराध ! कित्येक दिवस मला कुणाशी बोलायचं धैर्य होत नसे. शाळेतल्या पोरी भातुकली खेळायच्या, नाचायच्या, गाणी म्हणायच्या. आम्ही वयाच्या पाचव्या वर्षापासून म्हणत आलो, मरणं प्रकृतिः शरीरिणाम्. लहान पोरींच्या तोंडांत काय सुंदर होतं नाही हे तत्त्वज्ञान ?

**उषा** : मग तू राहिलीस कशी आश्रमात ?

**गीता** : कुठं जाणार होते मी? माझे बाबा तुरुंगातच वारले. आयुष्यभर देशासाठी त्यांनी खस्ता काढल्या. लहानपणापासून मलाही प्रत्येकाने हेच ऐकवलं, तू क्रांतिकारकाची मुलगी आहेस. तू आपलं आयुष्य देशाच्या सेवेत काढलं पाहिजेस. तू लग्न करता कामा नयेस–संसार? छे–छे. तू क्रांतिकारकाची मुलगी आहेस. उंटाची इच्छा असो वा नसो, त्यानं तिरकंच चाललं पाहिजे ना उषाताई?

[उषाला गीताचा हा आवेग पाहावत नाही. तिला ती जवळ घेते. तिच्या गालांवरून आपले दोन्ही हात फिरवते. तिच्याकडे पाहते. काही क्षणांनंतर एक बारीक स्मिताची झाक उषाच्या चेहऱ्यावर येते.]

**उषा** : (एकदम) श्याम! गावात चांगलं पिक्चर कुठं लागलं आहे रे?

**श्याम** : पिक्चर! गेल्या दहा दिवसांत एकही जाहिरात वाचली नाही मी. उषाताई, पिक्चर म्हणजे वैषयिक वासना.

**उषा** : श्याम! पोपटपंची करू नकोस.

**श्याम** : उषाताई, मला नवी जाग येते आहे. त्याला पोपटपंची म्हणू नकोस.

**उषा** : शहाणपणा करू नको जास्त! हे वर्तमानपत्र घे, आणि पिक्चर कुठं चांगलं लागलंय् ते बघ. थांब हं गीता–(लगबगीने आत जाते.)

**श्याम** : झालंय काय उषाताईला? (वर्तमानपत्र चाळतो.) हे पाहा. आचार्य पोफळे भगिनी शिक्षा–ऑं आचार्य पोफळे भगिनी शिक्षा?–हं–खाली आहे, मंडळात–शिक्षा मंडळात व्याख्यानसत्र. अलोट गर्दीपुढे निष्काम सेवेविषयी मौलिक विचार!...फक्त चार ओळीत रिपोर्ट छापलाय. आणि ह्या जाहिराती बघ केवढ्या छापल्या आहेत!–अलोट गर्दीचा पहिला आठवडा–वा! वा! इकडेही अलोट गर्दी. गर्दीची तरी कमाल आहे यार! गौतमचित्र सहर्ष सादर करीत आहे...माझी बायको माझा नवरा...शीः शीः शीः! काय गौतमाच्या नावाची विटंबना ही! हे बघ. मस्त नाच, मस्त गाणी–मनाच्या महालात माशुकांचा मुक्काम. काय भाषा! मुहब्बतकी निशानी–प्रमुख भूमिका गार्गी! नटीचं नाव गार्गी! म्हणजे परवा आचार्यांनी प्रवचनात तिची गोष्ट सांगितली तीच ना ग? कसली वादिनी होती ग ती?

**गीता** : ब्रह्मवादिनी.

**श्याम :** आहाहा–कुठे ती ब्रह्मवादिनी गार्गी आणि कुठं ही दिल्चस्प नाचगाणीवाली गार्गी! आचार्य म्हणतात ते खोटं नाही–जीवनाची मूल्यंच बदलली पाहिजेत.

(उषा हातात जॉर्जेटची साडी आणि ब्लाउझ घेऊन येते.)

**उषा :** हे घे!

**श्याम :** हे काय? जॉर्जेटची साडी? तुझ्याकडे कुठली ग आली?

**उषा :** तुला काय करायचं आहे? गीता, नेस ही.

**गीता :** मी?

**उषा :** हो तू!

**गीता :** उषाताई, तुमचा काहीतरी गैरसमज झालाय.

**उषा :** पुष्कळ गैरसमज झाले आहेत माझे. ही साडी नेस, हा ब्लाउझ होईल तुला. आणि ते गुलाबाचं फूल––

**गीता :** (दचकून) चुकून घातलं होतं मी फूल––

**उषा :** राहू दे ते!–नाहीतर–हे घे–हे टपोरं आहे चांगलं.

**गीता :** नको उषाताई, आचार्यांना कळलं तर रागावतील माझ्यावर.

**श्याम :** आचार्य रागावणं शक्य नाही. ते क्रोधाच्या पलीकडे केव्हाच गेले आहेत. पण उषाताई, का तू गीताला हे असं नटायला सांगते आहेस?

**उषा :** तुझ्याच भाषेत सांगायचं म्हणजे आजचा दिवस पाहू दे ना उंटाला आपली चाल बदलून. जा बघू तू गीता. ऐकणार नाहीस का माझं? जा. (गीता जाते.) आणि श्यामबाबू, तुम्ही देखील दाढीबिढी करून छान सूटबीट चढवा––

**श्याम :** हे काय वाईट आहेत? मी हे कपडे घालून काल जिमखान्यावर गेलो होतो टेनिस रॅकेट घ्यायला. आमच्या कॉलेजमधली कारटी लागली टिंगल करायला आमची. मी मनात म्हटलं, परमेश्वरा, ह्या गाढवांना क्षमा कर.

**उषा :** म्हणजे? हे असले कपडे घालून तू जिमखान्यावर गेला होतास?

**श्याम :** म्हणजे तुला अजून चेष्टा का वाटते आहे ताई? मी तुला मघाशी म्हणालो नाही का? हल्ली मला तुझे पाय धरावेसे वाटतात.

आप्पाट
आरज

उषा : कशाबद्दल ?

श्याम : माझ्या जीवनात हे प्रचंड परिवर्तन घडवून आणल्याबद्दल. खरोखर, आचार्यांची भेट झाली नसती–तर काय झालं असतं माझं ? इंजिनिअर होऊन नुसती घरं बांधीत बसलो असतो मी कुठे तरी.

उषा : म्हणजे तू इंजिनिअर होणार नाहीस ?

श्याम : आत्म्याचा शोध लागेपर्यंत तरी मुळीच नाही.

उषा : अरे श्याम, तुला झालंय तरी काय ? (गीता ती साडी घेऊन परत येते.) काय ग गीता–तयार नाही झालीस अजून ? श्याम, कुठला चांगला सिनेमा लागला आहे ?

श्याम : (एकदम बोलून जातो.) माझी बायको माझा नवरा. (जीभ चावतो.) नाही नाही—उषाताई, चुकून सांगितलं मी. पाहिलंस वासना किती प्रबळ असतात ? छे छे छे. कुठलाही सिनेमा चांगला नाही.

उषा : त्यातल्या त्यात जो चांगला असेल त्याला जा ह्या गीतेला बरोबर घेऊन.

श्याम : उषाताई, का उगीच मोहाच्या तोंडी देतेस ?

उषा : श्याम ! आता बस्र हं उगीच बडबडलास तर—

श्याम : ठीक आहे. ठीक आहे, तुझं मन मोडायचं नाही म्हणून जातो. आचार्य म्हणतात की, मन मोडणं ही देखील एक प्रकारची हिंसा आहे. पण मी हा असा जाईन.

उषा : चल बघू गीता. (उषा गीतेला घेऊन वरच्या खोलीत जाते. श्याम डाव्या बाजूच्या खोलीत जातो आणि लगेच घडी केलेली एक शाल खांद्यावर टाकून येतो.)

श्याम : उषाताई, मी तयार आहे हं.

उषा : (वरच्या दारातून डोकावत) थांब रे, मी वेण्या घालते आहे गीतेच्या.

श्याम : कशाला हव्यात त्या वेण्या आणि फण्या ?

उषा : तुला काय करायचं आहे ? आणि हे काय ? तू असाच ?

श्याम : असाच म्हणजे ? ही शाल घेतली आहे ना ?

उषा : अरे, कशाला हे ढोंग ?

श्याम : उषाताई, तू बोलते आहेस हे ? अग हे ढोंग नाही. दोन वेण्या हे

ढोंग आहे. आज दोन वेण्या घालाल, उद्या तीन, परवा चार–तेरवा दहा वेण्या घालाल. कशासाठी हे? परवा आचार्यांनी त्या ययातीची गोष्ट सांगितलेली ऐकलीस ना? भोग, आसक्ती, गीतेत स्वच्छ म्हटलंय—(गीतेचे पुस्तक उघडतो.)

**उषा :** बैस थोडा वेळ गीता वाचत. (जाते.)

**श्याम :** (चौपाईवर आसनमांडी घालून बसतो व गीता वाचू लागतो.) प्रजहाति यदा कामान् सर्वान् पार्थ मनोगतान्। आत्मन्येवात्मना तुष्टः स्थितप्रज्ञस्तदोच्यते। श्री भगवान् बोले!–हे पार्थ, जब मनुष्य मनमें पैदा होनेवाली कामनाओंको छोड़ देता है–और आत्माद्वारा आत्मामेंही संतुष्ट रहता है–तब वह स्थितप्रज्ञ कहलाता है–(पुन्हा वाचतो.) जब मनुष्य...मनमें...कामना...(हे तो पुटपुटत असताना अतिशय फॅशनेबल अशा तीन मध्यम वयाच्या बायका दारात येऊन थबकतात. श्याम वाचनात दंग आहे. त्या बायकांपैकी एकीच्या हातात पुष्पहार, दुसरीच्या हातात सुताचा हार आणि तिसरीच्या हातात गुच्छ आहे. शेवटी मिसेस् पळसुले धीर करून पुढे जातात अणि 'नमस्ते' म्हणतात. श्याम दचकून त्यांच्याकडे पाहतो. त्या श्यामच्या गळ्यात हार घालतात.)

**श्याम :** अहो, हे काय!

**मिसेस् पळसुले :** सेवा! (बाकीच्या दोघी 'हो' म्हणतात. मिसेस् काळे तुरा देतात. मिसेस् नाडकर्णी सुताचा हार घालतात.)

**श्याम :** अहो पण...हा काय चावटपणा आहे? (एकदम डोळे मिटून थांबतो. पुटपुटल्यासारखे करतो.) क्षमा करा हं–एकदम क्रोध आला मला–पाहिलंत? अजून मन शांत होत नाही–हळूहळू होईल. आपण बसा–आपल्याला कोणाला भेटायचं आहे?

**मिसेस् पळसुले :** आपल्यालाच—

**श्याम :** मला?

**मिसेस् नाडकर्णी :** होय, आपल्यालाच! आम्ही अतिविशाल महिला मंडळाच्या कार्यकारिणीच्या पदाधिकारिणी आहोत—

**श्याम :** पुन्हा एकदा सांगा हं–अतिविशाल काय? काय ते माझ्या नीट लक्षात नाही आलं—

**मिसेस् पळसुले :** मी सांगते–ह्या मिसेस् नाडकर्णी–ह्यांचे मिस्टर इथे डेप्युटी कमिश्नर ऑफ इक्साइझ आहेत–

**मिसेस् नाडकर्णी :** होते म्हणा की मिसेस् पळसुले–

**श्याम :** अरे अरे अरे–काय झालं त्यांना? बाकी व्हायचंय काय म्हणा! प्रत्येकाला एक दिवस जायचंच आहे. पण आत्मा अमर आहे सांगून ठेवतो–

**मिसेस् नाडकर्णी :** तसं नाही–ते डेप्युटी कमिश्नर होते. म्हणजे ते आहेत–पण डेप्युटी कमिश्नर नाहीत, कमिश्नर आहेत.

**मिसेस् काळे :** पण टेंपररी आहे ना हो ही अपॉइंटमेंट? परवा क्लबात मिसेस् घोरपडे म्हणाल्या की मिस्टर घोरपडे रजेवर गेले आहेत तोंपर्यंत ही टेंपररी ऑफिशिएटिंग अपॉइंटमेंट आहे म्हणून.

**मिसेस् नाडकर्णी :** मिसेस् घोरपड्यांचं सांगू नका मला. मिस्टर घोरपडे रजेवर गेले आहेत म्हणून सांगते काय? शी इज ए लायर–घोरपड्यांना सस्पेंड केलं आहे. पाच लाख रुपये खाल्ले आहेत–माझ्या मिस्टरांनीच आणलं उघडकीला ते फ्राइड.

**श्याम :** फ्राइड?

**मिसेस् पळसुले :** फ्रॉड म्हणायचं आहे त्यांना.

**मिसेस् नाडकर्णी :** फ्राडच म्हणाले मी. मुलांना अमेरिकेला पाठवायला पैसा काही पगारातून नाही आला.

**मिसेस् पळसुले :** म्हणजे खरं सांगू का? आपण आहोत ना? त्याच्यापेक्षा ग्रेट आहोत असं दाखवायचं–बॅड हॅबिट् नाही का हो मिसेस् काळे?

**श्याम :** एक मिनिट हं–

**मिसेस् काळे :** सॉरी हं–

**मिसेस् नाडकर्णी :** मी एक्स्प्लेन करते आपल्याला. आमचं एक अतिविशाल महिला मंडळ आहे–

**मिसेस् पळसुले :** एक्स्क्यूज हं जरा–इथं पूर्वी एक नुसतंच विशाल महिला मंडळ होतं–

**मिसेस् काळे :** होतं का? आहे की अजून–भटीण काकूंचं मंडळ–
(तिघीही खीः खीः करून हसतात.)

**मिसेस् नाडकर्णी :** बावळट मेल्या! नुसत्या ठमाबाई आहेत सगळ्या... आमचं मंडळ कास्मो—(खाकरतात.)...कास्मो...(खाकरतात.) कास्मो...

**मिसेस् पळसुले :** कॉस्मोपॉलिटन म्हणायचंय् त्यांना—आमची प्रेसिडेंट आहे मिस् पेरिन् इंदूरवाला. मिसेस् अबदुल्ला व्हाइस् प्रेसिडेंट आहेत. त्यांचे मिस्टर इथं डी. एस्. पी. आहेत. ट्रेझरर मिस् क्लारा डिकुन्हा आहेत. त्यांचे मिस्टर—

**मिसेस् नाडकर्णी :** अय्या वंडरफुलच! अहो मिस् डिकुन्हाचं लग्न कुठं झालंय अजून? पण त्यांचे फादर रेल्वेत ऑफिसर आहेत—

**मिसेस् पळसुले :** हो हो! आमचे दोघींचेही मिस्टर गव्हर्मेंट ऑफिसर आहेत—आणि ह्या मिसेस् काळे. ह्यांचे मिस्टर—(ते काय करतात ते नक्की सांगता येणे अवघड झाल्यामुळे अडखळतात.)

**मिसेस् नाडकर्णी :** घरचे बरे आहेत.

**मिसेस् पळसुले :** हो! माझे मिस्टर क्लास वन सर्व्हिसमध्ये आहेत—

**मिसेस् नाडकर्णी :** अय्या वंडरफुलच आहात की तुम्ही मिसेस् पळसुले—माझेही मिस्टर क्लास वनमध्येच आहेत की—आमच्या मंडळात सगळ्या कास्मो-कास्मो—

**मिसेस् काळे :** कॉस्मोपॉलिटन् म्हणायचं का तुम्हांला मिसेस् नाडकर्णी!

**मिसेस् नाडकर्णी :** घशात अडकल्यासारखं झालं म्हणून थांबले हो मी—आमच्या मंडळात कॉस्मोपॉलिटन् ॲक्टिव्हिटीज चालतात—

**मिसेस् पळसुले :** परवा आम्ही कॉस्मोपॉलिटन् होळी साजरी केली—अय्या! काय मजा आली—झालंच तर गेल्या महिन्यात बॅडमिंटन् कोर्टाच्या जीर्णोद्धार फंडासाठी नाटक केलं. त्यात माझ्या मिस्टरांनी हीरोचा रोल इतका सुंदर केला होता—

**मिसेस् नाडकर्णी :** अय्या—आमच्याही मिस्टरांनी काम केलं होतं की.

**मिसेस् काळे :** इश्श! ते कसलं काम? नुसतं पोस्टमऽऽन् म्हणून पत्र टाकल—

**मिसेस् नाडकर्णी :** पण न्याचरल किती होतं ते—मिसेस् पळसुल्यांच्या मिस्टरांचं भाषण जरासं पाठ असायला हवं होतं, नाही का हो?

**मिसेस् पळसुले :** अहो, पण ऑफिस संभाळून कसं शक्य आहे? नाट्याची सेवा म्हणून केलं—त्याशिवाय आमच्या मंडळात एक बॉल डान्स झाला—हरिजन

कॉलनीला भेट दिली आम्ही–तिथल्या बायकांच्यासाठी आता भरतकामाचे आणि विणकामाचे क्लासेस सुरू करतोय् आम्ही—

**श्याम** : कुठल्या ?–हरिजन बायकांसाठी ?

**मिसेस् नाडकर्णी** : अय्या–हरिजन बायकांना निटिंगबद्दल काही माहिती नाही–त्यांनी नुसती वूल आणायची. विणायला आम्ही फुकट शिकवणार आहो. आपणही आमच्या मंडळात यावं अशी इच्छा आहे आमची.

**श्याम** : मी ? कशाला ? विणकाम शिकायला ? (तिघीही हसतात.)

**मिसेस् नाडकर्णी** : अय्या, आपण फार विनोदी आहात ! असंच विनोदी भाषण आमच्या मंडळात द्यावं अशी फार इच्छा आहे–विनोदी भाषणाला खूप गर्दी जमते—

**मिसेस् पळसुले** : पण थोडंसं आध्यात्मिक पाहिजे नाही का ? आमच्या मंडळात दर गुरुवारी सत्संग असतो. सर्व धर्मांच्या बायका अनेक भाषेत भजनं गातात–शिवाय स्पिरिच्युअल सेंटर आहे–इथले प्रोफेसर येळकोटवार ज्ञानेश्वरीवर काय सुंदर प्रवचन सांगतात–शिवाय अधूनमधून योगासनं–शीर्षासनं ह्यांचाही क्लास असतो–माइंड कसं अगदी पीसफुल राहतं–खरं तर प्लेन लिव्हिंग आणि हाय थिंकिंग पाहिजे–नाही का हो मिसेस् काळे ?

**मिसेस् काळे** : हो !

**मिसेस् पळसुले** : आता हेच बघा ना–आमच्या मिस्टरना फोर्टीन हंड्रेड मिळतात—

**मिसेस् नाडकर्णी** : म्हणजे डी. ए. आणि अलावन्सेस धरून असेल–कारण त्यांचा बेसिक पे–मला वाटतं, आमच्या मिस्टरांच्यापेक्षा कमी आहे—

**मिसेस् पळसुले** : अहो, पण सगळे मिळून फोर्टीन हंड्रेड होतात. पण पै राहात नाही शिल्लक. पगार वाढला की खर्च वाढले. कुक आहे, बेरा आहे, हमाल आहे, आया आहे, इतके माजले आहेत ! सारखी पगारवाढ मागतात. शिवाय साड्या घ्याव्या लागतात. माझ्या आता जवळजवळ दोनशे साड्या झाल्या. साड्या म्हणजे मॅचिंग ब्लाउझ आले, सॅण्डल्स आले. खरंच, कुठं आवरावं कळत नाही.

**श्याम** : हेच म्हणतो मी. मोह एकदा सुरू झाला, त्यानं तुमच्या मनाचा ताबा घेतला, की तुम्ही मेलात.

**मिसेस् नाडकर्णी :** हेच-हेच सांगा आपण आमच्या मंडळात. बायकांची चांगली खोड जिरेल नाही का हो ?

**मिसेस् पळसुले :** नाही तर काय ?

**श्याम :** थांबा हं. मी उषाताईला बोलावून आणतो. (जातो.)

**मिसेस् काळे :** का हो मिसेस् नाडकर्णी, तरुण आहेत नाही आचार्य ?

**मिसेस् नाडकर्णी :** अहो वयावर काय आहे ? विवेकानंद देखील तरुणच होते म्हणे शेवटपर्यंत.

**मिसेस् पळसुले :** उषाबाई म्हणजे ती उषा देवासकर नाही का हो ?

**मिसेस् काळे :** अय्या, तुम्ही पाहिली नाही का तिला ? शिष्ट आहे अगदी.

**मिसेस् पळसुले :** तुम्ही पाहिलं आहे का तिला ?

**मिसेस् काळे :** मंडळात सांगत होती मिसेस् रहाळकर.

**मिसेस् पळसुले :** तिचं हे शिबिर म्हणजे तर नॉन्सेन्स आहे म्हणे अगदी. फॅशन करू नका-लिपस्टिक लावू नका-असला चावटपणा आहे म्हणे तिथं. आमची बेबी म्हणत होती मला, ममी, मला शिबिरात जायचंय म्हणून-पण मी साफ सांगितलं, आय वॉंट अलाव यू ! तिचे डॅडीही म्हणाले, 'नथिंग डुइंग.' गर्ल गाइडमधे जा म्हटलं. त्यांचा ड्रेस काय सुंदर आणि स्मार्ट असतो नाही का हो !

**मिसेस् काळे :** किती, एकोणीस वर्षांची आहे का हो तुमची बेबी ?

**मिसेस् पळसुले :** छे हो, सोळावं चालू आहे.

**मिसेस् नाडकर्णी :** सोळावं कसं असेल ? आमच्या अंजलीलाच तर पंधरावं लागलं. आमच्या अंजूपेक्षा चार वर्षांनी मोठी नाही का तुमची बेबी ? आमच्या अमिताभबरोबरची ?

**मिसेस् पळसुले :** जाऊ दे बाई तो वयाचा हिशेब-इथं कोणाला लग्नं जमवायची आहेत ?

**मिसेस् नाडकर्णी :** खरंच, ह्या देवासकरांच्या घरातला एक मुलगा इंजिनिअरिंग कॉलेजात आहे, नाही ?

**मिसेस् पळसुले :** असेल बाई.

**मिसेस् नाडकर्णी :** ह्यांच्या घरात वडील माणूस कुणी नाही वाटतं ?

**मिसेस् काळे :** वा ! अहो ही दोन भावंडं-त्यांच्या काकांनी वाढवली. काकाजी

देवासकर म्हणजे इंदुरातला एके काळचा डॉन् वॉन्. (ह्या वाक्याला उषा वरच्या खोलीतून जिन्यावर येते.)

**मिसेस् नाडकर्णी** : डॉन् वॉन् नावाचा सिनेमा लागला होता नाही का हो ?

**मिसेस् काळे** : अहो डॉन् वॉन् म्हणजे अगदी रंगेल! अनेक षौक केले म्हणे काकाजी देवासकरांनी.

**मिसेस् नाडकर्णी** : हो का ? कुठं असतात ते ?

**मिसेस् काळे** : ते फॉरेस्ट ऑफिसर होते. जंगलातल्याच कुठल्या तरी एका बाईबरोबर लग्न केलं म्हणे. पुढे वाटतं ती बाई काय मेली. भावाची पोरंही पोरकीच होती, ती सांभाळली. अहो, आता आला तुम्ही इंदुरात. पूर्वी इंदूर म्हणजे काय होतं ?–गाणी काय, वजावणी काय, त्यात हे काकाजी म्हणे अगदी पुढं पुढं असायचे–बायकांच्या बाबतीत तर अगदी 'हा' होता म्हणे हा काकाजी. असं म्हणतात हो–आपल्याला काही बाई अनुभव नाही.

**उषा** : आणि तरीही वाटेल ते बोलता आहात तुम्ही त्यांच्याबद्दल ? (तिघीही दचकतात. उषा जिन्यावरून पायऱ्या उतरत बोलते.) का ? असल्या निंदा करायला तुमच्या महिला मंडळातली जागा अपुरी पडते का तुम्हांला ?

**मिसेस् पळसुले** : ह्याला काही चांगल्या म्यानर्स म्हणत नाहीत, बरं का मिस् देवासकर.

**उषा** : आणि लोकांच्या घरात येऊन त्यांच्या कुटुंबातल्या माणसांबद्दल वाटेल ते बडबडणं ह्या चांगल्या मॅनर्स वाटतं ? काय काम आहे तुमचं इथं ?

**मिसेस् पळसुले** : आमचं आचार्यांशी काम आहे.

**उषा** : आचार्य घरात नाहीत.

**मिसेस् नाडकर्णी** : अय्या—म्हणजे खादी घालून खोटंही बोलता का तुम्ही ? आम्ही प्रत्यक्ष बोलो आता आचार्यांशी.

**उषा** : केव्हा ?

**मिसेस् नाडकर्णी** : म्हणजे एवढा थोर पुरुष तुमच्या घरात केव्हा येतो नि केव्हा जातो ह्याकडे लक्षही नाही का तुमचं ? (श्याम येतो...तो उषा वर आहे हे विसरून बाजूच्याच खोलीत जाऊन शोधून आला आहे.)

**श्याम** : कुठं नाहीशी झालीस ग तू ?

**उषा :** नाहीशी कशाला होईन ? वर नव्हते का रे मी ?

**श्याम :** हो हो–जरा गोंधळल्यासारखं झालं मला.

**उषा :** गोंधळायला काय झालं रे ? गीता तयार झाली आहे–घेऊन जा तिला तुझ्याबरोबर नीट.

**मिसेस् नाडकर्णी :** अगबाई ! एवढ्या मोठ्या माणसाला तोंड टाकून बोलवतं तरी कसं म्हणते मी !

**उषा :** कोण एवढा मोठा ? हा श्याम्या ? धाकटा भाऊ आहे माझा तो.

**मिसेस् नाडकर्णी :** मी म्हणत नव्हते तुम्हांला ?

**मिसेस् काळे :** तुम्ही कधी म्हटलंत ? (हारतुरे लगबगीने गोळा करतात.)

**उषा :** काय काम होतं तुमचं ?

**मिसेस् पळसुले :** ते आचार्यांनाच सांगू आम्ही.

**मिसेस् नाडकर्णी :** पण मिस् देवासकर, फारच इन्सलटिंगली झालं हं हे तुमचं वागणं—गव्हर्मेंट ऑफिसर्सच्या बायकांशी वागताना तरी—

**उषा :** गव्हर्मेंट ऑफिसर्सच्या बायका ? स्वतंत्र अस्तित्व आहे का तुम्हांला ? तुमचेच फोन येत होते ना मला, खादीची पातळं कुठं मिळतात ते विचारायला ?

**मिसेस् काळे :** अय्या, मग त्यात काय झालं ? तुम्हीच तर व्याख्यानं देता ना खादी वापरा–खादी वापरा म्हणून ?

**उषा :** आपण जाऊ शकता.

**मिसेस् नाडकर्णी :** आचार्यांच्या कानावर घातलंच पाहिजे.

**उषा :** काय वाटेल ते करा. आता लवकर जा बघू इथून. भिकू–वासूअण्णा—

**श्याम :** अग ते गीता पाठ करीत असतील.

**उषा :** चूप—भिकू–वासूअण्णा—

**वासू :** आलोऽऽ (सोबत भिकू माळी येतो. दोघेही अगदी पार पोहोचले आहेत. ग्यानबा तुकाराम करताना जशा तालात झोकांड्या जातात तशा देत आहेत.) उषाताई, स्थितप्रज्ञ कसा दिसतो आधी सांगा. (त्यांचा अवतार पाहून अतिविशाल महिला मंडळाच्या कार्यकारिणीच्या ह्या तिघी पदाधिकारिणी जिन्यात पळतात.)

**भिकू :** थांबा वासूअण्णा. पण आत्मा–आत्मा कुठे आहे ?

**वासू :** आत्मा–श्यामभय्या सापडला आत्मा! (श्यामला मिठी मारून त्याच्या पायाला हात लावून नमस्कार करतो.) घाबरू नका बाई. आत्मा अमर आहे. भिकू—

**भिकू :** आत्मा अमर आहे.

**उषा :** श्याम! काय हे? बघतोस काय?

**श्याम :** थांब उषाताई! ह्यांना काहीतरी सापडलं आहे. आचार्य म्हणत होते की, आत्मा सापडला की माणूस बेहोष होतो.

**वासू :** श्यामभय्या, सापडला. अस्सल हातानं केलेला आत्मा सापडला. घोटून घोटून बारीक गोळी केली त्याची आणि बंभोला.

**भिकू :** वासूभय्या कमाल आहे!

**उषा :** जगन्नाथ–जगन्नाथ—

(जगन्नाथ येतो.)

**वासू :** जगन्नाथ, आत्मा सापडला.

**भिकू :** जगन्नाथ, पहिले मला सापडला.

**जगन्नाथ :** ए आत्मावाले, पेलत नाही तर घेता का रे गोळी? चल.

**भिकू :** मुद्दइ लाख बुरा कहे तो क्या होता है?

**जगन्नाथ :** (त्याची गचांडी धरून) चला चला. वही होता है जो मंजूरे खुदा होता है. (दोघांच्याही गचांड्या धरून बाहेर नेतो.)

**मिसेस् नाडकर्णी :** अहाहा! वंडरफुल हं! हे ह्या घरातलं कल्चर! कुठल्या नरकात येऊन पडले आहेत आचार्य!

**उषा :** आता बऱ्या बोलानं निघता इथून की—

**मिसेस् काळे :** इथं कोण आलंय राहायला?

**उषा :** जा जा–चालत्या व्हा. (चौपाईवरची भगवद्गीता काढून फेकते. ती आत येणाऱ्या आचार्यांना लागते.)

**आचार्य :** ऑं!! (पुस्तक उचलतात.) गीता? उषाताई, काय आहे हे? गीतेचं पुस्तक म्हणजे काय चेंडू आहे अशी आबादुबी खेळायला?

**उषा :** तुम्हांला आचार्यांशी बोलायचं आहे ना? बोला त्यांच्याशी. (वरच्या खोलीत जाते.)

**आचार्य** : श्याम! काय प्रकार आहे हा? उषा अशी तणतणत का गेली?
**श्याम** : आचार्य, मी काय सांगू? क्रोध-संमोह–संमोहामुळं बुद्धिनाश.
**आचार्य** : कुणाचा बुद्धिनाश?
**श्याम** : दुसऱ्या कुणाचा? उषाताईचा!
**आचार्य** : मूर्खासारखं बडबडू नकोस.
**मिसेस् पळसुले** : ते म्हणतात ते खरं आहे.
**आचार्य** : आपण कोण?
**श्याम** : ह्या अतिविशाल महिला.
**आचार्य** : शुद्धीवर आहेस की भांग प्याला आहेस?
**श्याम** : म्हणजे आपल्यापर्यंत आलं वाटतं!
**आचार्य** : काय ते?
**श्याम** : भांग!
**आचार्य** : कसली भांग?
**श्याम** : भांग, आचार्य. आधी ती चढवतात, मग ती आपल्याला चढते.
**आचार्य** : कुणाला चढली?
**श्याम** : वासूअण्णा आणि भिकू माळी दोघांनाही.
**आचार्य** : मग काय झालं? ह्या घराच्या संस्कृतीला साजेसं झालं. तुमचे काका कुठे गेले?
**श्याम** : ते गेले शिकारीला. मी सांगितलं त्यांना, निष्कारण हिंसा करू नका. पण त्यांचं अजिबात इंचभर देखील हृदयपरिवर्तन झालं नाही. आपलं कोणीही ऐकत नाही हल्ली या घरात. वासूअण्णा आणि भिकू माळ्याला गीता पाठ करायला सांगितली, म्हटलं त्यांचं हृदय पालटेल, पण त्यांचं डोकंच पालटलंय. सगळ्यांचा बुद्धिनाश होतोय. आचार्य, तुम्हीच वाचवा.

**मिसेस् काळे**
**मिसेस् पळसुले** } : अरे अरे अरे—
**मिसेस् नाडकर्णी**

**आचार्य** : ह्यांना का अशा ताटकळत उभ्या ठेवल्या आहेस?
**श्याम** : त्या आपण होऊन राहिल्या आहेत आचार्य.

**आचार्य** : मग त्यांना बसा म्हणून का नाही सांगितलंस ?
**श्याम** : बसा.
**मिसेस् नाडकर्णी** : असू दे. आपल्याला आम्ही निमंत्रण द्यायला आलो होतो.
**आचार्य** : कुठे ?
**मिसेस् पळसुले** : अतिविशाल महिला मंडळात.
**आचार्य** : ठीक आहे. गीता कुठे आहे ?
**श्याम** : गीता—(गीता जॉर्जेटची साडी नेसली असेल ह्या कल्पनेने घाबरतो.) गीता... गीता...
**आचार्य** : गीता गीता काय करतो आहेस ?
**श्याम** : मला एक शंका आली आहे आचार्य.
**आचार्य** : कसली शंका ?
**श्याम** : कुठल्याही परिस्थितीत सत्यच बोललं पाहिजे का ? मला सत्य ह्या विषयावर थोडंसं सांगा.
**आचार्य** : सांगतो. पण आधी यांचं काम करू. माझी वासरी कुठे ?
**श्याम** : वासरी ? तुम्ही गाईच्या दुधातुपाबद्दल सांगितलं होतं. वासरी—वासरीबद्दल—
**आचार्य** : ठोंब्या !
**श्याम** : (परक्या बायकांपुढे ठोंब्या म्हणाल्यामुळे वरमतो. खोटं हसून-) हे मनापासून म्हटलं नाही बरं का आचार्यांनी. ठोंब्या वगैरे प्रेमानं म्हणतात ते मला. हे...
**आचार्य** : श्याम, अरे वासरी कुठं माझी ? डायरी—दैनंदिनी.
**श्याम** : गीतेजवळ असेल—
**आचार्य** : मग तिलाच बोलाव म्हणतो ना मी.
**श्याम** : नको. मी आणतो वासरी. (पळतो.)
**आचार्य** : क्षमस्व ! मुलगा जरा धांदरट आहे. हं कसलं मंडळ म्हणालात ?
**मिसेस् पळसुले** : अतिविशाल महिला मंडळ ! आपलं एक तरी प्रवचन आमच्या मंडळात झालंच पाहिजे. आमच्या मंडळात सर्व धर्मांच्या भगिनी आहेत.
**आचार्य** : छान !

**मिसेस् पळसुले :** आपण तारीख आणि वेळ ठरवू. मी माझी गाडी घेऊन येईन.

**मिसेस् नाडकर्णी :** हवी तर मीही घेऊन येईन. आमचीही गाडी आहे.

**मिसेस् काळे :** आमची वर्कशॉपमध्ये रिपेरला पडली आहे. आज देतो, उद्या देतो अशा नुसत्या थापा मारतात हे वर्कशॉपवाले.

**आचार्य :** असत्य हा आजच्या युगाचा धर्म होऊ पाहतोय. आत्ताच बद्रिनारायणजींच्या घरी बोलताना मी हेच सांगितलं.

**मिसेस् नाडकर्णी :** बद्रिनारायण? काय गडगंज पैसा केलाय काळ्या बाजारात!

**आचार्य :** पुरावा आहे का तुमच्याकडे? या देशात बेजबाबदार विधानं करायची पोरापासून थोरापर्यंत सवयच जडली आहे. बद्रिनारायणजींचा आणि माझा गेल्या वीस वर्षांचा परिचय आहे. आम्ही तुरुंगात बरोबर होतो. परवाच त्यांनी अनाथालयाला एक चाळ दान दिली ना.

**मिसेस् पळसुले :** हो. पण म्युन्सिपाल्टीनं ती चाळ पाडायचा हुकूम दिला होता. एवीतेवी पडायचीच होती ती चाळ.

**आचार्य :** पण दानाची भावना आहे ना?

**मिसेस् नाडकर्णी :** हे बाकी खरं हो. आमच्या महिला मंडळाला अध्यात्माच्या अभ्यासासाठी म्हणून पन्नास हजारांचा हॉल बांधून द्यायचं कबूल केलं आहे शेठजींनी. आम्ही सकाळसंध्याकाळ बॅडमिंटनला आणि दुपारी अध्यात्माला वापरणार आहोत तो हॉल.

**आचार्य :** उत्तम.

**श्याम :** (आतून येत) ही डासरी—आपली बायरी, नाही डायरी.

**आचार्य :** असा गोंधळलास का? हं, लिही. केव्हा आहे प्रवचन?

(तिघीही आपापल्या पर्समधून छोट्या डायऱ्या काढतात.)

**मिसेस् काळे :** उद्या ठेवू या.

**मिसेस् नाडकर्णी :** (त्यांना उद्देशून) उद्या नको. उद्या लेडीज क्लबात ब्रिज टूर्नामेंट्स आहेत. परवा ठेवा.

**मिसेस् काळे :** परवा—(डायरी पाहून) सॉरी! परवा—मिसेस् लॅंबर्टच्या घरी पार्टी आहे—

**मिसेस् पळसुले** : मग परवा सकाळी ठेवा.
**मिसेस् काळे** : सकाळी प्रवचनाला कोण येणार ? गुरुवारी ठेवा ना.
**मिसेस् पळसुले** : अय्या, गुरुवारी केशभूषास्पर्धा आहे ना महूला ?
**मिसेस् काळे** : मग शुक्रवारी ठेवा.
**मिसेस् नाडकर्णी** : वंडरफुलच आहात तुम्ही. अहो, शुक्रवारी आपल्या मंडळात राणीबालेचा डान्स नाही का ?
**मिसेस् काळे** : अय्या–आयडिया. त्याच वेळी ठेवा. डान्सला खूप बायका जमतात. त्याच्या आधी ठेवू. नंतर नको हं. डान्स झाला की बायका लगेच जायला लागतील–(आचार्यांना) आपल्याला शुक्रवारी यायला सवड होईल ना ?
**आचार्य** : (भयंकर संतापून) चालत्या व्हा !
**श्याम** : आचार्य, क्रोध आवरा.
**आचार्य** : तू मला शहाणपणा शिकवू नकोस ! आमचं प्रवचन म्हणजे काय वाटलं तुम्हांला ? मूर्ख–मूर्ख आहात तुम्ही.
**श्याम** : त्यांची मनं दुखवू नका, आचार्य. मनं दुखवणं ही हिंसा आहे ना !
**आचार्य** : हिंसा-अहिंसेचा विवेक तू मला सांगतोस ? गीता हातात धरून किती दिवस झाले ?
**श्याम** : दहा—
**आचार्य** : मी गेली चाळीस वर्षं वाचतोय गीता. ह्यांना पार्टी आहे. ह्यांना पत्ते झोडायचे आहेत–ह्यांना नाचायचं आहे–ह्यांच्या सोयीनं माझं प्रवचन ? अरे, प्रवचन म्हणजे काय हळदीकुंकू वाटलं की काय ह्यांना, की संक्रांतीपासून पुढच्या दहा दिवसांत केव्हाही करावं ?
**मिसेस् नाडकर्णी** : वंडरफुलच बाई, आम्ही सोयीच्या तारखा पाहात होतो.
**आचार्य** : कुणाची सोय ? नाच, पत्ते, तमाशे, ह्यातच एक प्रवचन !
**मिसेस् पळसुले** : नाही तरी सगळ्यांनाच तुमचा उपदेश कसा आचरणात आणता येईल ? नाही का हो मिसेस् काळे ?
**मिसेस् काळे** : तरी मी म्हणत होते तुम्हांला.
**मिसेस् नाडकर्णी** : अगदीच वंडरफुल की हो तुम्ही !
**मिसेस् पळसुले** : तुम्हीच तर ठराव मांडला. मी देखील म्हणत होते...

**आचार्य** : तुमची भांडणं मोटारीत बसून संपवा. कशाला थांबलात ?' (त्या बायका हारतुऱ्याकडे पाहतात. आचार्य त्यांच्या अंगावर हारतुरे फेकतात.) जा. घेऊन जा. (बायका तरतरत जातात. आचार्य येरझारा घालू लागतात व स्वतःशीच बोलतात.) नाच...गाणी...पत्ते...त्यातच प्रवचन. सगळ्यांनाच तुमचा उपदेश कसा आचरणात आणता येईल म्हणे...मूर्ख ! बस्स, प्रवचन म्हणजे एक आपली करमणूक...

**श्याम** : त्या बायका गेल्या आचार्य...

**आचार्य** : जाऊ देत. वाजले किती ?

**श्याम** : (खिशातून घड्याळ काढीत) सहा वाजायला दोन मिनिटं कमी आहेत.

**आचार्य** : प्रार्थनेची तयारी झाली ? गीता कुठे आहे ? गीताऽऽ—(जिन्यावरून गीता एकएक पायरी उतरत येते. जॉर्जेटची सुंदर साडी नेसली आहे. कानांत कर्णभूषणे आहेत. केशभूषाही आकर्षक आहे. श्याम तिच्याकडे आश्चर्याने पाहतो. आचार्य त्याच्या चेहऱ्याकडे पाहून त्या दिशेने पाहतात.) कोण ? गीता ? श्याम ! काय समजू मी ह्या प्रकाराचा अर्थ ?

**श्याम** : मी काय सांगू आचार्य ? उषाताई कुठे गेली ?

**गीता** : बरं वाटत नाही म्हणून जरा पडल्या आहेत.

**आचार्य** : काय झालं बरं न वाटायला ? आत्ता तर गीतेच्या पुस्तकाचा चेंडू करून खेळत होती. अरे अरे, हे काय घर आहे की पागलखाना ? गीता ? अशी समोर ये.

**श्याम** : आचार्य, तिचा काही दोष नाही. माझाच अपराध आहे.

**आचार्य** : वाटलंच मला !

**गीता** : त्यांचा मुळीच अपराध नाही.

**श्याम** : अग, असं काय म्हणतेस ? माझाच अपराध आहे. मी मोहाला प्रवृत्त का झालो ? मी 'हो' म्हटलं नसतं तर काय बिघडलं असतं ? आचार्य, दहा दिवस झाले, मी माझ्याकडून भरभक्कम प्रयत्न करून राहिलोय. पण अजून मनोविजय नाही मिळत. तुमच्या सांगण्याप्रमाणे मिरची सोडली, एक वेळचं जेवण सोडलं. चहा सोडला, सूट सोडले आणि असल्या दोन अर्ध्या विजारी आयत्या आणल्या खादीच्या. सकाळ, दुपार, संध्याकाळ प्रार्थना चालू आहे.

मनात जरा वाईट विचार आले की गार पाण्यानं आंघोळ करतो. हा इथला पुतळा, उचलून फेकून दिला. पूर्वी त्याचं काही वाटत नसे. पण मनोविजय मिळवायला लागल्यापासून त्याचं भयंकर स्वरूप कळलं. गीतेशिवाय विचार नाही दुसरा.

**आचार्य** : काय ? (नंतर त्यांच्या लक्षात भगवद्गीता हे येते.) हां-हां.

**श्याम** : पण...आचार्य, सत्य सांगतो. गीता, तू थोडीशी आत जाशील का ? मला थोडंसं सत्य बोलायचं आहे.

**आचार्य** : मग तिला कशाला आत जायला सांगतोस ?

**श्याम** : पण तिच्यासमोर बोलण्यासारखं सत्य नाही ते आचार्य.

**आचार्य** : ह्याच्यासमोर बोलण्यासारखं सत्य, त्याच्यासमोर बोलण्यासारखं सत्य, असे सत्याचे वेगवेगळे नमुने असतात म्हणून कुणी सांगितलं तुला ?

**श्याम** : असं आपलं माझं मलाच वाटलं. तुम्ही रागावणार नसाल तर सत्य सांगतो.

**आचार्य** : सत्याच्या उपासकानं निर्भय असायला पाहिजे. मी रागावलो-नव्हे -मी जरी तुला जिवंत जाळून भस्म करीन असं वाटलं तरी सत्य सांगायला तू भिता कामा नयेस.

**श्याम** : बाकी तुम्ही रागवालच कसे म्हणा !

**आचार्य** : का नाही रागावणार ? राग येण्यासारखं असेल तर जरूर रागावेन.

**श्याम** : पण क्रोधातून बुद्धिनाश नाही का होत आचार्य ? आणि बुद्धिनाशात् विनाश ! म्हणजे खेळ खलास !

**आचार्य** : (आता तेही जरा गडबडले आहेत.) ठीक आहे, ठीक आहे. तुला जें सत्य सांगायचं आहे ते सांग.

**श्याम** : पुन्हा केव्हा तरी सांगेन. ही गीता समोर असताना ते सत्य सांगायची छाती होत नाही माझी.

**आचार्य** : (गीतेला) तू का इथं उभी ? कुठे निघाली होतीस हा शृंगार करून तिथं जा.

**श्याम** : तसं नाही आचार्य.

**आचार्य** : मला रदबदली आवडत नाही. तू का बोलत नाहीस गीता ?

(गीता गप्प आहे. आचार्य गप्प आहेत. श्यामला ती शांतता असह्य होते.)

**श्याम :** मला वाटतं प्रार्थनेला सुरुवात करू या. अर्जुनने कहा—स्थितप्रज्ञस्य का भाषा (त्याला कोणीच साथ देत नाही.)...उषाताई आली नाही आजच्या दिवस तर चालेल, नाही का आचार्य ? (कुणीच बोलत नाही...उठून खिडकीजवळ जात...) आचार्य, बाहेर ढग जमायला लागले आहेत. एखादेवेळी पाऊस पडेल बरं का. (पुन्हा सर्व गप्प...तो एकदम आचार्यांच्या जवळ जातो.) आचार्य ! वाटलं तर सत्य सांगतो, पण तुम्ही गप्प बसू नका. तुम्ही बोला काही तरी. बोला. मघाशी ही गीता सांगत होती, की आश्रमात हिनं भजी खाल्ली म्हणून तीन दिवस मौन धरलं होतं सर्वांनी. काय हाल झाले असतील तिचे ! मला कल्पना आली. तुम्ही दोन मिनिटं गप्प झाल्याबरोबर आपण तर भय्या हैराण झालो. आचार्य, काही चुकलं असेल तर जोड्यांनी मारा. मला ठाऊक आहे, जोड्यांनी मारणं तुमच्या अहिंसेत बसणार नाही. चुकून सुचवला मी उपाय. पण गप्प बसू नका आचार्य. मी पाय धरतो तुमचे.

**आचार्य :** ऊठ. तुझ्या हातून घडलेल्या अपराधाबद्दल पश्चात्ताप वाटतोय ना तुला ?

**श्याम :** माझ्या हातून अजून अपराध घडला नाही आचार्य. एखादे वेळी घडला असता. पण...नाही. हो...वाटतो पश्चात्ताप.

**आचार्य :** तुझं काय म्हणणं आहे गीता ? तुला वाटतो की नाही पश्चात्ताप ?

**गीता :** कशाबद्दल ?

**आचार्य :** म्हणजे ? पश्चात्ताप वाटत नाही तुला ?

**गीता :** पश्चात्ताप वाटूनच प्यायचं ठरवलं तर पुढल्या सगळ्या आयुष्यात मला पश्चात्तापच करीत बसावं लागेल.

**आचार्य :** काय अर्थ तुझ्या बोलण्याचा ?

**गीता :** तुम्हांला कळायचा नाही तो.

**आचार्य :** गीता ! कसलं भूत शिरलंय तुझ्या अंगात ? राक्षसी यंत्रावर निघालेला तामसी पोशाख अंगावर चढवल्याबरोबर कसले तामसी विचार खेळायला लागले तुझ्या मनात ?

**गीता :** तामसी की काय मला ठाऊक नाही, पण अनेक विचार खेळायला लागले हे खरं. उषाताईंनी माझी वेणी घातली, मला स्नो लावला, पावडर.

लावली, ही साडी नेसायला लावली, ही फुलं घातली माझ्या वेणीत, माझ्या कानांत डूल घातले, लहान मुली भातुकलीतली बाहुली नटवतात तशी नटवली त्यांनी मला. मला का कळत नाही, पण उषाताई माझे असे लाड करीत असताना माझं ऊर सारखं भरून येत होतं...मधला काळ जणू काय नाहीसा झाला. मी खूप लहान झाले. परीकथेतल्या त्या कुठल्याशा अभागी मुलीला ती परी भेटली होती—सुंदर सुंदर पोशाख दिला होता—मला उषाताई त्या परीसारख्या वाटल्या. ही साडी नेसल्यावर त्यांनी डोळे भरून माझ्याकडे पाहिलं—आणि त्यांच्या डोळ्यांतून एकाएकी अश्रूंच्या धारा सुरू झाल्या—त्यांना मी खूप विचारलं पण त्या सांगेनात—शेवटी मला म्हणाल्या—बेटा, तू लहान आहेस, आत्ताच सावध हो. मी पुन्हा विचारण्याचा प्रयत्न केला, पण त्यांनी नाही सांगितलं.

**श्याम** : हे असंच होतं गीता, सत्य सांगायचं म्हणजे ही अशी पंचाईत होते. नाही का आचार्य ?

**आचार्य** : कुठे जाणार होतीस हा पोशाख घालून ?

**श्याम** : माझ्याबरोबर...

**आचार्य** : कुठं ?

**श्याम** : (डोळे मिटून पुटपुटू लागतो.)

**आचार्य** : डोळे काय मिटतोस !

**श्याम** : प्रार्थनेनं मनाला जरा शक्ती आणतोय. तुमच्या प्रश्नाचं उत्तर द्यायला धीर होत नाही.

**गीता** : सिनेमा बघायला जाणार होतो आम्ही.

**आचार्य** : कोण कोण ?

**श्याम** : मी आणि गीता. केवळ कर्तव्य म्हणून आचार्य, अगदी निष्काम बुद्धीनं...

**आचार्य** : तू काय बोलतोस ते तुझं तुला तरी कळतंय का ?

**श्याम** : तुम्हीच परवा प्रवचनात सांगितलं नाही का ? अनासक्त राहा नि वाटेल ते करा. तसं मी हिला सिनेमाला नेणार होतो.

**आचार्य** : मग सिनेमा पाहायला असा हा नटीसारखा पोशाख करावा लागतो का ?

**श्याम** : नटी इतका पोशाख कुठे करतात आचार्य ? बहुतेक नटी आणि श्रीमंत

बायका कपडे वापरण्याच्या बाबतीत भयंकर चिक्कूपणा करतात. इतके पैसे मिळवतात, पण आचार्य, तुम्ही चोळ्या पाहिल्यात का हल्ली? बाकी तुम्ही कशाला पाहाल म्हणा. आमच्या इंजिनियरिंग कॉलेजात मुली नाहीत म्हणून बरं. नाही तर त्या आर्ट्स कॉलेजमधल्या पोरी, मघाच्या अतिविशाल महिला, अशा अर्धपोटी का हिंडतात देव जाणे! त्यामुळे मन किती वासनामय होतं, नाही आचार्य! तुम्ही मला सांगितलं, की वासना आली की गार पाण्यानं स्नान करावं. पण हल्ली ह्या बायका असे काही कपडे घालतात की, त्यामुळे आमच्यासारख्याला सबंध दिवस वाहत्या नळाखाली मुक्काम ठोकावा लागेल. आचार्य, मी सत्य सांगायला सुरुवात केली आहे आता.

**आचार्य :** पण तुला हे असलं सत्य अगदी आत्ता, इथं, गीतेसमोर सांगायला हवं होतं का?

**श्याम :** पण मघाशी तुम्हीच म्हणाला ना, की सत्य कुठेही सांगावं? (गीतेच्या चेहऱ्यावर हसू फुटते.) तुला का हसायला येतंय ग?

**आचार्य :** श्याम, तू आत जा. मला गीतेशी थोडं बोलायचं आहे.

**श्याम :** पण मी स्वस्थ बसेन. त्या दिवशी व्याख्यानात तुम्ही म्हणालात, काहीही गुप्त बोलू नये. गुप्ततेच्या पोटी पाप आहे.

**आचार्य :** तू जा बघू. (श्याम वरच्या खोलीत जातो.) ह्या मुलाला शहाणा म्हणावं की वेडा म्हणावं हेच कळत नाही.

**गीता :** प्रवचनातला प्रत्येक शब्द आचरणात आणायचे प्रयत्न चालले आहेत त्यांचे. अत्यंत सरळ निष्कपट स्वभाव आहे त्यांचा. त्यांचं काय चुकलं?

**आचार्य :** कुणाचंच काही चुकलं नाही. चुकलं आहे माझंच!

**गीता :** विचार करण्यासारखं आहे हे तुमचं वाक्य!

**आचार्य :** (त्यांच्या आयुष्यात गीता त्यांना असं कधी बोलली नव्हती. त्यांना एकदम धक्का बसतो.) गीता!

[उषा श्यामला घेऊन येते.]

**उषा :** गीता! तू अजून इथं का उभी? तुला काय सांगितलं होतं मी?

**आचार्य :** उषाताई, काय विचार आहे तुमचा? हा असला पोशाख गीतेला चढवून सिनेमाला पाठविण्यानं काय साधणार आहा तुम्ही?

**उषा :** तहानेल्याला आपण पाणी देतो, काय साधतो आपण? ह्या पोरीला मायेची तहान आहे.

**आचार्य :** मग आजपर्यंत मी काय केलं?

**उषा :** तुम्ही तिला अन्न, वस्त्र आणि निवारा दिला. माणसाला त्यापेक्षा खूप असं काही हवं असतं, ते मिळालं नाही या पोरीला.

**श्याम :** उषाताई, तू मोठ्या आजीबाईसारखी का बोलते आहेस? ह्या पोरीला म्हणे! तू काय अशी मोठी आहेस?

**उषा :** तुला कळणार नाही ते श्याम.

**श्याम :** मला काहीच कळणार नाही. आचार्यांना विचारलं की ते म्हणतात तुला कळणार नाही. परवा मी गीतेला विचारलं की, तुला पाहिलं की माझ्या मनात असं असं का होतं? तर ती म्हणाली तुला कळणार नाही. आता तूही तेच म्हण. म्हणजे कळतंय ते सगळं तुम्हांलाच. खरोखर मला काय करावं तेच कळेनासं झालंय. अशा प्रसंगात तुम्ही सापडला असता तर तुम्ही काय केलं असतं आचार्य?

**आचार्य :** (अनपेक्षित प्रश्नाने गोंधळून) मी? मी. मी काय केलं असतं? मनाला खंबीर लगाम घातला असता.

**श्याम :** पण कसा? मनाचा लगाम काय घोड्याच्या लगामासारखा बाजारात थोडाच मिळतो? छे, छे, आता थंडगार नळाखाली जाऊन बसतो.

**आचार्य :** नळाखाली बसायची काही आवश्यकता नाही. चल माझ्याबरोबर.

**श्याम :** कुठे?

**आचार्य :** सात वाजता शिबिरात प्रवचन आहे ह्याची आठवण आहे ना? आणि उषाताई, तुम्ही शिबिराच्या संचालिका.

**उषा :** माझं नाही लक्ष लागत त्या कामात.

**आचार्य :** का नाही लागत?

**उषा :** कोण जाणे!

**श्याम :** माझं ऐक उषाताई, गार पाण्यानं स्नान कर.

**गीता :** थांबा...मी येते.

**आचार्य :** नको! तू जा सिनेमाला. चल रे श्याम. माझी शाल कुठे आहे?

(श्यामने निघताना चुकून आचार्यांची शाल घेतलेली असते.)

**श्याम** : अरेच्या! ही तुमची शाल वाटतं? चुकून मी खांद्यावर घेतली. ही माझी इथं आहे.

**आचार्य** : तू कशाला शाल घेतोस?

**श्याम** : तुम्ही नको म्हणत असाल तर ठेवतो.

**आचार्य** : (वैतागून) घे हवी तर. (ते दोघेही जायला निघतात. डॉक्टर सतीश येतो. श्यामला आणि आचार्यांना सारख्या वेषात पाहून त्याला हसू येते.)

**आचार्य** : या—योग्य वेळीं आलात.

**सतीश** : ते कसं काय? आणि श्यामभय्या, हे 'हे' केव्हापासून?

**श्याम** : हे म्हणजे काय?

**सतीश** : हे म्हणजे—ही शाल—हा वेष.

**आचार्य** : तुम्ही काय सूट घालून जन्माला आला होता की काय?

**सतीश** : जन्माला ज्या अवस्थेत आलो त्या अवस्थेत वावरायचं म्हणजे कठीण आहे मामा. चांगलं आहे. उषाबाई, अभिनंदन!...आणि ह्या...गीता...? शाबास! म्हणजे बरीच बाटाबाटी झालेली दिसते ह्या आठ-पंधरा दिवसांत. गीता, तुला काय काकाजींनी दत्तक वगैरे घेतलं की काय?

**आचार्य** : श्याम! तुला ह्याचा शहाणपणा ऐकत उभं राह्यचंय का?

**श्याम** : थांबा, मी गाडी बोलावून घेतो.

**आचार्य** : काही नको गाडी. थोडा चाललास तर बिघडणार नाही. ह्या देशात लोकांना चालायला नको. चराति चरतो भगः। जास्तीत जास्त चालणाऱ्याचं भाग्य उदयाला येतं.

**सतीश** : म्हणजे पोस्टमन हा सगळ्यांत भाग्यवान.

**आचार्य** : श्याम! (आचार्य तडक निघतात व श्याम त्यांच्यामागून धावतो.)

**सतीश** : (उषाला) आपण नाही गेलात?...आणि गीता, अग हे काय हे?

**उषा** : का? ही साडी ओळखीची नाही?

**सतीश** : ह्या साडीची ओळख कशी विसरेन मी? पण ही साडी राहिली कशी तुझ्याजवळ? गीता, तुला माहिती आहे का ही साडी कुणी कुणाला दिली होती ते?

**उषा** : सतीश!

**सतीश :** पाहिलंस गीता, सत्य लपवतेय. बरं जाऊ दे. खरंच पण उषा, श्यामचं हे असं केव्हापासून झालं ?

**उषा :** चेष्टा करू नकोस...पण मला भीती वाटायला लागली आहे. श्याम इंजिनिअरिंग कॉलेज सोडायच्या विचारात आहे.

**सतीश :** आणि ?

**उषा :** बहुतेक आचार्यांच्या बरोबर जाईल असं वाटतं.

**सतीश :** ब्राव्हो ! वा ! तुला ह्यात भीती वाटायचं काय कारण ? आता काकाजींना दीक्षा दिलीस की सगळ्या घराचा आश्रम होईल. छान ! सकाळ-संध्याकाळ प्रार्थना. दुपारी प्रवचन. आणि उरलेल्या वेळात, दुधात मध घालणं चांगलं–मधात दूध घालणं चांगलं–की मधातच मध घालणं चांगलं ह्याच्यावर चर्चा करायच्या. नैष्ठिक ब्रह्मचर्य टिकवण्यासाठी मन जिंकायचं, की मन जिंकण्यासाठी नैष्ठिक ब्रह्मचर्य टिकवायचं ! केवढा उद्योग ! काय ग गीता, आणखी काय करतात तुमच्या आश्रमात ? कधी कधी चित्तशुद्धीसाठी उपास–होय ना ? ठीक असतं ते. चित्त आणि पोट दोन्ही साफ राहतात. ज्यांच्या अंगावर वस्त्र नाही, खायला अन्न नाही, त्यांना साधी राहणी आणि उच्च विचारसरणीचे डोस पाजायचे आणि ज्यांची खाऊन खाऊन पोटं हनवटीला टेकली आहेत त्यांना एक अध्यात्माचं स्वादिष्ट विरेचनचूर्ण द्यायचं. हेच ना ?

**गीता :** सतीशदादा, मला काय कळतंय त्यात ? कुंपणावर कोन्हांटी वाढते तशी वाढले मी आश्रमात. गवयाचं पोर सुरांत रडलं पाहिजे अशी जशी लोकांची अपेक्षा, तशीच क्रांतिकारकाची पोरगी ही देशासाठी मेली पाहिजे ह्या लोकांच्या इच्छेला बांधली गेले आहे मी. मला काही स्वतंत्र अस्तित्व आहे का ?

**सतीश :** चांगलं बोलतेस की ग बेटा ! कितवं वर्ष लागलं तुला ?

**उषा :** का ?

**सतीश :** सहज ! जगात वेदना जितकी सुंदर बोलते तितकं सुख नाही बोलत. सुख माणसाला मुकं करतं...वेदनेच्या पोटी काय सुंदर बोलणं येतं ? कुंपणावरच्या कोन्हांटीसारखी वाढलीस काय ? मग ह्या कोन्हांटीला आज हा साज कोणी चढवला ?

[गीता उषाकडे पाहते.]

**सतीश** : तू ?

**उषा** : का ?

**सतीशः** : अरे ह्या घराला झालंय काय? काही लोकं बिघडायला काय लागले आहेत, काही सुधारायला काय लागले आहेत ? गंमत आहे भय्या ! आमची सल्फा ड्रग्जदेखील इतक्या झटपट गुण नाही आणत.

**गीता** : पण आचार्य खूप रागावले आहेत.

**सतीश** : कोण मामा ना ? रागावण्यापलीकडे आयुष्यात केलंय काय त्यांनी ? अहिंसेचा इतक्या हिंसात्मक भाषेत प्रचार करणारा दुसरा आचार्य नसेल ह्यां देशात. दुर्वास आहे साक्षात. जाऊ दे ते. आता काय बेत आहे ?

**उषा** : काही नाही. गीतेला सिनेमा पाह्यला पाठवणार होते मी.

**सतीश** : छे छे छे-म्हणजे–तूही काय त्या वासूअण्णासारखी थंडाई घेतली आहेस की काय ? त्यांनी बाहेर बगीच्यात हैदोस मांडलाय. सडकेनं जाणायेणाऱ्या प्रत्येकाला आत्मा अमर आहे म्हणून बजावून सांगताहेत. बडा मझा आहे यार ! बाकी ह्या आत्म्याबित्म्याच्या भाषेला कसली तरी गुंगी चढल्याशिवाय रंग नाही येत. जमिनीला पाय लागलेले असले म्हणजे मग ही भाषा नाही सुचत.

[डोक्यावर होल्डॉल घेऊन भिकू माळी 'काकाजी, पण आत्मा अमर आहे' म्हणून ओरडत येतो...मागून वासूअण्णा...त्याच्या हातात बंदूक आणि गळ्यात थर्मास. मागून शिकारीच्या वेषात काकाजी...]

**काकाजी** : अरे यार, काय तमाशा आहे ?

**भिकू** : (होल्डॉल ठेवीत) पण काकाजी, आत्मा अमर आहे.

**वासू** : बंदुकीनी मरणार नाही आत्मा. (बंदूक ठेवतो.)

**काकाजी** : वा भाई वा ! डॉक्टरभय्या, ह्यांना देऊन द्या ना एकएक मॉर्फियाचं इंजेक्शन् ! दोघांनीही भलतीच गोळी लावलेली दिसते.

**वासू** : काकाजी, मला सांगा–

**काकाजी** : ए वाश्या—

**वासू** : पण काकाजी, सांगा–स्थितप्रज्ञ कसा दिसतो ?

**काकाजी** : इकडे ये. (त्याला खिडकीजवळ नेतात.) तो पाहा–तो गधा चालला आहे ना सडकेवरून, त्या गाढवासारखा दिसतो. त्याला आनंद नाही,

दुःख नाही, लाज नाही, लज्जा नाही, तो आंब्याच्या साली आणि कागद एकाच चवीनं खातो. तसा दिसतो स्थितप्रज्ञ! (वासूअण्णा खिडकीतून नमस्कार करतो.) जगन्नाथ–ए जगन्नाथ—

**जगन्नाथ** : (आत येत) जी—

**काकाजी** : अरे हे बघ, तू नाही ना घेतलीस भांग?

**जगन्नाथ** : ह्यांनी ठेवली कुठे मला?

**काकाजी** : ठीक आहे. हे दोन रुपये घे, आणि ह्या दोघांना मिठाई खिलवून दे बरं. भांग घेतली आणि खाल्लं नसेल काही! बुद्धू कहीं के—

**वासू** : पण काकाजी, मिठाईलाही आत्मा आहे.

**काकाजी** : (बंदूक घेऊन) गोळी घालतो लेका तुला आता.

**गीता** : (काकाजींनी बंदूक उचललेली पाहून घाबरून ओरडते.) आईऽऽ (जगन्नाथ त्या दोघांना नेतो.)

**काकाजी** : ही कोण पाहुणी! अच्छा? गीता? वाहवा! काय प्यारी दिसते ही पोरगी आता. बडी मासूम आहे बरं ही बेटी सतीशभैय्या. पाहिलंस गीता? वासूअण्णा आणि तो माळी! न पेलणाऱ्या गोळ्या चढवल्या म्हणजे असं होतं. मग त्या देशसेवेच्या असोत, अध्यात्माच्या असोत, नाहीतर भांगेच्या असोत. आणि तुझे आचार्य पोफळे गुरुजी कुठे गेले?

**गीता** : प्रवचनाला गेले शिबिरात.

**काकाजी** : आणि उषाताई, तुम्ही नाही गेलात?

**उषा** : नाही, श्याम गेलाय.

**काकाजी** : श्याम? प्रवचनाला? अरे म्हणजे आमचा वाघ गवत केव्हापासून खायला लागला?

**सतीश** : काही विचारू नका काकाजी. तुम्ही शिकारीला निघून गेलात, पण इथं हलकल्लोळ उडालाय. काहींची हृदयपरिवर्तनं झाली. काहींची हरवलेली सापडली. काहींना नवीन मिळाली. तुम्ही मात्र शिकारीवरून हात हलवीत परत आला वाटतं? का तुमचंही हृदयपरिवर्तन झालं?

**काकाजी** : अरे यार, काय सांगू? असला मस्त रानडुक्कर मारला होता पण घरी कसा आणायचा? आमची उषाताई खायला उठली असती ना आम्हांलाच!

पण ह्या खेपेला माशांची खूप शिकार केली. ऐसा मझा येऊन राहिला होता. फार पेशन्स लागतो बरं माशाच्या शिकारीला. चार चार तास गळ टाकून बसावं लागतं. तुमच्यासारख्यांना नाही जमणार.

**सतीश :** काय बोलताय काकाजी. आम्ही गेली कित्येक वर्षे गळ टाकून ठेवलाय पण मासा लागतोय कुठं गळाला ?

**काकाजी :** (उषाकडे पाहात) अच्छा ! अरे पण गळाला बांधलंय काय ?

**सतीश :** गळाला काय बांधलंय ? प्रेम बांधलंय, काकाजी, प्रेम बांधलंय.

[काकाजी मोठ्याने हसतात. उषा डोळे वटारून सतीशकडे पाहते व पडदा पडतो.]

वा. २१७५२
वि. ...नाटक
३१५१८६

# अंक तिसरा

[तोच दिवाणखाना. उजव्या बाजूच्या कोचावर काकाजी एकटेच बुद्धिबळाचा पट मांडून बसले आहेत. चौपाईवर श्याम मांडी घालून गीता वाचीत बसला आहे.]

**श्याम :** या निशा सर्वभूतानाम् तस्याम् जागर्ति संयमी....ज्या वेळी सगळी भुतं निजलेली असतात त्या वेळी संयमी जागत असतो. (हे वाक्य पाठ करू लागतो. मात्र लक्ष वारंवार बुद्धिबळाच्या पटाकडे जात असते.)

**वासूअण्णा :** श्यामभय्या–(हाक मारीत येतो.) हे गाईचं दूध.

**श्याम :** या निशा सर्वभूतानाम्–(ग्लास ठेवून दे असा इशारा करतो. वासूअण्णाची नजर पटावर जाते. तो प्रथम नुसता पटाकडे पाहात उभा राहतो. नंतर हळूच एक सोंगटी सरकवतो. काकाजी त्याला खुणेने 'बस' म्हणतात. वासूअण्णा एक खुर्ची ओढून त्यांच्यासमोर बसतो. त्यांचा खेळ सुरू होतो. श्यामचं लक्ष गीतेतून उडतं. त्याची नजर पटावर जाते. तोंडाने 'या निशा सर्वभूतानाम्' म्हणत तो वासूअण्णांच्या मागे येऊन उभा राहतो.)

**काकाजी :** वासूअण्णा, तुमची मूव्ह. चला, किती वेळ?

**वासूअण्णा :** थांबा जरा काकाजी. गेल्या पंधरा दिवसांत पार सवय सुटली आहे. गेले तीनचार दिवस घरात कसं शांत वाटतंय.

**काकाजी :** केव्हा येणार आहेत आचार्य दौऱ्यावरून परत?

**वासू :** श्यामभय्यांना ठाऊक.

**काकाजी :** काय रे श्याम? तुझे गुरुदेव वापस केव्हा लौटणार आहेत?

**श्याम :** त्यांचं उज्जयिनीला एक प्रवचन आहे. नंतर धारला. तिथून मांडूगडावर जाऊन येणार आहेत.

**काकाजी** : मांडूगडावर कशाला जाणार आहेत? बाजबहादूर-रूपमतीची कहाणी ऐकून आणखी डोकं तडकणार त्याचं. मी सांगतो तुला, आफत आहे भय्या, ह्या माणसानं आयुष्यात प्रेमबीम काही केलं आहे की नाही देव जाणे! वासूभय्या, वजीर संभाळ.

**श्याम** : वासूभय्या, सर्वभूतानाम्, (श्लोकाच्या चालीवर म्हणत आपण सोंगटी सरकवतो.)

**काकाजी** : ग्रँड! सुंदर मूव्ह केलीस श्याम. उठ रे वाश्या. श्यामला बसू दे.

**श्याम** : छे! छे! छे! हा मोह आहे काकाजी.

**काकाजी** : मोह? मोहात काय वाईट असतं सांग श्याम! जगात देवानं हे एवढे रंग निर्माण केले, सुगंध निर्माण केले, माणसाच्या जिभेला चव दिली, ती कशासाठी? काय वासूअण्णा?

**वासूअण्णा** : बरोबर आहे.

**काकाजी** : अरे, मग म्हण बरोबर आहे म्हणून. अरे, काही दाद द्याल की नाही? सगळा निसर्ग दाद मागून राहिलाय यार तुमच्याशी–वसंतात कोकिळा येऊन गाऊन जाते, तुमच्यासाठी. पावसाळ्यापूर्वी मेघांचा पखवाज चालू होतो आणि मोर नाचू लागतात–बिजलीचा कथ्थक सुरू होतो–कुणासाठी? तुमच्या-आमच्यासाठी ना? आपल्या देवासला पावसात हजारो बेडकं ओरडतात मेंडकी-रोडवर, ओहोहोहो! काय खर्ज लागतो एकेका बेडकाचा–असं वाटतं, की कोणी दशग्रंथी ब्राह्मण वेदपठण करून राहिले आहेत बेटे! काय?

**वासू** : हो.

**काकाजी** : अरे, मग 'हो' म्हण ना. कंजूषी का करता शब्दांची? श्याम, तुझी मूव्ह आहे.

**श्याम** : छे छे–मला काही सुचत नाही.

**काकाजी** : गीता कुठं गेली?

**श्याम** : ती आणि उषाताई गेल्या आहेत कुठे तरी भटकायला.

**काकाजी** : मग तू का नाही गेलास?

**श्याम** : माझा अजून अर्धा अध्यायदेखील पाठ होत नाही.

**काकाजी** : ठेवून दे ते पुस्तक.

**श्याम** : असं कसं काकाजी? मी आचार्यांना वचन दिलं आहे.

**काकाजी** : अरे, हे वय काय आचार्यांना वचन द्यायचं आहे? तुझ्याएवढा होतो मी, तेव्हा दहा पोरींना वचनं गेली होती माझी...

**श्याम** : छे छे छे—काय भयंकर बोलता हे काकाजी!

**काकाजी** : हे भयंकर नाही. पण तुझं हे जे काही चाललंय ते भयंकर आहे. कुणी सांगितलं तुला हे जीवनाचं सुतकी तत्त्वज्ञान? गीतेसारखी गोड पोरगी घरात पाहुणी आली आहे. मी तुझ्याएवढा असतो तर तिला पाताळपाण्याला घेऊन गेलो असतो. चोरल नदीची मजेदार वळणं दाखवली असती. क्षिप्रेच्या पाण्यात पाय बुडवून बसलो असतो दोन दोन तास आणि गालिबचे शेर ऐकवले असते तिला. देवासच्या टेकडीवरून उगवत्यामावळत्या सूर्याचे बदलणारे रंग पाहिले असते तिच्याबरोबर.

**श्याम** : पण हे सगळे मोह आहेत काकाजी. आचार्य म्हणतात, ह्या मोहापासून दूर राहिलं पाहिजे.

**काकाजी** : नुसत्या शरीरानं दूर गेलास की गेलास का मोहापासून दूर? कशाला थापा मारतोस? गीतेचा श्लोक पाठ करताना तुझ्या डोक्यात कुणाचा विचार चालू आहे? सांग ना. (श्याम गप्प राहतो.) तुला आवडली आहे की नाही ती पोरगी?

**वासूअण्णा** : काकाजी—बस्स, इथे दाद देऊ द्या मला. ही घ्या. (टाळी देतो.)

**श्याम** : वासूअण्णा, तुमचं काय काम आहे इथं?

**वासूअण्णा** : श्यामभय्या, हा प्रश्न गेल्या चाळीस वर्षांत देवासकर घराण्यातल्या एकाही पुरुषानं विचारला नव्हता मला! ह्या वाड्यात असं एक ठिकाण नाही, की जिथं माझं काम नाही. हां! डिके घराण्यातल्या तीन पिढ्यांचं इमान राबलंय इथं! काकाजी, वाक्य कसं आहे?

**काकाजी** : वा!

**वासू** : मग दाद द्या! श्यामभय्या, मी सांगू का? आम्ही आपली साधी माणसं. पानात पडेल ते खाल्लं, कानावर पडेल ते ऐकलं आणि अंगावर पडेल ते काम केलं. तुम्ही काय, आपली उषाताई काय, कॉलेजात पढाई करून शहाणी झालेली माणसं. पागल म्हणा मला, पण साफ सांगतो, हे जे काही चाललंय ना, ते बरोबर नाही.

**श्याम** : काय बरोबर नाही?

**वासू** : हे तुमचं दूध पिणं, न् उपास करणं.

**श्याम** : अहो, तुम्हांला काय कळतंय वासूअण्णा! गीतेचा एकदेखील श्लोक पाठ होईना तुम्हांला.

**वासू** : अहो, कसा होणार? ज्यात माझा जीव रमत नाही ते पाठ नाही होत. हां, आता बाजारातून जिनसा आणायला सांगा. हिशेब मांडायला सांगा. अर्ध्या पैची चूक सापडली तर डिक्र्यांचं नाव नाही लावणार. अहो, न आवडणाऱ्या गोष्टी पाठ करता आल्या असत्या, तर मॅट्रिक फेल कशाला झालो असतो? शाळेत मास्तरांच्या छड्या खाऊन जमलं नाही ते काय आता खजूर खाऊन जमणार आहे? अहो, कुत्र्याच्या शेपटीसारखे पिंड झाले आमचे, भगवद्गीतेच्या नळकांड्यात घातले म्हणून सरळ थोडेच होणार आहेत?

**काकाजी** : वाहवा! वासूभय्या, आठ दिवसांपूर्वीची भांग अजून बोलते आहे. अरे श्यामभय्या, दाद दे. दाद दे त्याला. खेळ.

**श्याम** : काकाजी, तुम्ही मला माझ्या मार्गातून मागे खेचताय्. मला मन जिंकायचंय्.

**काकाजी** : बेशक-बेशक मन जिंकायला जा. पण ते मन कुठं बसलंय्, त्याचा तर आधी शोध घेशील? अरे, मन जिंकणाऱ्या तुझ्या संतमहंतांच्या गोष्टी राहू दे. ह्या इथं, ह्या वाड्यात आग्रेवाली रोशन गायला आली होती एकदा. तरुण होतो आम्ही तेव्हा. तुझ्या आजोबांचा गाण्याबजावण्याचा शौक म्हणजे खुला बिलकुल! बाई असो, जुवा असो, नाच-गाणं इथं! चोराचोरीचा मामला नाही. आजोबांचं तर सोडाच, पण तुझ्या आजीनं इथं आत बसल्याबसल्या इतकं गाणं ऐकलं होतं की, मल्काजान एक अंतरा विसरली ठुमरीचा, तर आतून आजीनं पुढले शब्द सांगितले! गाणं ऐकणं, सौंदर्याचा आस्वाद घेणं, यात पाप वाटायचं कारण काय? पाप बळजबरीत आहे, सक्तीत आहे, परिणामांची जिम्मेदारी नाकारण्यात आहे; खुषीत पाप नाही आहे. इथं-इथं-अशी मैफील बसली होती. रोशन गात होती पूरिया. तुझे आजोबा बसले होते पखवाजावर. नाना पानश्यांचे शागिर्द होते ते. धमार ऐन रंगात आला होता. ऐकायला इनेगिने पाचदहा लोक. बेहोष झाला होता मामला. इतक्यात पॅलेसवरून हुकूम आला महाराज सरकारांचा,

महाराजांनी लगेच बोलावलंय. बाई पूरियाच्या घनदाट जंगलात घुसलेली. धुंद झाली होती सुरांच्या मस्तीनं. हुकूम ऐकल्यावर ताडकन् म्हणाली वाड्यावरच्या अफसराला–'जा–महाराजांना म्हणावं, गाणं ऐकायचं असेल तर बापूभय्या देवासकरांच्या कोठीवर या. इथं उभा केलाय् म्हणावं पूरिया! ताज बघायला आपल्याला आग्र्यापर्यंत जावं लागतं. तुमच्या वाड्यापुढे नाचत येतात ते म्हणावं मुहर्रमचे कागदी डोले!'...आज कल्पना येणार नाही श्यामभय्या, पण त्या काळात संस्थानिकांना उलट उत्तर देणं म्हणजे काय होतं! गर्दन छाटली गेली असती ना बाईची! पण पर्वा नाही! मग सांग, राष्ट्रासाठी मरणाकडे पाहून बेफिकीर हसणारा क्रांतिकारक आणि सुरांच्या मस्तीत राजाची इतराजी स्वीकारणारी गाणारीण ह्यात लहान मोठं कुणी ठरवायचं?

**श्याम** : काकाजी, आता मात्र माझी खरोखर अर्जुनासारखी अवस्था झाली आहे. तुम्ही म्हणता तेही पटतं आणि कधी कधी आचार्य म्हणतात तेही पटतं.

**काकाजी** : पण तुझं मन सध्या काय म्हणतंय?

**श्याम** : वासूअण्णा, जरा बाहेर जाऊन उभा राहा.

**वासू** : तुमची मर्जी. (जातो.)

**श्याम** : काकाजी...जे सत्य आचार्यांना सांगायचा मला धीर होत नाही, ते काकाजी, मी तुम्हांला सांगणार आहे. खरं सांगू का काकाजी? आचार्यांबरोबर ही गीता आली ना तेव्हापासून...

**काकाजी** : बस्स! बोलू नकोस पुढे! अरे, हे तुझं गीतारहस्य मी केव्हाच ओळखलं होतं. मी गीतेशी बोलल्येय ह्या बाबतीत. हे असंच आहे बाबा! 'एकदाच पाहिले–पाहिले तया क्षणीच आपुली न राहिले' असं झालंय तिचंही. तुझा गधेपणा एवढाच की भलतीच गीता हातात धरलीस! फार थोर पुस्तक आहे ते बेटा, पण आपण नाही तितके थोर! आपली पट्टी काळी दोन. पांढरी पाच, पांढरी सहात गायचं कसं?

**श्याम** : असं कसं शक्य आहे काकाजी? आता लोक काय म्हणतील? परवा मी कॉलेजमधल्या मित्रांना भेटून त्यांचा निरोप देखील घेऊन आलो.

**काकाजी** : कशाबद्दल?

**श्याम** : मी त्यांना सांगितलं, की मी चाललो घर सोडून.

**काकाजी** : कुठे ?
**श्याम** : आचार्य नेतील तिथे.
**काकाजी** : पण आचार्य कुठे जाणार आहेत ?
**श्याम** : मला कुठे ठाऊक आहे ?
**काकाजी** : त्यांना तरी कुठे ठाऊक आहे ? विचार ते आल्यावर.
**श्याम** : पण मी दोस्तांना तोंड कसं दाखवू ?
**काकाजी** : अरे, पण दोस्तांना तू परत आलास तर आनंद होईल की दुःख ?
**श्याम** : त्यातलं काहीच होणार नाही.
**काकाजी** : मग त्यांची चिंता कशाला ?
**श्याम** : चेष्टा करतील ते माझी.
**काकाजी** : त्यांना घेऊन जा एखाद्या हॉटेलात. चांगली मुर्गीबिर्गी खाऊ घाल त्यांना. आणि म्हणावं—दोस्त, आपला बेत फिरला. कबूल कर, की मी गाढव होतो म्हणून. आपला गाढवपणा कबूल करावा. मझा असतो त्यात देखील. शत्रंज खेळताना नाही आपली मूव्ह चुकत एखादवेळी—म्हणून काय गाढवपणालाच चिकटून बसायचं ? अरे, ज्या वयात सूत जमवायचं, त्या वयात सूत काढीत काय बसलास ?

[गीता आणि उषा येतात. उषाच्या हातात एक वर्तमानपत्र आहे.]

**काकाजी** : या—या—कशी काय झाली प्रभातफेरी ?
**उषा** : (संतापून) फार छान झाली. हे वाचा, म्हणजे कळेल. हलकट मेले ! (श्यामपुढे वर्तमानपत्र टाकते.)
**काकाजी** : काय आहे ? वाच रे श्याम.
**श्याम** : (मथळा वाचतो.) फोर्मोसा बेटाबद्दल तडजोडीची शक्यता. ह्यात काय रागावण्यासारखं आहे ?
**उषा** : फोर्मोसा बेटाशी काय करायचंय आपल्याला ? हे—हे वाच.
**श्याम** : (वाचू लागतो.) शिबिरात स्वयंसेविका आणि थेटरात संचालिका ! काय सांगू शिबिराच्या गंमती, संचालिकाच आइस्क्रीम खाती. येथे काही दिवसांपूर्वी सुरू झालेल्या भगिनी शिक्षा मंडळाच्या शिबिराबाबत बऱ्याच गमती आमच्या कानावर आल्या आहेत. त्याबद्दल काही खुलासा करून घ्यावा म्हणून

आमचा खास बातमीदार शिबिरात गेला असताना शिबिरसंचालिकाबाईंचा कित्येक दिवस तेथे पत्ताच नसल्याचे कळले. योगायोगाने तोच बातमीदार तेथील एका चित्रपटगृहात गेला असताना, मध्यंतरात, शिबिरसंचालिकाबाई, दुसरी एक सुंदर तरुणी आणि इंदुरातील एक खिलाडू डॉक्टर, शिबिराच्या कार्याचा शीण घालवण्यासाठी आइस्क्रीम खाताना आढळले. स्वतः काही अलौकिक देशसेवा करीत आहोत अशा धुंदीत सदर शिबिरसंचालिकाबाईंनी येथील काही प्रतिष्ठित स्त्रियांचा काही दिवसांपूर्वी अपमान केल्याचेही वृत्त आमच्या कानी आले आहे. या सर्व प्रकरणाबाबत आचार्य पोफळे गुरुजींशी प्रत्यक्ष बोलून आम्ही त्यांच्याकडे चौकशी करणार आहो.

**उषा :** काकाजी, आत्ताच्या आत्ता चला माझ्याबरोबर.

**काकाजी :** कुठे ?

**उषा :** त्या संपादकाकडे.

**काकाजी :** कशाला ?

**उषा :** कशाला ? इतका बदनामी करणारा मजकूर छापून आला तरी तुम्हांला काहीच वाटत नाही ?

**काकाजी :** अग पण असं काही तरी छापल्याशिवाय त्याचा धंदा कसा चालेल ?

**श्याम :** चल उषाताई ! काकाजी बंदूक द्या तुमची, गोळी घालतो त्या संपादकाला.

**काकाजी :** अरे, पण आचार्यांना तू सत्य बोलायचं वचन दिलंस त्याबरोबर अहिंसेचं वचन नाही का दिलंस ?

**उषा :** काकाजी, अजून तुम्हांला थट्टा सुचते ?

**काकाजी :** गीता, तुझं काय म्हणणं आहे ?

**गीता :** मला तर जीव द्यावासा वाटायला लागलाय.

**श्याम :** छे छे—असं काही करू नकोस गीता.

**गीता :** नाहीतर काय करू ? माझ्यामुळं हे सगळं झालं.

**काकाजी :** तुझ्यामुळे ?

**गीता :** होय, माझ्यामुळं. माझ्यासाठी उषाताई सिनेमाला आल्या.

**काकाजी** : अच्छा–म्हणजे सिनेमाला गेला होता हे खरं ? आणि सतीशही होता का ?
**गीता** : हो ! त्यांच्याबरोबर गेलो होतो आम्ही.
**काकाजी** : म्हणजे छापून आलंय ते सत्य आहे.
**उषा** : पण हे सत्य छापून साधलं काय ह्या संपादकानं ?
**काकाजी** : हा त्याचा प्रश्न आहे. शिवाय तुम्ही सार्वजनिक लोक ना ! तुम्हांला खाजगी जीवन का असावं ? आपल्याला तर भय्या ह्यात काही चूक वाटत नाही ! तू शिबिराची संचालिका आहेस हे सत्य आहे. तू आणि ही सुंदर तरुणी–ही तरुणी सुंदर आहे हे सत्य आहे. काय रे श्याम ?
**श्याम** : हो–खरं म्हणजे सत्य आहे.
**काकाजी** : ठीक आहे. दोन सत्यं पटली. आता खिलाडू डॉक्टरबरोबर सिनेमाला गेला होता हेही सत्य आहे. बरं आइस्क्रीम खाल्लं हे सत्य आहे का ?
**उषा** : म्हणजे आइस्क्रीम खाऊ नये की काय आम्ही ?
**काकाजी** : असं आहे, कोणी काय खावं, काय प्यावं, हा माझ्या दृष्टीनं अत्यंत गौण प्रश्न आहे. पण तुमच्या लेक्चरबाजीत–तुम्ही, लोकांनी काय खावं नि काय खाऊ नये हे पढवीत असता. आता तुम्ही काय खाऊ नये हे एकदा त्या संपादकानं सुचवलं तर चुकलं कुठे ? मला जर उद्या कुणी सांगायला लागला, की तू नेहमी दूधभात, भेंडीची भाजी खा. मी त्यांना म्हणेन तू मटन पॅटिस आणि बिर्याणी खा. क्विट्स ! दोघांचंही बरोबर ! चला, जाऊ द्या. हं गीता, सिनेमा कसा काय होता ? काय होती स्टोरी ?
**उषा** : काकाजी, तुम्हांला काही अंतःकरण आहे की नाही ?
**काकाजी** : आहे म्हणून तर गीताला सिनेमाची कहाणी विचारतो. काही नायकनायिकेच्या दर्दभऱ्या जिंदगीचा दास्ताँ तर सांगा. बडा मझा असतो––
**उषा** : आयुष्यभर मजेशिवाय काय पाहिलंय तुम्ही काकाजी ?
**श्याम** : हे मात्र ऐकणार नाही हं उषाताई. तू येण्यापूर्वी काकाजी इतके गंभीर बोलले की माझंदेखील हृदयपरिवर्तन झालं. एक तर म्हणजे मी आचार्यांच्या बरोबर हे घर सोडून जायचा विचार सोडला. ह्या टकळीबिकळीशी माझं सूत जमणार नाही.

**उषा** : खरं सांगतोस तू हे श्याम ?

**श्याम** : अगदी खरं सांगतो! ह्या सत्याच्या मागे लागून मी खोटं बोलत होतो. तुला कदाचित् आवडणार नाही, पण मी इंजिनियर व्हायचं ठरवलंय!

**उषा** : मला का नाही आवडणार ?

**श्याम** : तुला नाही तरी ह्या गीताला नाही आवडणार.

**गीता** : मला ? मला का नाही आवडणार ?

**श्याम** : गीता, तू काय, आचार्य काय, आमची उषाताई काय, सगळी मोठी माणसं आहात. आपण पाहिलं, आपल्याला काही हा थोरपणा परवडणार नाही. नळाखाली बसून बसून सर्दी झाली मला. उषाताई, क्षमा कर, पण काल मी सिगरेट देखील ओढली.

**उषा** : चला, म्हणजे सगळ्यांनीच पापं करायला सुरुवात केली. मी आणि गीतानं सिनेमा पाहिला. आइस्क्रीम खाल्लं. तू सिगरेट ओढलीस. फक्त काही कोणी नवीन पाप केलं नसेल तर ते काकाजींनीच.

**काकाजी** : नाही भय्या. आम्ही देखील एक नवं पाप केलं.

**श्याम** : तुम्ही ? तुम्ही कसलं पाप केलं काकाजी ?

**काकाजी** : केलं! श्यामभय्या, मोठं मस्त पाप केलं. बरं का गीता, काल तुझी टकळी घेऊन हळूच सूत काढून पाहिलं. (सगळेजण हसतात.)

**श्याम** : महाभयंकर पाप.

**काकाजी** : सुरुवातीला जमेना. पण मग काय सरसर गळ्यातून तान निघाल्या-सारखं सूत निघायला लागलं. मोठा मस्त मझा असतो यार.

**उषा** : तुम्हांला सगळ्याचाच मझा वाटतो.

**काकाजी** : पाहिलं नीट म्हणजे बराबर मझा दिसतो. इंदूर स्टेशनात एकदा एक भंगी दोन लंब्या झाडू घेऊन कचरा काढीत होता. उषा, अरे ऐश्या झाडू फिरवीत होता, की तुझ्या सतीशला बॅट देखील फिरवता येणार नाही तशी.

**उषा** : काकाजी!

**काकाजी** : काय ग ? हां हां...तुझ्या सतीशला म्हणालो म्हणून का ? काय ग गीता, आता तूच सांग हे सत्य आहे की नाही ?

**गीता** : हो—अगदी सत्य आहे.

**उषा** : गीते, आश्रमात इतकी वर्षे राहून हेच शिकलीस वाटतं ?

**गीता** : आश्रमात इतकी वर्षे राहून जे शिकले ते पंधरा दिवसांत विसरायला लावलंत तुम्ही सर्वांनी.

**काकाजी** : पण हे विसरणं तुला आवडलं की नाही ? आता सत्य सांगायची तुझी पाळी आहे.

**गीता** : मला नाही बाई सांगता येत.

(आचार्य हातात वर्तमानपत्राची सुरळी घेऊन फडफडावीत येतात. दुसऱ्या हातातली पिशवी कोचावर टाकतात.)

**आचार्य** : (संतापून) काय समजू मी या बातमीचा अर्थ ? गीता ? आजपर्यंत आश्रमात हेच शिकलीस का ? का हो संचालिकाबाई, हीच का कर्तव्याची जाणीव ! आणि कुठे आहे तो आमचा खिलाडू गाढव ! (त्यांच्यामागून सतीश आत येतो.)

**सतीश** : हा काय तुमच्यामागून आहे. तुमच्यामागून दुसरं कोण येणार ?

**आचार्य** : म्हणजे गाढवं आमच्यामागून येणार ?

**सतीश** : तसं नाही मामा. रस्त्यातून तुम्ही धावत निघाला होता. दवाखान्यातून पाहिलं मी. म्हटलं झालं काय ? तसाच निघालो. बाकी तुम्ही चालता किती झरझर मामा ! किती हाका मारल्या—टाळ्या वाजवल्या—

**आचार्य** : शीळ नाही का घातलीस ? हा काय गोंधळ घातलास ?

**सतीश** : गाढव गोंधळ घालण्यापलीकडे काय करणार ?

**आचार्य** : तुझे हे पोरीबाळींना हसवायचे विनोद आवर ! मोटारस्टँडवर उतरलो. वर्तमानपत्र उघडतो तर ही बातमी.

**श्याम** : त्यात फोर्मोसाचीही बातमी आहे आचार्य.

**आचार्य** : तू गप्प बैस. मला ह्याचा खुलासा पाहिजे.

**सतीश** : खुलासा कसला ? त्यात सगळं स्वच्छ लिहिलं आहे.

**आचार्य** : खरं आहे ते ?

**सतीश** : प्रत्येक ओळ खरी आहे.

**आचार्य** : गीता, तूही गेली होतीस ह्यांच्याबरोबर सिनेमात नाचायला ?

**सतीश :** सिनेमा पाहायला मामा.

**आचार्य :** गीता, काय केलंस हे? कुणाची मुलगी तू? कुठे रामभाऊ गोवारीकराचा त्याग आणि कुठं हे तुझं वागणं!

**सतीश :** पण मामा, त्याग वंशपरंपरा करीत राहिलं पाहिजे असं कुठं लिहिलंय!

**आचार्य :** मग हिनं काय करावं असं तुझं मत आहे?

**सतीश :** ते तिचं तिला ठरवू द्या. आता कायद्याच्या दृष्टीनंच का फक्त सज्ञान म्हणायचं तिला? व्यवहारात देखील सज्ञान होऊ द्या ना तिला! आयुष्यभर डोळ्याला त्यागाच्या खुळचट कल्पनांची झापडं बांधून हिंडली बिचारी. जराशी झापडं काढल्याबरोबर भोवळ आली तिला.

**आचार्य :** तुझं काय म्हणणं आहे गीता?

**गीता :** क्षमा करा आचार्य.

**उषा :** कशाबद्दल? हिच्या भावना कधी ओळखून घ्यायचा प्रयत्न केला होता तुम्ही? तुमचं तत्त्वज्ञान, तुमचा कर्मठ आचारधर्म तिला पचेल की नाही, तिच्या पिंडाला मानवेल की नाही याचा कधी विचार केला तुम्ही? परवा तिला साधं आइस्क्रीम खायचं म्हणजे पाप वाटत होतं. सदैव कसल्या तरी दडपणाखाली ती वाढली. तुम्ही फिरवाल तिथं फिरायचं. तुमच्या तैनातीत राहायचं. ती शेवटी स्त्री आहे. निसर्गानं तिच्या ठिकाणी काही निराळ्या भावना निर्माण केल्या आहेत. तिला कधी स्वतःचं घरकुल असावंसं वाटेल, मूल असावंसं वाटेल, आपल्या पोराच्या भुरभुरणाऱ्या जावळाचा मुका घ्यावासा वाटेल, याचा काही विचार शिवला होता तुमच्या मनाला?

**आचार्य :** ह्या कुणाच्या भावना बोलते आहेस तू?

**उषा :** (एकदम स्तब्ध होते.) कुणाच्या भावना! माझ्या–गीताच्या–स्त्रीच्या अंतःकरणाच्या भावना बोलते आहे मी. निसर्गाच्या प्रवाहाच्या उलट दिशेनं पोहायचं कसलं तत्त्वज्ञान हे तुमचं! काय कल्पना आहेत तुम्हा लोकांच्या माणसांबद्दल? ह्या गीतेला काय तुम्ही जिवंत माणसासारखं वागवलंत? सोंगटीसारखी तुमच्या इच्छेप्रमाणं हलवलीत तुम्ही तिला. वासना जिंकण्याचं तत्त्वज्ञान म्हणे! खरंच, ही वासना जिंकण्याची बकबक करणाऱ्या तुम्हा सगळ्या संतमहंतांची घृणा यायला लागली आहे मला. स्त्री ही अशी, स्त्री ही तशी–स्त्री ही नरकाची

खाणी–मुक्तीच्या मार्गातली धोंड! ह्या धोंडेनंच नऊ महिने रक्तामासाचा खुराक घालून वाढवलेलं असतं ना तुम्हांला? तिनंच तुमच्या खस्ता काढलेल्या असतात ना लहानपणी? तिच्या सहवासाला वासना म्हणायचं?

**सतीश :** मला हे कळत नाही मामा, माणुसकी टिकवण्यासाठी जर सगळा अट्टाहास, तर मानववंशाच्या वृद्धीसाठी स्त्रीपुरुष एकत्र आले की पाप पाप म्हणून ओरडायचं ढोंग कशाला?

**गीता :** (एकदम ओरडते.) सतीशभय्या—

**उषा :** काय ग?

**गीता :** बोलू नका आणखी–(संथपणे कोचावर पडलेल्या पिशव्या गोळा करते.) –चला आचार्य.

**उषा :** कुठे निघालीस तू?

**गीता :** आचार्यांच्या बरोबर. ते नेतील तिथे. असंख्य उपकारांचं ओझं आहे त्यांचं माझ्यावर. मी चारसहा महिन्यांची होते तेव्हा आई वारली माझी. तेव्हापासून त्यांनीच वाढवलंय मला. उषाताई, आता तुम्ही म्हणाला ना, तसल्या खस्ता काढल्या आहेत आचार्यांनी माझ्यासाठी. कुणी केलं असतं हे? कुणाला पटो न पटो, अनेक हालअपेष्टा काढल्या आहेत त्यांनी! आयुष्यभर खूप वणवण झाली त्यांची. कुणी तरी सांभाळलं पाहिजे त्यांना आता. थकत चालले आहेत ते आता...त्यांना माझ्या सेवेची गरज आहे. त्यांना मुलगी असती, तर आज असल्या थकलेल्या अवस्थेत त्यांना वाऱ्यावर सोडून गेली असती का काकाजी? सतीशभय्या, त्यांना आता लहान मुलासारखं सांभाळलं पाहिजे. त्यांचा राग, संताप, सगळं सहन करीत सांभाळलं पाहिजे. तुमच्या घरात विजेचे दिवे आले, म्हणून जुन्या समया विकून नाही ना टाकल्या तुम्ही? मिणमिणता का होईना त्यांनीही प्रकाश दिला होता ना तुम्हांला? चला आचार्य, चला. परवा मी किती सांगून पाहिलं, पण रागावून एकटेच निघून गेले दौऱ्यावर. पूर्वी इतके संतापत नसत. हल्लीच लवकर चिडतात, रागावतात. चला–चला ना आचार्य. रागाच्या भरात बोलले मी. क्षमा करा मला आचार्य. चला–चला–जाऊ या आपण. खूप मनस्ताप दिला मी तुम्हांला.

**आचार्य :** थांब! थांब बेटा! (स्वस्थ बसतात. भावनांचा आवेग आवरण्याचा

कसोशीने प्रयत्न करतात. परंतु शेवटी हुंदका येतोच.) आयुष्यात ज्या गोष्टीला भीत होतो, ते-ते करायला लावलंस तू मला...(डोळे पुसतात.) अश्रू ! !...तुझा बाप तुरुंगात मेला. पोलिसांनी त्याचं अंत्यदर्शन घेऊ दिलं नाही मला. तुझ्या आईचा शोक पाहून कालवाकालव होत होती पोटात. पण त्या वेळी देखील अश्रू आवरण्यासाठी ईशावास्योपनिषदातले श्लोक म्हणत बसलो होतो मोठमोठ्यानं. (आज डोलारा कोलमडला.) कुणी ? कुणी केलं मला आचार्य ? जवानीत देशप्रेमानं ह्या सार्वजनिक कार्यात उडी घेतली...पोहता पोहता हात थकत होते. पण सारा समाज जणू काय काठ्या घेऊन उभा होता तीरावर...किनाऱ्याशी आलो की काठ्यांनी आत ढकलायचा आणि म्हणायचा–आचार्य–आचार्य–तुम्ही आमच्यासाठी धडपडलं पाहिजे. किनाऱ्याला लागणं शक्य नव्हतं. संन्याशाची वस्त्रं एकदा अंगावर चढवली की ती उतरून संसारी माणसाची वस्त्रं चढवायची म्हणजे गुन्हेगाराची वस्त्रं चढवण्यापेक्षाही भयंकर ! लोक फिदीफिदी हसले असते. संन्याशाच्या एका पोरानं रेड्याच्या तोंडून वेद वदवले, पण समाजाच्या तोंडून मात्र त्या संन्याशाला अवहेलना, तुच्छता, हीच ऐकावी लागली. त्याला आयुष्यभर घाबरलो मी. समाजाचा रोष पत्करून ह्या संन्याशाला सामान्य होण्याचं धैर्य नव्हतं. (निर्भयतेचे पाठ बडबडत होतो मी लोकांपुढे. पण मनातून सदैव भ्यालो होतो, भेदरलो होतो.) भीतीचा तो आवाज माझा मलाच ऐकू येऊ नये म्हणून व्याख्यानं बडबडत आलो, प्रवचनाचा आक्रोश केला. पुढे हे अंगवळणी पडलं. (जरा बाजूला गेलो की लोक विसरतील मला.) मग सामान्याचं सुख नाही आणि संन्याशाचा सत्कारही नाही–म्हणून सतत भाषणं कर, सप्ताहात जा–मुलाखती दे–उपास कर–चित्तशुद्धीच्या जाहिराती दे–काहीतरी करून माझ्या अस्तित्वाची जाणीव लोकांना पटवून दे–हेच कार्य राहिलं आयुष्यात. (मोह जिंकला नाही मी बाळ, मोहावर शब्दांचे ढीगच्या ढीग रचून त्याला गाडायचा प्रयत्न केला.)..त्या दिवशी त्या कुठल्याशा महिला मंडळातील ती बाई म्हणाली, तुमचा उपदेश आचरणात थोडाच आणता येतो ?...अनेक कार्यं चालली आहेत जगात, त्यातलंच हे एक ! (कसलं तप ? आणि कसलं फळ ) ! परवा ह्याच विचारात क्षिप्रेच्या काठावर माझ्या गतजीवनाचं प्रतिबिंब पाहात बसलो होतो मी. क्षिप्रा लोकांचं जीवन सुखी करीत शांतपणे वाहते. कारण ती शांत

आहे म्हणून ती इतरांना शांत करते. (मी कुणाचं जीवन सुखी केलं ? आश्रमात कुणाला प्रेम आहे माझ्याबद्दल ? सोबतीचे सहकारी मानाची संधी मिळाल्याबरोबर आश्रम सोडून अधिकाराच्या जागेवर धावले. माझा अहंकार जबर होता. त्यांनाही नमस्काराला एक बुवा हवा होता. अधूनमधून माझे पाय धरून गेले, की त्यांनाही बरं वाटत होतं आणि (मलाही बरं वाटत होतं.) केरसुणीनं समुद्राच्या लाटा परतविण्याची महत्त्वाकांक्षा आमची !) बुद्धाला जमलं–ख्रिस्ताला जमलं–आम्हीही हुरळलो...पण ते दीपस्तंभ होते. वादळाच्या प्रचंड भडिमारातदेखील शांत राहण्याची ताकद असते दीपस्तंभात...आपण जहाजं. जहाजांनी दीपस्तंभाच्या प्रकाशात मार्ग आखावा. (माझ्या देहाच्या दुबळ्या जहाजाला आपण दीपस्तंभ झाल्याचा अहंकार झाला.). [वर्तमानपत्र फडफडावीत] ह्या एवढ्याशा वादळानं ज्याची शिडं फाटून चिंध्या होतात, त्यानं दीपस्तंभाशी बरोबरी केली स्वतःची आणि भरकटत, भरकटत, आदळून, आपटून, स्वतःला हास्यास्पद–केविलवाणं असं करून घेतलं. गीतेला माझी दया आली ! गीता, तुझा आचार्य शेवटी दया करावी, कीव करावी, अशी वस्तू झाला !

**काकाजी :** शांत व्हा ! आचार्य, शांत व्हा !

**आचार्य :** काकाजी–काय मौज आहे पाहा ! आयुष्यभर शांतीचे पाठ ओरडत आलो मी. तुम्ही मला शांत व्हायला सांगता. तुम्हांला अधिकार आहे काकाजी ! तुम्ही कसलीही साधना केली नाही, पण तुम्ही शांत आहा. आयुष्यभर काय वाटेल ते खाल्लं तुम्ही, पण तमोगुणाचा स्पर्श नाही झाला तुम्हांला. आम्ही काय साधलं ? जिथं जाऊ तिथं आमचा उपद्रव. परवा उज्जैनला एका गृहस्थांच्या घरी उतरलो होतो, तिथं मी नवरा-बायकोचं भांडण ऐकलं–स्वैपाकघरात बायको नवऱ्याला सांगत होती, त्याला हातसडीचा तांदूळ हवा असला तर बरोबर बांधून आणीत जा म्हणावं. असल्या किती माउल्यांचे शिव्याशाप खात अन्न खाल्लं आम्ही ! का ? स्वतःच्या अहंकाराला आहुती टाकून जिवंत ठेवायला. गीता, राहा बाळ, तू खुशाल इथं राहा. जिथं तू फुलशील, बहरशील तिथं राहा–मी चाललो.

**श्याम :** नाही आचार्य, तुम्ही जाता कामा नये.

**सतीश :** मामा, माझं ऐका, तुम्हांला ब्लडप्रेशर आहे...माझ्या घरी राहा.

परका का आहे मी तुम्हांला? तुम्ही नाही प्रवचनं दिली तर समाजाला काय पर्वा आहे त्याची?

**आचार्य :** सतीश, अरे हीच तर दुःखांतिका आहे आमच्या आयुष्याची. कुणीही ऐकत नाही माझं, मला कळतंय. तरीही मला बोललं पाहिजे. नाहीतर वेडा होईन मी.

**काकाजी :** आचार्य, तुम्ही राहा इथं. आपण जंगलात जाऊन राहू या. पूर्वी वानप्रस्थाश्रम होताच ना? काय ह्या जगाचं बरंवाईट करायचंय ते ह्या पोरांना करू द्या. चला जंगलात. मी शिकार करीन, तुम्ही चिंतन करा. आपलं तर मत आहे भय्या–ऋषींनी जंगलात राहावं. असं हे सारखं सारखं माणसांत आलं म्हणजे पोरंसोरं दाढ्या ओढतात मग! समाजाला गरज असली तर येईल जंगलात विचारायला.

**आचार्य :** धन्यवाद–काकाजी, धन्यवाद. पण ते शक्य नाही.

**गीता :** काकाजी, खरंच ते शक्य नाही. बुद्धिबळातल्या सोंगट्या आपण. हत्तींनं सरळ चाललं पाहिजे. उंटानं तिरकं चाललं पाहिजे.

**आचार्य :** खरं आहे, अगदी खरं आहे बेटा. पाहिलंत काकाजी? शहाणी आहे हो ही पोरगी. तिला सुखाचा वारा द्या. तिला फुलायचं असेल तसं फुलू द्या. श्याम, उतर बाबा तो संन्याशाचा वेष! भयंकर आहे तो!...अंग भाजून काढतो. उषा, तेजस्वी आहेस पोरी. सतीश, श्याम, खुशाल संसार करा. अगदीच थकलो तर रस्त्याच्या कडेला पडण्याऐवजी जरूर तुझ्या दवाखान्यात येऊन पडेन. अरे, प्राणांतिक उपोषणाच्या वेळी देखील मृत्यूचं भय सुटलं नव्हतं! श्याम, तू सत्य सांगायला भीत होतास ना? बरोबर होतं तुझं. पण एकदा ते सांगितलं की कसं शांत-शांत वाटतं. चला, मला गेलं पाहिजे. एकट्यालाच चाललं पाहिजे मला. मनात असो वा नसो, एकट्यालाच चाललं पाहिजे. गुरुदेवांनी म्हटलंय ना? ॲकला चालो रे–ॲकला चालो रे–तुझी हाक कुणी ऐको न ऐको. मला एकट्यालाच चाललं पाहिजे–(शेवटली वाक्यं म्हणत म्हणत एकटे निघून जातात. गीता धावत जाऊ लागते.)

**गीता :** आचार्य–आचार्य—

**काकाजी :** थांब बेटा–थांब! (तिला जवळ घेतात.) जाऊ दे त्यांना. आतां

सूर सापडला त्यांना. न पेलणाऱ्या पट्टीत गाऊ नये बेटा, नाहीतर सगळं आयुष्य बेसूर होऊन जातं. गीता, जाऊ दे आचार्यांना. त्यांच्या जीवनाचे तंबोरे मस्त जुळून राहिले आहेत आता. आता खरा मझा येईल त्यांच्या आयुष्यात. जाऊ दे—जाऊ दे त्यांना.

[दारातून सर्वजण आचार्य गेले त्या दिशेने पाहतात. सर्व मंडळी अशी पाठमोरी असताना पडदा पडतो.]

म. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
२९७५८ नों. दि ३/७/८६
नाटक ... क्र. ..................

IRBK-0121472
IRBK-0121472